सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, १९ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक २९५ | पाने : ८ + आसमंत पुरवणीसह | किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पंतप्रधानांच्या हस्ते स्वामित्व योजनेअंतर्गत प्रॉपर्टी कार्डचे वितरण!

अहमदाबाद : केंद्र सरकारने राज्यातील नागरिकांच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना राबवल्या आहेत. त्याप्रमाणे केंद्र सरकारने ग्रामीण भागातील नागरिकांसाठी स्वामित्व योजना राबवली आहे. याअंतर्गत नागरिकांना प्रॉपर्टी कार्डद्वारे बँकेकडून कर्ज घेता येते सहज शक्य होत आहे. या पार्श्वभूमीवर आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे ६५ लाख प्रॉपर्टी कार्डचे वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी पीएम मोदी यांनी राजस्थान, मध्य प्रदेशातील या योजनेच्या लाभार्थ्यांशी संवाद साधला. 'आजचा दिवस देशातील गावे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी खूप ऐतिहासिक आहे. ५ वर्षापूर्वी स्वामित्व योजना योजना सुरू केली होती. जेणेकरुन गावांमध्ये राहणाऱ्या लोकांना कायदेशीर पुरावे मिळावा. गेल्या ५ वर्षात सुमारे दीड कोटी लोकांना स्वामित्य योजनेंतर्गत प्रॉपर्टी कार्डस देण्यात आली आहेत, आजच्या कार्यक्रमात ६५ लाखांहून अधिक कुटुंबांना स्वामित्व कार्ड मिळाली आहेत' असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

ग्रामपंचायतींच्या अडचणी दूर होतील

आता प्रॉपर्टी हक्क मिळाल्याने ग्रामपंचायतीच्या अडचणी दूर होतील आणि त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील. यामुळे आपत्तीच्या परिस्थितीत योग्य दावा मिळवणे देखील सोपे होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर ड्रोनच्या मदतीने देशातील प्रत्येक गावातील घरे आणि जमिनीचे मॅपिंग केले जाईल. गावकऱ्यांना त्यांच्या निवासी मालमतेचे कागदपत्रे दिली जातील, असेही त्यांनी म्हटले.

## केईएम रुग्णालयाचे शताब्दी वर्ष समाज उपयोगी ठरावे : मुख्यमंत्री

मुंबई : राजे एडवर्ड स्मारक रूग्णालय (केईएम) ही मुंबईसह देशातील महत्त्वाची वैद्यकीय संस्था आहे. एखाद्या आरोग्य क्षेत्रातील संस्थेने सुवर्ण किंवा शताब्दी महोत्सव साजरा करणे, ही त्या संस्थेसाठी अभिमानास्पद बाब असते. मुंबईच्या आरोग्य क्षेत्रात तर केईएमचे नाव अग्रगण्य आहे. केईएम रुग्णालयाने शताब्दी वर्षामध्ये पदार्पण केले असून हे वर्ष अधिकाधिक समाज उपयोगी ठरावे, अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. बृहन्मुंबई महानगरपालिका संचालित आणि परळ स्थित सेठ गोवर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय व राजे एडवर्ड स्मारक रुणालय (केईएम) चा शताब्दी वर्ष शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते समारंभपूर्वक आज (दिनांक १८ जानेवारी २०२५) पार पडला.

# अर्थमंत्री निर्मला सीतारामन सलग आठव्यांदा सादर करणार अर्थसंकल्प

नवी दिल्ली : अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २४ मध्ये सलग सातव्यांदा अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम केला होता. यावर्षी त्या सलग ८ वेळा अर्थसंकल्प सादर करणाऱ्या अर्थमंत्री बनणार आहेत. यंदा ३१ जानेवारी ते ४ एप्रिल दरम्यान अर्थसंकल्पीय अधिवेशन होणार आहे. या काळात एकूण २७ बैठकी होणार आहेत.

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्थमंत्री निर्मला सीतारामन १ फेब्रुवारी रोजी सलग आठवा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. परंपरेनुसार, अधिवेशनाची सुरुवात ३१ जानेवारी रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या लोकसभा आणि राज्यसभेच्या संयुक्त बैठकीला संबोधित करून होईल. त्यानंतर आर्थिक सर्वेक्षण सादर केले जाईल. अर्थसंकल्पीय अधिवेशन दोन टप्प्यात होणार आहे. अधिवेशनात ३१ जानेवारी ते १३ फेब्रुवारी या कालावधीत पहिल्या टप्प्यात एकूण ९ बैठका होणार आहेत. यादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरील चर्चेला आणि अर्थमंत्री सीतारामन अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देतील.

यानंतर संसदेला सुट्टी दिली जाईल, जेणेकरून अर्थसंकल्पीय प्रस्तावांचा आढावा घेता येईल. अधिवेशनाचा दुसरा टप्पा १० मार्चपासून सुरू होणार असून, त्यात विविध मंत्रालयांच्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा होऊन अर्थसंकल्पाची प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. अधिवेशन ४ एप्रिलला संपणार आहे. संपूर्ण अर्थसंकल्पीय अधिवेशनात एकूण २७ बैठका होणार आहेत.

# कोलकात्याच्या 'निर्भया'ला १६१ दिवसांनंतर मिळाला न्याय!

## आरजी कर प्रकरणात संजय रॉय दोषी, उद्या शिक्षा

नवी दिल्ली : उत्तर कोलकाता येथील सरकारी वैद्यकीय महाविद्यालय आरजी कार येथे ९ ऑगस्ट २०२४ रोजी एका प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरचा मृतदेह आढळून आला. या प्रकरणामुळे देशात खळबळ उडाली होती. या घटनेच्या तपासादरम्यान आरजी कार मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमधील ३१ वर्षीय प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवर बलात्कार आणि हत्या झाल्याचे उघडकीस आले. या हत्येप्रकरणी सियालदह न्यायालयाने संजय रॉय याला दोषी ठरवण्यात आले असून उद्या आरोपीला शिक्षा सुनावण्यात येणार आहे. त्यामुळे अखेर १६१ दिवसांनंतर कोलकाता प्रकरणातील निर्भयाला न्याय मिळणार आहे.

कोलकाता खून प्रकरणी आज सियालदह न्यायालयाने मुख्य आरोपी संजय रॉय याला दोषी ठरवले. त्याला सोमवारी २० जानेवारी रोजी शिक्षा सुनावली जाईल, असे न्यायालयाने म्हटले आहे. या खटल्याच्या ५७ दिवसांनंतर सियालदह अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायाधीश अनिर्बान दास यांच्या न्यायालयाने निकाल दिला. दरम्यान, निकाल सुनावणीवेळी मुख्य आरोपी संजय रॉय याला न्यायालयात आणले होते. निकालानंतर संजय रॉयला यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. याधीश अनिर्बन दास यांनी संजय रॉयला भारतीय न्यायिक संहितेच्या कलम ६४ (बलात्काराची शिक्षा), ६६ (मृत्यूला कारणीभूत ठरण्याची शिक्षा) आणि १०३ (हत्या) नुसार दोषी ठरवले.

# 'सैफ मध्ये पडला नसता तर मोठे विपरित घडले असतें.'; करीनाचा पोलिसांना जबाब

तभा वृत्तसेवा/ जमीर काझी

मुंबई, दि.१८ जानेवारी : सैफने हल्लेखोराचा एकट्याने सामना केला. तो जर मध्ये पडला नसता,त्याने प्रतिकार केला नसता तर काहीही विपरित घटले असते.माझ्या मुलांचा जीव धोक्यात होता, असे बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानची पत्नी व प्रसिद्ध अभिनेत्री करिना कपूर हिने पोलिसांना दिलेल्या जबाबात म्हटले आहे.

सैफवरील हल्ल्याच्या घटनेला ३ दिवस उटूनही अद्याप आरोपीला शोधण्यात मुंबई पोलिसाना यश आलेले नाही. त्याच्या शोधासाठी युद्धस्तरावर प्रयत्न सुरू असताना सर्व संबंधितांचे जबाब घेत चौकशी केली जात आहे. आत्तापर्यंत ५५ ते ६० व्यक्तींची चौकशी केली आहे सैफच्या शेजारच्याकडेही चौकशी करण्यात आली आहे.

हल्याच्या घटनेवेळी घरात उपस्थित असलेली करिना कपूर हिचा जबाब शुक्रवारी रात्री पोलिसांनी नोंदविला आहे. त्यामध्ये सर्व घटनाक्रम सांगितला आहे. तिने दिलेल्या माहितीच्या आधारे तपास सुरू ठेवला आहे. दरम्यान मिळालेल्या माहितीनुसार तिने जबाबात म्हटले आहे की, सैफने हल्लेखोराचा एकट्याने सामना केला होता. तो जर मध्ये पडला नसता तर माझ्या मुलांचा जीव धोक्यात होता. हल्ला झाला तेव्हा सैफने मुलांना आणि महिलांना १२ व्या मजल्यावर पाठवले होते. सैफने महिला आणि मुलांना वाचवण्याचा पुर्णपणे प्रयत्न केला.

जर त्याने हस्तक्षेप केला नसता तर काहीही घडू शकले असते, हल्लेखोराने घरातून काहीही चोरले नाही, परंतु तो खूप आक्रमक होता. त्याने सैफवर अनेक वेळा हल्ला केला, हल्ल्यानंतर मी घाबरले होते. त्यामुळे करिश्मा मला तिच्या घरी घेऊन गेली.असे म्हटले असल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

, पोलिसांनी याआधी सैफ-करीनाच्या मुलांची आया नैनी हिचाही जबाब घेतला आहे .की तिने सांगितले की ती गेल्या ४ वर्षांपासून त्यांच्या घरात काम करत आहे. १५ जानेवारीच्या रात्री २ वाजता मला एक विचित्र आवाज ऐकून जाग आली, बाथरूमची लाईट चालू होती. मी बघायला गेलो तेव्हा एक माणूस बाहेर आला, तो जेहकडे जात होता. हे पाहून मी पटकन उठलो आणि मुलाकडे गेलो, त्याने बोटाने इशारा केला आणि म्हणाला आवाज नाहीये. मी त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याने माझ्यावर हल्ला केला. त्याने एक कोटी रुपयांची मागणी केली. आवाज ऐकून सैफ आणि करिना धावले पण आरोपीने सैफवरही हल्ला केला. या घटनेत सैफला अनेक ठिकाणी दुखापत झाली असून आरोपीचे वय ३५ ते ४० वर्षांच्या दरम्यान असल्याचे सांगितलें. सीसीटीव्ही फुटेजमध्ये त्याचा चेहराही दिसत आहे. हल्ल्यानंतर तो पायऱ्यांवरून बाहेर पळाला. आज या हल्ल्याचा आज तिसरा दिवस आहे, पोलिस अजूनही हल्लेखोराचा शोध घेत आहेत. हल्लेखोराला पकडण्यासाठी पोलिसांनी ३५ पथके बनवली आहेत.

# 'एक देश एक निवडणूक' संघराज्य रचनेच्या विरोधात नाही

## केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांची स्पष्टोक्ती

नवी दिल्ली, १८ जानेवारी : 'एक देश एक निवडणूक' संघराज्य सरचनेच्या विरोधात नाही. एकाच वेळी लोकसभा आणि विधानसभा निवडणुका झाल्यास प्रशासनात सुधारणा होईल असे प्रतिपादन केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी एका मुलाखतीत केले.

यासंदर्भात मेघवाल यांनी सांगितले की, देशात १९५२ पूर्वी काही लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकत्र घेतल्या जात होत्या. जर ते संघराज्य रचनेच्या विरोधात नसते तर आता काही अडचण का आली असती का ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच 'एक देश एक निवडणूक' ला राजकीय कारणांमुळे विरोध होत असल्याचे त्यांनी सांगितले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही मसुदा कायद्यांची तपासणी करण्यासाठी सभागृहाची एक समिती हवी होती, त्यामुळे एकाच वेळी निवडणुका घेण्याबाबतची विधेयके संसदेच्या संयुक्त समितीकडे पाठवण्यात आली आहे. संयुक्त समितीच्या पहिल्या बैठकीत, विधिमंडळ विभागाचे सचिव राजीव मणी यांनी सदस्यांना एकाच वेळी निवडणुका घेण्याच्या विविध पैलूंबद्दल माहिती दिली होती. ३९ पैकी ३८ सदस्य बैठकीला उपस्थित होते. यामध्ये सर्व पक्षांचे लोक होते.

राजकीय कारणांमुळे 'एक देश एक निवडणूक' हे संघराज्य रचनेच्या विरुद्ध असल्याचे आरोप केले जात आहेत. मला असे म्हणायचे आहे की १९५२ च्या निवडणुका झाल्या, सर्व विधानसभांच्या निवडणुका देखील एकाच वेळी झाल्या.

# चित्रपटाच्या टीजरचे नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रकाशन

## अभिनेत्री छाया कदम आणि अभिनेता उपेंद्र लिमये खास भूमिकांमध्ये

### ७ फेब्रुवारीला चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला



नागपूर : पर्यावरण, पत्रकारिता, प्रेम, नातेसंबंध, राजकारण, गुन्हेगारी, पैसा, प्रशासन अशा मुद्द्यांवर भाष्य करणाऱ्या 'स ला ते स ला ना ते' या चित्रपटाचा धमाकेदार टीजर नागपूर येथे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीनजी गडकरी यांच्या हस्ते प्रकाशित झाला. याप्रसंगी चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक आणि कलाकार आवर्जून उपस्थित होते. विदर्भ आणि ख़ानदेशात लोकपरंपरेत वाघ नाचविण्याची परंपरा प्रसिद्ध आहे. याच पारंपरिक पद्धतीने या कार्यक्रमाच्या वेळी उपस्थित पाहुणे आणि कलाकारांचे स्वागत करण्यात आले.

लक्षवेधी नाव असलेल्या या चित्रपटाच्या टीजरमुळे चित्रपटाविषयीची उत्सुकता अधिकच वाढली असून हा चित्रपट ७ फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

विदर्भातील चंद्रपूरमधील न्यूज चॅनेलचा पत्रकार, पर्यावरणप्रेमी तरुणी यांच्या नात्याची गोष्ट या चित्रपटातून उलगडणार आहे. त्याशिवाय पर्यावरणाचे प्रश्न, गुन्हेगारी, राजकारण असे मुद्देही या चित्रपटाच्या केंद्रस्थानी असल्याचं टीजरवरून दिसून येतं. आजवर अनेक चित्रपटांतून पर्यावरण, वृत्तवाहिन्या, राजकारण अशा विषयांशी संबंधित गोष्टी दाखवल्या गेल्या असल्या तरी या चित्रपटाची गोष्ट खूपच वेगळी असल्याचं टीजर पाहून जाणवतं. 'जंगलातील एकेका वाघाचा एरिया ठरलेला असतो,' या वाक्यापासून सुरुवात होणारा टीजर क्षणोक्षणी उत्कंठा वाढवणारा आहे. 'स ला ते स ला ना ते' हा चित्रपट आता चित्रपटगृहात पाहण्यासाठी ७ फेब्रुवारीपर्यंत वाट पहावी लागणार आहे.

स्टुडिओ लॉजिकल थिंकर्स प्रस्तुत 'स ला ते स ला ना ते' या चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन संतोष कोल्हे यांचं आहे. श्रीकांत बोजेवार, तेजेश घाडगे, संतोष कोल्हे यांनी पटकथा लेखन, श्रीकांत बोजेवार यांनी संवाद लेखन केलं आहे. विनायक जाधव यांनी छायांकन, सचिन नाटेकर यांनी संकलन, एकनाथ कदम यांनी कला दिग्दर्शन, रोहित नागभिडे यांनी पार्श्वसंगीत, रोहित प्रधान यांना ध्वनिआरेखन केलं आहे. दिग्दर्शक संतोष कोल्हे यांनी नेहमीच वेगळ्या कलाकृती करण्यावर भर दिला आहे. त्यांच्या अनेक मराठी-हिंदी टीव्ही मालिका गाजल्या आहेत. मनोरंजक पद्धतीनं सामाजिक भाष्य करण्याची त्यांची एक अनोखी कला आहे. 'स ला ते स ला ना ते' हा चित्रपट विविध महोत्सवांमध्येही दाखवला गेला आहे. अभिनेता उपेंद्र लिमये, अभिनेत्री छाया कदम यांच्यासह रिचा अग्निहोत्री, साईंकित कामत, पद्मनाभ बिंड, मंगल केंकरे, वंदना वाकनीस, सुदेश म्हशीलकर, रमेश चांदणे, सिद्धीरूपा करमरकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत.




# मुंबई पुणे एक्सप्रेसवेवर सुविधा ट्रॅव्हल्सच्या बसला भीषण आग

लोणावळा : मुंबई पुणे एक्सप्रेसवेवर आज सुविधा ट्रॅव्हल्सच्या खाजगी बसला भीषण आग लागली असून या आगीत बस पूर्णपणे जळून खाक झाली आहे तर या बस मधील ३० प्रवाशी तात्काळ बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली आहे.



मुंबई पुणे एक्सप्रेसवेवरून मुंबईहुन लोणावळाकडे सुविधा ट्रॅव्हलची बस क्रमांक (चक ४७ -ड ०७७९) ही चालक असिफ केनिया (रा दहिसर मुंबई ) ही बस मीरारोड येथून लोणावळाकडे ३० प्रवाशी घेऊन जातं असताना बस बोरघाटात दत्तवाडी जवळ आली असता शॉर्टसर्किटमुळे बसच्या इंजिनला भीषण आग लागली असून या आगीत बस पूर्णपणे जळून खाक झाली आहे,तर चालकाच्या तत्परतेने बस थांबवून प्रवाशी आणि बस मधील सामान बाहेर काढल्याने मोठी जीवितहानी टळली आहे. या घटनेची माहिती मिळताच बोरघाट पोलीस, खोपोली नगरपालिका अग्निशमन बंब, आयआरबी अग्निशमन दल, देवदूत यंत्रणा, अपघातग्रस्त टीमचे सदस्य तात्काळ घटनास्थळी दाखल होत आग विझवण्यासाठी शर्थिने प्रयत्न केले



## बीएमडब्ल्यू एक्स१ लाँग व्हीलबेस ऑल इलेक्ट्रिक लाँच

छत्रपती संभाजीनगर- बीएमडब्ल्यू इंडियाने ऑटो एक्स्पो २०२५ मध्ये फर्स्ट-एव्हर बीएमडब्ल्यू एक्स१ लाँग व्हीलबेस ऑल इलेक्ट्रिक लाँच केली. कार आजपासून भारतभरातील बीएमडब्ल्यू डिलरशिप्समध्ये बुक करता येऊ शकते.बीएमडब्ल्यू एक्स१ लाँग व्हीलबेस ऑल इलेक्ट्रिक 'मेड इन इंडिया' असलेली बीएमडब्ल्यू ची पहिली इलेक्ट्रिक वेईकल ठरली आहे. बीएमडब्ल्यू ग्रुप प्लांट चेन्नई येथे स्थानिक पातळीवर उत्पादित करण्यात आलेली बीएमडब्ल्यू एक्स१ लाँग व्हीलबेस ऑल इलेक्ट्रिक एक्सक्लुसिव्हली ईड्राइव्ह२०एल ड्राइव्हट्रेनमध्ये उपलब्ध आहे. श्री. विक्रम पावाह, प्रेसिडण्ट व बीएमडब्ल्यूचे सीईओ ग्रुप इंडियाचे म्हणाले, आज, बीएमडब्ल्यू इंडियाने फर्स्ट-एव्हर बीएमडब्ल्यू एक्स१ लाँग व्हीलबेस ऑल इलेक्ट्रिक लाँच करत भारतातील प्रीमियम ऑटोमोटिव्ह सेगमेंटमध्ये धुमाकूळ निर्माण केली आहे. ही आहे बिग, ही आहे एसयूव्ही, ही आहे ईव्ही, ही आहे बीएमडब्ल्यू एक्स१ लाँग व्हीलबेस तुमच्या इच्छेनुसार दररोज प्रभुत्व गाजवण्यासाठी आली आहे. एकाच पॅकेजमध्ये व्यावहारिकता व शाश्वतता देणारी प्रीमियम ऑफरिंग निश्चितच तुमची पहिली बीएमडब्ल्यू म्हणून निवड ठरू शकते. ऐसपैस जागा, आरामदायीपणा व वैविध्यतेचे उत्तम संयोजन असलेली ही वेईकल न्यू भारतच्या वाढत्या महत्त्वाकांक्षांसाठी परिपूर्ण प्रीमियम एसयूव्ही आहे. बीएमडब्ल्यू कडून पहिली 'मेड इन इंडिया' ईव्ही असलेलीएक्स१ लाँग व्हीलबेस नाविन्यता आणि सर्वोत्तमतेच्या नवीन युगाचा आधारस्तंभ आहे.''

## आईवियर एक्सपीरियंसला नवी ओळख: लेन्सकार्टने पुण्यात मेगा स्टोअर उघडले

पुणे : भारतातील आघाडीचा ओम्निचॅनेल आयवेअर ब्रँड लेन्सकार्टने वेस्ट अव्हेन्यू कोणार्क नगर, विमान नगर येथे त्यांचे मेगा स्टोअर उघडून एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. ३,६०० चौरस फूट परिसरात पसरलेले हे आउटलेट पुणे आणि महाराष्ट्रातील लेन्सकार्टचे सर्वात मोठे आउटलेट आहे. यामुळे या प्रदेशातील आईवियर रिटेलसाठी नवीन मानके स्थापित होतील. ग्राहकांना एक आकर्षक खरेदी अनुभव देण्यासाठी डिझाइन केलेले, हे स्टोअर ५,००० हून अधिक शैलींचे आईवियर प्रदर्शित करेल, जे भारतातील इतर कोणत्याही किरकोळ विक्रेत्यापेक्षा पाच पट जास्त आहे. येथे विविध प्रकारचे आईवियर, सनग्लासेस आणि कॉन्टॅक्ट लेन्स उपलब्ध करून दिले जातील, जे वेगवेगळ्या आवडी, वय आणि आवडीनिवडी लक्षात घेऊन डिझाइन केले जातील. येथे ग्राहकांना नवीनतम ट्रेंड आणि खास कलेक्शन मिळू शकतील. त्यांना मोफत डोळ्यांच्या चाचण्या, जागेवरच दुरुस्ती आणि एक समर्पित सनरूम देखील मिळेल जिथे नैसर्गिक सूर्यप्रकाशात सनग्लासेसची प्रभावीता तपासता येईल.

## हंड्रेडने बॅडमिंटन आयकॉन श्रीकांत किदाम्बीसोबत भागीदारीची घोषणा केली

मुंबई : जागतिक क्रीडा ब्रँड हंड्रेडने बॅडमिंटन दिग्गज, पद्मश्री पुरस्कार विजेता आणि माजी जागतिक क्रमांक १ पुरुष एकेरी खेळाडू श्रीकांत किदाम्बीसोबत भागीदारीची घोषणा केली आहे. श्रीकांत किदाम्बी हे बॅडमिंटन जगतात एक आदरणीय नाव आहे. श्रीकांतसोबतच्या या सहकार्यामुळे भारतीय बॅडमिंटन बाजारपेठेत हंड्रेडची उपस्थिती मजबूत होईल. हे त्याच्या ब्रँडच्या ध्येयाचा एक भाग आहे. ही भागीदारी अधिकृतपणे इंडोनेशिया मास्टर्स २०२५ मध्ये सुरू होईल. बॅडमिंटन उत्साहींच्या नवीन पिढीला प्रेरणा आणि सक्षमीकरण देण्यासाठी हंड्रेडची वचनबद्धता हे दर्शवते. २०२४ च्या गुगल-डेलॉइट थिंक स्पोर्ट्स रिपोर्टनुसार, भारतातील नवीन पिढीमध्ये क्रिकेटनंतर बॅडमिंटन हा दुसरा सर्वात लोकप्रिय खेळ बनला आहे. श्रीकांत किदाम्बीसोबत हंड्रेडची भागीदारी भारतातील खेळाच्या वाढीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि जागतिक स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी तरुण प्रतिभेला प्रेरित करण्यासाठी ब्रँडची वचनबद्धता अधोरेखित करते. ही भागीदारी हंड्रेडच्या ध्येयाचे देखील प्रतिबिंबित करते. ते बॅडमिंटनसह भारतातील सर्व क्रीडा शाखांमध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी आणि जागतिक दिग्गजांना आव्हान देऊन कामगिरी आणि नाविन्यपूर्णतेचे नवीन मानके स्थापित करण्यासाठी काम करत आहे.

## महिला सशक्तीकरणाची प्रेरणादायी कथा सांगणारा 'सौभाग्यवती सरपंच' चा ट्रेलर लाँच

मुंबई: अल्ट्रा झकास, मराठी ओटीटी प्लॅटफॉर्म, प्रजासत्ताक दिनानिमित्त खास प्रस्तुती घेऊन येत आहे. 'सौभाग्यवती सरपंच' ही ग्रामीण भागातील महिला सशक्तीकरणाचा संदेश देणारी वेब सिरीज २२ जानेवारी २०२५ रोजी प्रदर्शित होत असून, आज या वेब सिरीजचा ट्रेलर सोशल मीडियावर लाँच करण्यात आला आहे.'सौभाग्यवती सरपंच' ही फक्त एका स्त्रीच्या यशाची कहाणी नाही, तर ती प्रत्येक महिलेच्या संघर्षाला प्रेरणा देणारी आहे. महिला सशक्तीकरण हे समाजाच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक असून, स्वातंत्र्य, शिक्षण, आणि नेतृत्व या तीन गोष्टी प्रत्येक महिलेचे हक्क आहेत हेच या वेब सिरीस मधून आपल्याला पाहायला मिळेल. एका सामान्य गृहिणीच्या कर्तृत्वाचा आणि तिच्या यशाचा प्रवास म्हणजेच 'सौभाग्यवती सरपंच'. महिला आरक्षित सरपंच पदावर निवडून आल्यानंतर एका सध्या गावातली गृहिणी कशी विकासासाठी स्वतःला झोकून देते आणि रूढीवादी मानसिकतेला कसा प्रतिउत्तर देते, याची प्रेरणादायी कथा या सिरीजमधून प्रेक्षकांच्या भेटीला येते. अवलीच्या संघर्षाचा आणि यशाचा प्रवास प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर महिलांसाठी एक संदेश ठरणार आहे - स्वप्न पाहण्याचे आणि ते पूर्ण करण्याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे.

## इंडिया मोबिलिटी ग्लोबल एक्स्पो २०२५ मध्ये नेक्स्ट-जनरेशन मोबिलिटी सोल्यूशन्सचे प्रदर्शन

पुणे: इंडिया मोबिलिटी ग्लोबल एक्स्पो २०२५ च्या दुसऱ्या दिवशी जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाने त्यांच्या ड्राइव्ह.फ्यूचर व्हिजनसह त्यांच्या नवीन तंत्रज्ञानाचे प्रदर्शन केले. कंपनीने तांत्रिक नेतृत्व मजबूत करत केस (कनेक्टेड, ऑटोनॉमस, शेअर्ड आणि इलेक्ट्रिक) तंत्रज्ञानातील क्षमता प्रदर्शित केल्या. नवोन्मेष, शाश्वतता आणि ग्राहक-केंद्रित उपक्रमांवर लक्ष केंद्रित करून, ब्रँड आधुनिक युगासाठी गतिशीलता वाढवणारे व्यावहारिक उपाय सादर करतो.ड्राइव्ह.फ्यूचर संकल्पनेला एका नवीन उंचीवर घेऊन जाताना, जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाने हायब्रिड इलेक्ट्रिक व्हेईकल्स (एचईव्ही), प्लग-इन हायब्रिड इलेक्ट्रिक व्हेईकल्स (पीएचईव्ही), बॅटरी इलेक्ट्रिक व्हेईकल्स (बीईव्ही) आणि इंटरनल कम्बशनसह इलेक्ट्रिक वाहनांची श्रेणी लाँच केली आहे.

## सेलिब्रिटी मास्टर शेफमध्ये निक्की आणि गौरवमध्ये खडाजंगी: खाण्यावरुन झाली बोलाचाली

छत्रपती संभाजीनगर - या वर्षाची खाद्य दंगल बघण्यासाठी सज्ज व्हा, कारण सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजन आपल्या प्रेक्षकांसाठी घेऊन येत आहे, एक चविष्ट रियालिटी शो 'सेलिब्रिटी मास्टरशेफ - सबकी सीटी बजेगी. हा सीझन दर सोमवार ते शुक्रवार रात्री ८ वाजता प्रसारित होणार आहे. फराह खान या सीझनची होस्ट आहे, तर रणवीर ब्रार आणि विकास खन्ना हे सेलिब्रिटी शेफ परीक्षक आहेत. मनोरंजनाचा डोस घेण्यासाठी तयार रहा कारण उषा नाडकर्णी, गौरव खन्ना, दीपिका कक्कड, तेजस्वी प्रकाश, चंदन प्रभाकर, अर्चना गौतम, निक्की तांबोळी, राजीव अदातिया, अभिजीत सावंत, फैजल शेख आणि कविता सिंह आपले ग्लॅमरस जीवन सोडून ॲप्रन आणि शेफची हॅट घालून सेलिब्रिटी मास्टर शेफ हा किताब जिंकण्यासाठी सज्ज झाले आहेत.

केवळ शेगडीच नाही, तर वातावरणच तापले आहे, कारण सगळे स्पर्धक सर्वोच्च स्थान पटकावण्यासाठी एकमेकांशी चढाओढ करत आहेत आणि प्रत्येकाला सुरक्षित राहायचे आहे. त्यातील आव्हानांच्या दबावामुळे एकमेकांवर कुरघोडी करण्याचे प्रकार देखील सुरू झाले आहेत. एका चॅलेंजमध्ये निक्की आणि गौरव यांची जोडी जुळवण्यात आली आणि एकच डिश फराह आणि परीक्षकांना सादर करायची होती. दोन्ही पैकी कोणता पदार्थ टेस्टिंगसाठी सादर करावा यावर त्यांचे एकमत झाले नाही त्यामुळे तणाव वाढला.

# नदी जोड प्रकल्पातून महाराष्ट्र दुष्काळ मुक्त करण्याचे उद्दिष्ट : राधाकृष्ण विखे पाटील

नगर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्त्वाकांक्षी नदीजोड योजनेतून महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याचे उद्दिष्ट असून,या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून अन्य पर्यायाचा विचार करण्यात येणार आहे.,विभागाच्या काही जुन्या नियमामध्ये बदल करतानाच, कृष्णा व गोदवरी खोर्याकरीता निवृत अनुभवी अधिकाऱ्यांचे सल्लागार मंडळ स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

यशदा येथे आयोजित कोकण ते इतर नदी खोऱ्यात पाणी वळविण्यासाठीच्या नदीजोड प्रकल्पांबाबत कार्यशाळेत मंत्री विखे पाटील बोलत होते. या वेळी जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था नाशिकचे महासंचालक प्रमोद मांदाडे, यशदाचे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड, उप महासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्यासह महाराष्ट्र पाणी परिषदेचे सर्व सदस्य उपस्थित उपस्थित होते.

महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याच्या दृष्टीकोनातून आणि समर्पण भावनेतून बाळासाहेब विखे- पाटील आणि स्व. गणपतराव देशमुख यांनी २५ वर्षांपूर्वी पाणी परिषदेची स्थापना केली, असे सांगून मंत्री श्री. विखे- पाटील म्हणाले, ही समर्पित भावना ठेवली तर आपण राज्य दुष्काळमुक्त करू शकतो. उपलब्ध साधनांमध्ये राज्याचे अधिकाधिक क्षेत्र सिंचनाखाली कसे आणता येईल, अधिकाधिक साधनांचा वापर करुन राज्य दुष्काळ मुक्तीकडे कशी वाटचाल करील याचा विचार सर्वांनीच करण्याची गरज असल्याचे सांगून ,हाच विचार पुढे घेऊन जाण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करत आहेत, असेही ते म्हणाले.

श्री. विखे- पाटील पुढे म्हणाले, देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रातील नदीजोड प्रकल्पांना भरीव सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांनी आता चौकटी बाहेर जाऊन तसेच व्यापक दृष्टिकोन ठेऊन विचार करण्याची आवश्यकता आहे. वरिष्ठांनी केवळ व्यवस्थापनाचे काम न करता नियमितपणे आपल्या अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन क्षेत्रपातळीवर येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाययोजनांचे प्रस्ताव मंत्रालयात सादर करावेत, येणार्या काळात विभागनिहाय आपण आढावा घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांची शेतीच्या उपलब्धतेवर आणि अडविलेल्या पाण्यावर त्यांची शेती फुलवू शकलो तर त्यांच्या जीवनामध्ये नवा आशय निर्माण करू शकतो. पाणी वितरणाच्या यंत्रणा सक्षम करुन उपलब्ध पाण्याचा वापर शेतीसाठी कसा करता येईल, यादृष्टीने व्यापक दृष्टीकोनातून विचार करावा अशाही सूचना श्री. विखे- पाटील यांनी दिल्या.

### जुन्या नियमांचा विचार करण्यासाठी समिती स्थापन करणार

पाटबंधारे विभागातील कालबाह्य झालेल्या कायदे व नियमांचा विचार करुन त्याबाबत शिफारस करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात येईल, असेही जलसंपदामंत्री म्हणाले. तसेच कृष्णा खोरे आणि गोदावरी खोऱ्याच्या स्तरावर पाणी क्षेत्रात काम केलेले वरीष्ठ अनुभवी व्यक्तींचे सल्लागार मंडळ स्थापन करण्याचीही गरज आहे, असेही ते म्हणाले. प्रत्येक महानगरपालिकेने, अ वर्ग नगरपालिका आदींना किमान त्यांचे ३० ते ४० टक्के वापर झालेल्या पाण्यावर प्रक्रिया करुन पुनर्वापर करणे गरजेचे राहील, असे धोरण आणावे लागेल. शहरांनी नद्यांमध्ये थेट मलनिस्सारणाचे पाणी न सोडता त्यावर प्रक्रिया करणे बंधनकारक करावे लागेल.

पाटबंधारे खात्याचे काम केवळ पाणी पुरविण्याचे नसून ते सुव्यवस्थित राखण्याचे दायित्वदेखील संबंधित संस्थांवर सोपवावे लागेल.

पाटबंधारे विभागाच्या आहेत त्या यंत्रणा कशा प्रकारे सक्षम करता येतील यासाठी संबंधित मंडळांच्या अधीक्षक अभियंता अधिनस्त कार्यकारी अभियंता यांनी बैठका घेऊन आराखडा तयार करावा. त्याबाबत विभागनिहाय आढावा घेण्यात येईल,

## राहाता तालुक्यातील अडीचशे लाभार्थ्यांना मिळकतपत्रिकेचे वाटप




नगर - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते स्वामित्व योजनेंतर्गत देशभरातील ६५ लाख लाभार्थ्यांना आभासी पद्धतीने मिळकतपत्रिके वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण राहाता पंचायत समिती सभागृहात करण्यात आले होते. यावेळी तालुक्यातील १०० लाभार्थ्यांना मिळकतपत्रिकाचे (प्रापर्टी कार्ड) वाटप करण्यात आले. तर तालुक्यातील इतर गावात झालेल्या शिबिरात १५० मिळकतपत्रिकांचे वाटप करण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनी विखे पाटील यांच्याहस्ते प्रातिनिधिक स्वरूपात १० लाभार्थ्यांना मिळकतकार्डचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी गटविकास अधिकारी भाऊसाहेब अहिरे, भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक योगेश थोरात आदी उपस्थित होते.

राहाता पंचायत समिती परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. स्वच्छता व नशामुक्तीची शपथ घेण्यात आली. मिळकतपत्रिका वाटप झालेले लाभार्थी गोगलगाय, आडगाव बुद्रुक व आडगाव खुर्द या गावातील होते. वाळकी, डोहाळे व निघोज या गावात शिबिराद्वारे प्रत्येकी ५० मिळकतपत्रिकेचे वाटप करण्यात आले.

## बैद्यनाथ शंखपुष्पी-एक आयुर्वेदिक ब्रेन टॉनिक




शाळेत शिकणाऱ्या प्रत्येक मुलाची व त्याच्या आई वडिलांची ही इच्छा असते की, त्यांचा मुलगा/मुलगी उत्तम गुण मिळवून पास व्हावा. त्यामुळे परिक्षेची तयारी म्हणजे एक मिशनच बनून जात. प्रत्येकच जण हे मिशन उत्कृष्ट रीतीने पार पाडू इच्छितो. परंतु भीती पोटी काही संवेदनशील मुले हया मानसिक तणावामुळे नैराश्यग्रस्त होतात.

मुलांवर हा मानसिक तणाव तीन स्तरांवर दिसून येतो. शाळेच्या प्री बोर्ड व बोर्डाची वार्षिक परिक्षा व विद्यार्थ्यांना हयाबाबत वाटणारे भय हा आज एक चिंतेचा विषय बनला आहे. कधी कधी पेपर फुटल्यामुळे अभ्यास करणाऱ्या मुलांवर टेन्शन (तणाव) अधिकच वाढतांना दिसून येते.

वेगवेगळ्या (प्रोफेशनशी) व्यवसायाशी संबंधीत स्पर्धात्मक परिक्षा देतांना, करिअर विकासाच्या तणावामुळे मुलं आत्मघाती बनत आहेत.

आजच्या या आंधळ्या (नेत्रहीन) प्रतियोगितेच्या काळात आई वडिलांच्या मुलांकडून अभ्यासा संबंधीच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. आई वडील मुलांच्या क्षमतेचा विचार न करता अपेक्षा करतात की, मुलगा एकदम मेरीट मध्येच यावा किंवा त्याने ९०% गुण मिळवावेत जेणेकरून त्यांचा समाजात रूबाब वाढेल. त्यांच्या स्टेटसचे हे एक चिन्ह बनलेले आहे. त्यांचे हे विचार मुलांवर दबाव आणून त्यांना मानसिक व्याधींनी पिडीत बनवितात किंवा मुलं, आपण हे सगळ करू शकत नाही म्हणून हीन भावनेनी ग्रस्त होतात. आणि अशावेळी त्यांना समजून घेणारे कोणीच राहत नाही.

वर वर्णित स्थितीमुळे मुलांकरिता परिक्षा म्हणजे एक भीतीदायक बाब बनून जाते. त्यांची जेवणाची इच्छा मरून जाते. चिडचिडेपणा वाढतो, सतत डोकं दुखत राहतं, कधी कधी तर नैराश्यामुळे तर तो विचित्र वागू लागतो.

आई वडिलांनी, मुलाच्या (विद्यार्थ्यांच्या) मानसिक स्थितीवर संपूर्ण लक्ष द्यायला पाहिजे. त्यांच्यावर अभ्यासाचा आवश्यकते पेक्षा जास्त भार देऊ नये किंवा त्याची क्षमता पाहून त्यांना अभ्यास करावयास लावावं व त्यासोबत त्याला योगासन करावयास लावावे व हया सोबत हानीरहीत आयुर्वेदिक जडीबुटी (ब्राम्ही व शंखपुष्पी) वापराव्यात. हयाच ब्राम्ही व शंखपुष्पीच्या मिश्रणाने बनलेला योग बैद्यनाथ शंखपुष्पी सिरप मुलांना दयायला हवे. ब्राम्ही व शंखपुष्पी ला सेन्ट्रल ड्रग रिसर्च इंस्टीट्युट ने एकाग्रता वाढविण्यास सहाय्यक जडी बुटीच्या रूपात मान्यता दिली आहे. ब्राम्ही व शंखपुष्पीचे सिरप मुलांना दिल्यास त्यांना परिक्षेच्या वेळी होणारी डोके दुःखी, चिडचिडेपणा दूर होऊन मुले शांत मनस्थितीने कार्य करण्यात रूची दाखवितात.

श्री बैद्यनाथ आयुर्वेद भवन मध्ये शंखपुष्पी सिरप ची निर्मीती आयुर्वेद तज्ञांच्या देखरेखीत व आयुर्वेद ग्रंथात वर्णित विधी ने केली जाते.

## टीजेएसबी सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची बिनविरोध निवड

### अध्यक्षपदी शरद गांगल तर, उपाध्यक्षपदी वैभव सिंघवी यांची निवड



ठाणे, दि. १८ जानेवारी : देशात नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रात सातत्याने आघाडीवर असणाऱ्या टीजेएसबी सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध झाली. सदर संचालक मंडळाचा कालावधी २०२४- २५ ते २०२९-३० असा पाच वर्षांसाठी आहे. शरद गांगल, वैभव सिंघवी, शैलेंद्र खांडेकर, रामदास हेगडे, पवनकुमार माहेश्वरी, समीर पाटणकर, सचिन ताटके, डॉ. अश्विनी बापट, पौर्णिमा रानडे, कवी आरसीव्ही शेषाचलम, आणि भाऊसाहेब गायकवाड यांची बिनविरोध निवड झाली आहे.

संचालक मंडळाच्या निवडीसह बँकेच्या अध्यक्षपदी शरद गांगल तर, उपाध्यक्षपदी वैभव सिंघवी यांची निवड झाली आहे. नवनिर्वाचित अध्यक्ष शरद गांगल हे सहकार भारती या सहकारी क्षेत्रात कार्यरत असलेल्या संघटनेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य असून, संघटनेच्या महाराष्ट्र राज्य बँकिंग प्रकोष्टचे प्रमुख आहेत. १९८४ पासून मनुष्यबळ विकास तज्ज्ञ क्षेत्रात कार्यरत असणारे शरद गांगल टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस ( Tata Institute of Social Sciences ) या संस्थेतील ह्युमन रिसोर्स येथे तसेच, स्टोकहोम स्कुल ऑफ इकोनिमिक्स ( Stockholm School Of Economics ) च्या व्यवस्थापन विकास अभ्यासक्रमात ( Management development Program ) टॅलेंट मॅनेजमेंट ( Talent Management ) या विषयावर अध्यापन करत आहेत. शरद गांगल वर्ष १९९७ ते २००९ दरम्यान टीजेएसबी सहकारी बँकेचे संचालक होते. वर्ष २०१९ पासून ते बँकेचे संचालक, उपाध्यक्ष आणि अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. नागरी सहकारी बँकिंगचा अनुभव असलेल्या शरद गांगल यांची पुन्हा टीजेएसबी सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी सलग दुसऱ्यांदा नियुक्ती करण्यात आलेली आहे.

उपाध्यक्षपदी निवडलेले वैभव सिंघवी हे गेली पंचवीस वर्ष सनदी लेखापाल म्हणून कार्यरत आहेत. वैभव सिंघवी हे विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयात पंधरा वर्ष प्राध्यापक होते. पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमात सीए वैभव सिंघवी यांची वीसपेक्षा अधिक पुस्तके आहेत. सामाजिक कार्यात सहभागी असणारे वैभव सिंघवी वर्ष २०१९ पासून बँकेचे संचालक म्हणून कार्यरत होते. वर्ष २०२२ पासून वैभव सिंघवी बँकेचे उपाध्यक्ष होते. वैभव सिंघवी यांची टीजेएसबी सहकारी बँकेच्या उपाध्यक्षपदी फेरनियुक्ती करण्यात आलेली आहे.

बँकेच्या संचालक मंडळात लेखा परिक्षक, उद्योजक, मनुष्यबळ विकास, विधिज्ञ, आर्थिक-सहकार-बँकिंग जाणकार आणि सामाजिक कार्यकर्ते अश्या विविध क्षेत्रातील घटकांचा समावेश आहे.

टीजेएसबी सहकारी बँकेच्या महाराष्ट्र, गोवा, गुजरात, कर्नाटक आणि मध्य प्रदेश अश्या पाच राज्यात एकशे त्रेचाळीस शाखा आहेत. बँकेचा एकूण व्यवसाय बावीस हजार कोटींपेक्षा अधिक आहे. बँकेतून अत्याधुनिक तंत्रज्ञान आधारित सर्व प्रकारच्या सेवा दिल्या जातात.

टीजेएसबी सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक बहुराज्यीय सहकारी संस्थाच्या वर्ष २००२ च्या कायद्यानुसार झाली. ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी अशोक शिनगारे यांनी मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून तर, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे डॉ. किशर मांडे यांनी सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून काम पहिले. बँकेच्या दिनांक नऊ जानेवारी रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी बिनविरोध निवडून आलेल्या संचालक मंडळाची घोषणा केली.

## १३ गोवंशीय जनावरांची सुटका एलसीबीची कर्जतमध्ये कारवाई



नगर : कर्जत पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंद्यांची माहिती घेत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे कर्जत शहरातील भीम नगर भागात एका पत्र्याच्या शेडमध्ये गोवंशीय जनावरे कत्तल करण्याच्या उद्देशाने निर्दयीपणे डांबून ठेवल्याचे निदर्शनास आले. यामध्ये ४ गायी, ८ गोवंश जातीची वासरे व १ कालवड असा एक लाख पस्तीस हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपी रेब्बीसलाम

मोहम्मद कुरेशी, रा. कर्जत याचे विरुद्ध महाराष्ट्र पशुसंव रक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी विवेकानंद वाखारे यांच्या सूचना व मार्गदर्शनानुसार एलसीबीचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

## अवैध वाळू वाहतुकीवर एलसीबीची कारवाई; २५ लाखांचा मुद्देमाल जप्त



नगर : पाथर्डी तालुक्यातील हनुमान टाकळी येथील वृद्धा नदीपात्रातील वाळू जेसीबीच्या सहाय्याने उपसा करून वाहतूक करत असल्याची गुप्त बातमी मिळाली असता पंचांसमक्ष खात्री झाल्यानंतर दोन संशयित इसम जेसीबीच्या सहाय्याने वाळू उपसा करून ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये भरत असताना आढळून आले. याप्रकरणी बाळू भानुदास जाधव व संतोष भानुदास जाधव यांचे विरुद्ध पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

## खुलताबाद तालुक्यात भाजप सदस्य नोंदणी अभियानांतर्गत जास्तीत जास्त नोंदणी करा : प्रकाश वाकळे

तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी : पंतप्रधान नरेंद्र मोदी भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्ष जे पी लड्डा केंद्रीय गृहमंत्री अमित भाई शहा यांच्या आदेशाने.



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस भारतीय जनता पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे मंत्री अतुल सावे .गंगापूर खुलताबाद, विधानसभा ,,मतदारसंघाचे भाजपा आमदार प्रशांत बंब . यांच्या मार्गदर्शनाखाली वेरूळ येथील नाथ, आश्रम प्रमुख साध्वी अक्का ताई महाराज यांची भाजपाच्या सदस्य म्हणून नोंदणी करतानी छत्रपती संभाजी नगर भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे खुलताबाद भाजपा तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे भाजप तालुका विस्तारक गणेश हजारी, सतीश दांडेकर शहराध्यक्ष परसराम बारगळ .संतोष करपे पाटील विठ्ठल गोम लाडू सुनील मानघरे ज्येष्ठ नेते सुखदेव ठेंगडे पाटील पुंजाराम धोत्रे यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद**

कि.दि.अर्ज क्र.९०/२०२४

अर्जदार : १) साहेबसिंग हिरालाल सुलाने वय ४३ वर्षे, धंदा. शेती, रा. पाचपीरवाडी ता. गंगापुर जि. औरंगाबाद २) ढवळाबाई भ्र. प्रल्हादसिंग ठाकुर वय ५२ वर्षे, धंदा. घरकाम, रा. सागरवाडी ता. बदनापुर जि. जालना ३) झुंबरबाई भ्र. इंद्रजित नागलोद, बय ६४ वर्षे धंदा घरकाम, रा. त्रिमुर्ती चौकाजवळ, जवाहर कॉलनी रोड, प्लॉट नं. २०, न्यु शांतिनिकेतन कॉलनी औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : ओमकार पि. धरमसिंग सुलाने, वय १७ वर्षे, धंदा शिक्षण अ.पा.क. आई चंपाबाई धरमसिंग सुलाने, रा. एरिगेशन कॉलनी, मोतीबाग जवळ, जालना ता. जि. जालना

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. ए.वी. कुलकर्णी यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.२ व ३ ह्या आपसांत नात्याने सख्या बहिणी असुन अर्जदार क्र.१ हा त्यांचा भाऊ आहे. तसेच गैरअर्जदार हा अर्जदार क्र.१ ते ३ यांचा मयत भाऊ नामे धरमसिंग हिरालाल सुलाने यांचा मुलगा आहे. अर्जदार क्र.१ ते ३ यांची आई व गैरअर्जदार याची आजी (वडीलांची आई) नामे पुतळाबाई हिरालाल सुलाने ह्या मौजे पाचपीरवाडी ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथील रहिवाशी होत्या, त्या दिनांक २१/०७/२०२३ रोजी मौजे पाचपीरवाडी ता. गंगापुर येथे मयत झालेल्या आहे. तसेच अर्जदार क.१ ते ३ यांचे वडील व गैरअर्जदाराचे आजोबा (वडीलांचे वडील) नामे हिरालाल मेहताबसिंग सुलाने हे देखील दिनांक ३१/०५/२०१५ रोजी मयत झालेले आहे. तसेच मयत हिरालाल मेहताबसिंग सुलाने व पुतळाबाई हिरालाल सुलाने यांचा मुलगा, अर्जदार क्र.१ ते ३ यांचा भाऊ व गैरअर्जदाराचे वडील नामे धरमसिंग हिरालाल सुलाने हे दिनांक १९/०२/२०१८ रोजी मयत झालेले आहे. मयत पुतळाबाई हिरालाल सुलाने यांना अर्जदार क्र.१ ते ३ व गैरअर्जदार हे कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयत पुतळाबाई हिरालाल सुलान यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन मयताचे मृत्यु पश्चात शासकीय व निमशासकीय कामसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्यानी आज दिनांक १८/६/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सासरच्या मंडळीकडून विवाहितेचा छळ करून क्रूरपणे केला खून

## पतीसह सासरकडील मंडळींना पोलिसांनी ठोकल्या बेड्या

सिल्लोड प्रतिनिधी

सिल्लोडमध्ये शास्त्री कॉलनी भागातील रहिवासी मनीषा सतीश सपकाळ वय २४ वर्षे हिचा तिच्या सासरच्या मंडळीकडून मानसिक छळ करून क्रुरपणे खून केल्याची घटना नुकतीच घडली असून त्या घटनेने सिल्लोड शहरात एकच खळबळ उडाली आहे.

सविस्तर माहिती अशी की, सिल्लोड शहरात शास्त्री नगर भागात राहणारे नामे लक्ष्मण कडुबा सपकाळ हे एसटी महामंडळामध्ये कंट्रोलर म्हणून कार्यरत होते. ते सेवानिवृत्त झालेले असून त्यांचा मुलगा सतीश लक्ष्मण सपकाळ याचा विवाह कन्नड तालुक्यातील रामपूर वाडी येथील रहिवासी नामे खंडु किसन शेळके वय ४७ वर्ष व्यवसाय शेती यांची मुलगी मयत मनीषा किसन शेळके तिच्याशी तीन-चार हिंदू धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे झाला होता. मनीषाला मूलबाळ झालेले नव्हते मात्र ती आज रोजी गरोदर होती. मनीषा ही सिल्लोड मध्ये एका फायनान्स कंपनीत कर्मचारी म्हणून कार्यरत सुद्धा होती.



दिनांक:१७/०१/२०२५ रोजी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मनिषाचा तिच्या सासरकडील मंडळींनी तिचा शारीरिक व मानसिक छळ करून अत्यंत क्रूरतेने खून केला असल्याने या घटनेने सिल्लोड शहरात एकच खळबळ उडाली आहे.

ही बातमी तिच्या आई-वडिलांना कळतात आई-वडील नातेगोते यांनी सिल्लोड शहर पोलीस स्टेशन गाठून आमच्या मुलीचा खून करणाऱ्याला आमच्या समोर उभं करा असा हट्ट धरला पोलीस स्टेशनमध्ये मोठा जमाव जमा झाला होता. मनीषाचा खून का आणि कशासाठी करण्यात आला हे मात्र पोलीस तपासात निष्पन्न होईलच परंतु एवढ्या क्रूरतेने गरोदर असल्याचे माहित असून सुद्धा मनीषा च्या पोटावर जबर मारहाण केल्याचे फिर्यादीने दिलेल्या तक्रारी म्हटले आहे. गरोदर मयत मनीषाचा पती, सासरा, सासू यांनी खून करून तिला संपवणे म्हणजे माणुसकी जिवंत राहिली का? हा प्रश्न आज रोजी निर्माण होत आहे.

मयत मनीषाचे वडील खंडु किसन शेळके वय ४७ वर्ष राहणार रामपूर वाडी तालुका कन्नड यांच्या फिर्यादीवरून मनीषाचा खून करणारे तिचे मारेकरी तिचा आरोपी पती ०१) सतिश लक्ष्मण सपकाळ, सासरे ०२)लक्ष्मण कडुबा सपकाळ, सासू ३) लिलाबाई लक्ष्मण सपकाळ सर्व रा. शास्त्रीकॉलनी यांच्याविरुद्ध कलम १०३ (१), १०५,८०(२), ८५, ११५(२), ३५२,३५१(२),३(५)बी. एन.एस या कलमान्वये गुन्हा दाखल झाला असून आरोपींना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक शेषराव उदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक जाधव, पोलीस उपनिरीक्षक कायंदे हे करत आहे.

## कै .गुरुदयालसिंग राठोड आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना निरोप




तभा वृत्तसेवा


कन्नड -दि.१८ जानेवारी - तालुक्यातील कै. गुरुदयालसिंग राठोड माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेच्या १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ दि.१७ रोजी संपन्न झाला. या वेळी सेवा निवृत्त केंद्रप्रमुख साईदास राठोड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले ते म्हणाले की जीवनात यशाला कोणताही शॉर्टकट नाही. कष्ट केल्याशिवाय काहीच मिळू शकत नाही. योग्य वयात जीवन समृद्ध करण्यासाठी प्रयत्न करा, थोर पुरुषांची जीवन चरित्रे वाचा त्यामुळे तुम्हाला यशाचा मार्ग निश्चित सापडेल . असे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांनी आपले अनुभव व्यक्त केले. आश्रमशाळेचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक बी.एफ. जाधव यांनी विद्यार्थ्यांना भावी जीवनामध्ये येणाऱ्या आव्हानांना तोंड कशा पद्धतीने द्यावे याचा कानमंत्र दिला . शिक्षक कामेश महाजन, प्रा.चंद्रशेखर शिंदे .सहशिक्षिका अनिता राठोड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव प्रवीण राठोड, प्रमुख पाहुणे म्हणून साईदास राठोड (सेवानिवृत्त केंद्रप्रमुख ) , श्री बी. एफ. जाधव ( सेवानिवृत्त मुख्याध्यापक ) ,माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक शेखर मांडे प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक ताराचंद राठोड ,वसतिगृहाचे अधीक्षक बद्रीनाथ जाधव , शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. अशोक दूधकर , तर आभार प्रा.नंदुलाल कुच्चे यांनी मानले.

**आनंद नगरीचे आयोजन**

दि. १८ रोजी कै. गुरुदयालसिंग राठोड प्राथमिक , माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेच्या प्रांगणात आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले होते .संस्थेचे सचिव प्रवीण राठोड यांच्या हस्ते या उत्सवाचे उद्घाटन करण्यात आले .

## संघ हीच जीवनगाथा



### अलक (१७) सौभाग्य

सरसंघचालकपदी विराजमान झालेल्या सर्वांनीच या हिंदू संघटनेला अपार विस्तार मिळावा म्हणून अथक प्रयत्न केले आहेत. धार्मिक शैक्षणिक सामाजिक राजकीय-सांस्कृतिक व साहित्य क्षेत्रात संघाच्या अनेक संघटना स्थापन झाल्या आहेत. त्यांची ओळख आपण अलक मधून करून घेऊच. आज देश-विदेशात हिंदु संमेलने भरतात. १९६६ च्या विश्व हिंदू संमेलनात मठाधिपती- धर्माचार्य - हिंदू धर्म किंवा हिंदू दर्शनचे प्रतिनिधित्व करणारे- प्रमुख साधू एकाच व्यासपीठावर व एकाच मंडपात होते. तिथे गगनभेदी गडगडाटात न हिंदुः पतितो भवेत या मंत्राचे स्वागत केले. आजही शीख, वीरशैव, जैन, बुद्ध आदि धर्मगुरू एकाच व्यासपीठावर बसतात. व सारेजण एकात्मता मंत्र म्हणतात.

तो मंत्र आहे. यं वैदिका मंत्रदृशः पुराणा इन्द्रं यमं मातरिश्वानमाहुः । वेदान्तिनोऽनिर्वचनीयमेकं यं ब्रह्मशब्देन विनिर्दिशन्ति ।।१।। शैवायमीशं शिवइत्यवोचन् यं वैष्णवा विष्णुरिति स्तुवन्ति । बुद्धस्तथाऽर्हन्निति बौद्धजैनाः सत्-श्री-अकालेति च सिक्खसन्तः ।।२।। शास्तेति केचित् प्रकृतिः कुमारः स्वामीति मातेति पितेति भक्त्या। यं प्रार्थयन्ते जगदीशितारं स एक एव प्रभुरद्वितीयः ।।३।।

त्याचा भावार्थ असा
की सर्वांचा प्रभू
म्हणजे ब्रम्ह एकच
आहे. फक्त प्रत्येक
जण आपल्या प्रभूची
वेगवेगळ्या नावाने
पूजा करतो. या सर्व
देवांना आम्ही
भक्तीने वंदन करतो.

(क्रमशः)

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## पोषण भी पढाई भी अंतर्गत तीन दिवसीय प्रशिक्षण संपन्न

तभा वृत्तसेवा

कन्नड, दि.१८ जानेवारी - एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कन्नड अंतर्गत पोषण भी पढाई भी अंतर्गत अंगणवाडी सेविका यांचे तीन दिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले होते .या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा कार्यक्रम अधिकारी सुवर्णा जाधव यांच्या हस्ते करण्यात आले . यावेळी बालविकास प्रकल्प अधिकारी निलेश राठोड , सर्व सुपरवायझर उपस्थित होते . अंगणवाडी मध्येच शून्य ते सहा वयोगटातील बालकांचा ८५ टक्के मेंदूचा विकास हा होत असतो हा मुद्दा लक्षात घेऊन या कालावधीतील बालकांचे ज्या पद्धतीने पोषण हे अतिशय महत्त्वाचा घटक आहे त्याच पद्धतीने त्यांचा बौद्धिक,सामाजिक भावनिक विकास होण्याकरिता अंगणवाडी मार्फत पूर्व शालेय शिक्षण ही तितकेच अतिशय महत्त्वाचे आहे हा उद्देश समोर ठेवून पोषणा सोबत पढाई भी ह्या थीम अंतर्गत अंगणवाडी सेविका यांचे तीन दिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले होते.



**पोषण भी पढाई भी अंतर्गत तीन दिवसीय प्रशिक्षण मध्ये आम्हाला उपयुक्त असे ट्रेनिंग देण्यात आले याचा फायदा नक्कीच आमच्या अंगणवाडीतील बालकांचा बौद्धिक विकास करण्यासाठी आम्हाला होईल याची खात्री वाटते.**

**शितल कासलीवाल अंगणवाडी सेविका वासडी**

**पोषण भी पढाई भी या थीम अंतर्गत अंगणवाडी सेविका यांना तीन दिवसीय प्रशिक्षण देण्यात येत आहे या प्रशिक्षणाचा फायदा घेऊन भविष्यात पूर्व शालेय शिक्षणाच्या माध्यमातून अंगणवाडी सेविका बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करतील अशी खात्री वाटते.**

**निलेश फुलचंद राठोड**
**बाल विकास प्रकल्प अधिकारी कन्नड**

## आ. सतीश चव्हाण यांची राष्ट्रवादीत घरवापसी



गंगापूर दि.१८ : विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत मराठवाडा पदवीधर मतदार संघाचे आमदार सतीश चव्हाण यांनी शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केल्यानंतर काही दिवसातच त्यांनी पुनश्च राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने शिर्डी येथे आयोजित करण्यात आलेल्या 'नव संकल्प' शिबीरात आज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष मा.खा.सुनीलजी तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत पुनश्च प्रवेश केला. गंगापूर खुलताबाद मतदार संघातून विधानसभेसाठी महाविकास आघाडीच्या तिकिटावर निवडणूक लढवली होती अटीतटीच्या लढतीत तुरळक मताने पराभव पत्करावा लागला होता. त्यांनी पुन्हा शरदचंद्र पवार पक्षाला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत जाहीर प्रवेश केला आहे. आता पुन्हा आमदार सतीश चव्हाण गंगापूर खुलताबाद मतदार संघात जोमाने कामाला लागणार असे चित्र दिसत आहे.


## नेहरू युवा केंद्र छत्रपती संभाजीनगर मार्फत रांजणगाव खुरी येथे राष्ट्रीय युवा दिवसानिमित्त प्रश्नमंजुषा कार्यक्रमाचे आयोजन



बिडकीन दि १८ जानेवारी : युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत मेरा युवा भारत, नेहरू युवा केंद्र छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत व शिवसेवा बहुउद्देशीय संस्था यांच्या सहकार्याने व जिल्हा युवा अधिकारी संकल्प शुक्ला सर यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजी विद्यालय रांजणगाव खुरी येथे राष्ट्रीय युवा दिवसा निमित्त स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर आधारित प्रश्नमंजुषा कार्यक्रम घेण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्ष व मार्गदर्शक म्हणून विद्यालयाचे मुख्याध्यापक पायघन सर यांची उपस्थिती होती तर प्रमुख पाहूणे म्हणून कार्यक्रम समन्वयक पंकज धुळे,ए आर काचोळे सर, आर डी ढगे सर, जी एस चव्हाण सर, आर पी सावंत सर, व्ही के करपे सर, व्ही आर राठोड सर, एस आर वल्ले सर, आर एन जाधव सर आदींची उपस्थिती होती. स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर आधारित घेण्यात आलेल्या प्रश्नमंजुषे प्रथम क्रमांक मंजुषा सुरडकर, द्वितीय क्रमांक वैष्णवी मगर तर तृतीय क्रमांक निकिता ढगे यांनी मिळवला. कार्यक्रमाच्या यशस्वीसाठी नेहरू युवा केंद्र कार्यक्रम समन्वयक पंकज धुळे, आर के पवार सर, संकेत मोरे, आष्टांग पंडित, राहुल धुळे, वैभव जाधव यांनी परिश्रम घेतले.

## प्रसिद्ध दिग्दर्शक फराह खान यांना ऐकण्याची संधी

छत्रपती संभाजीनगर, दि.१८ : जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठवाड्यातील रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात अभिनेत्री, निर्माती, दिग्दर्शक, नृत्य दिग्दर्शक फराह खान यांच्या मास्टरक्लास'चे रविवार, दिनांक १९ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ०३:३० वाजता स्क्रीन ४, प्रोझोन मॉल येथे आयोजन करण्यात आले आहे. या नंतर होणाऱ्या समारोप सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून त्या उपस्थित राहणार आहेत.



आज बॉलिवूडमध्ये अनेक नृत्यदिग्दर्शक असूनही या सर्वांमध्ये प्रसिद्ध असलेले नाव म्हणजे फराह खान होय. एक उत्तम कोरिओग्राफर असण्यासोबतच ती एक उत्तम दिग्दर्शिका देखील आहे. मागील अनेक दशकांपासून फराह या क्षेत्रात कार्यरत आहे. आपल्या प्रतिभेच्या जोरावर त्यांनी बॉलीवूडमध्ये मोठा नावलौकिक कमावला आहे. फराह खान यांनी कोरिओग्राफर म्हणून दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे, दिल तो पागल है, दिल से,कुछ कुछ होता है,कहो ना प्यार है,कभी खुशी कभी गम,मोहबत्ते,दिल चाहता है, कल हो ना हो,क्रिश आदी चित्रपटांसाठी नृत्यदिग्दर्शन केले आहे.

नृत्य दिग्दर्शक फराह खान यांना ऐकण्याची संधी या मास्टरक्लासच्या माध्यमातून अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील रसिकांना उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

## सोयगाव शहरातील समाजसेवक, शेतकरी अरुण सोहनी यांना कृषीभूषण,सेवा गौरव पुरस्कार जाहिर

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१८ जानेवारी



शहरातील समाजसेवक,शेतकरी व सामाजिक बांधिलकी जपणारे शेतकरी अरुण श्रीराम सोहनी त्यांना कृषीभूषण, सेवा गौरव पुरस्कार जाहीर झाला असून लवकरच एका भव्य कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार छत्रपती संभाजी नगर येथे देवून सन्मानित करण्यात येणार आहे.

सोयगाव शहरात त्यांचे सामाजिक कार्यात असलेले योगदान आणि सामाजिक बांधिलकी जपत सेवाभावी वृत्तीने झोकून देत केलेल्या त्यांच्या कार्याची दखल माणुसकी समूहाच्याच सु-लक्ष्मी बहुउद्देशिय सेवाभावी संस्थेने घेतली आहे.

या माणुसकी समुहाच्या ८ व्या वर्धापन दिना निमित्त आणि कु.लक्ष्मी सुमित पंडीत हिच्या १० व्या वाढदिवसा निमित्त महाराष्ट्रातील सामाजिक, युवा, क्रीडा, कला, पत्रकारिता, आरोग्य सेवा, उद्योग, कृषि, सांस्कृतीक, साहित्य व संगीत,प्रशासकीय क्षेत्रातील उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या गुणी जणांना सेवागौरव पुरस्काराने सन्मानित केले जाते. अरुण सोहनी हे सामान्य नागरिकांत विश्वास दृढ केला आहे.या त्यांच्या सर्व कार्याची दखल घेवून त्यांना कृषी भूषण सेवा पुरस्कारासाठी निवड केल्याचे पत्र संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुमित पंडित आणि सचिव पूजा पंडित यांनी देत त्यांचे अभिनंदन केले आहे. लवकरच एका भव्य कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.तर या पुरस्कारा बद्दल शेतकरी अरुण सोहनी यांचे त्यांच्या हितचिंतक ,मित्रमंडळी,नातेवाईक,शेतकरी आणि पत्रकार व व्यापारीऱ्यांनी अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

## गोड गोड बोला, गीता पठण करा तिळगुळ समारंभात महिलांचा संदेश



तभा वृत्तसेवा

पैठण दि १८ :- पैठण दक्षिण काशीतील श्रीक्षेत्र पैठण येथील रंगाराहाट्टी गल्लीत मकरसंक्रांत उत्सव कालीका माता महिला मंडळाच्या वतीने बाल गोपाल, मुलामुलींना गोडगोड बोला भगवत गीतापठण करा असा नारा देऊन आगळ्या वेगळ्या पद्धतीने हा सोहळा साजरा करण्यात आला. या वेळी अश्विनी ठोंबरे, सुचिता गोजरे, प्रिया जोशी, कविता गोजरे, योगिता वरकड,राणी गोजरे, सुवर्णा सारडा, यांनी मनोगत व्यक्त केले हा सण यशस्वी करण्यासाठी पूनम जैस्वाल, सुवर्णा उफाड, मयुरी जाधव, रजिता दायमा, पुजा असोलकर, प्रिती कुलकर्णी, कल्पना परागे, शारदा कुलकर्णी, यांनी परिश्रम घेतले ऋणानुबंध महिला मंडळाच्या वतीने घरोघरी जाऊन वयोवृद्ध आजीआजोबांचे तोंड गोड करून त्यांना वानाचा प्रसाद देऊन त्यांचे आशीर्वाद घेण्यात आले. आजी आजोबांनी उखाणे म्हणून महिलांना आनंद दिला या वेळी राजेश्री देशमुख, सुरेखा घुले, रोहिणी देशमुख, सुरेखा वरकड, वैशाली खेडकर, अलका गोजरे, कल्पना खिस्ती, अश्विनी राऊत, पुजा तोडकर, अंजली कुलकर्णी, मुक्ता खरे, स्मिता कस्तुरे, रेणुका खिस्ती, रमा घुले, सविता पवार आदी महिला उपस्थित होत्या.यावेळी महिलांनी श्री सूक्त व राम रक्षा पठन करण्यात आले पैठण शहरात अठोडाभर मकर संक्रात उत्सव साजरा केला जातो

## सोयगाव शहरात रक्तदान शिबिर संपन्न; जगद् गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान प्रतिवर्षी रक्तदान महायज्ञ

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१८ जानेवारी

जगद् गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान तर्फे दरवर्षी रक्तदान महायज्ञाचे आयोजन केले जाते.प्रतिवर्षाप्रमाणे दि.४ जानेवारी २०२५ ते १९ जानेवारी पर्यंत रक्तदान महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. आपल्या महाराष्ट्रात सिकलसेल, निमिया,हिमोफिलीया,थॅलेसेमिअा,ब्लड कॅन्सर,किडनी,फेल्युअर पेशंट जास्त आढळतात.अशा रुग्णांना वारंवार रक्ताची निनांत आवश्यकता असते यासाठी महाराष्ट्र शासनाच्या रक्तपेढयांना रक्तबाटल्या देण्याचे आमच्या संप्रदायामार्फत निश्चित केले आहे. आपल्या दैनंदिन जीवनातील फक्त पाच मिनिटे रक्तदानासाठी आवश्यक आहेत तुमच्यासाठी ते आहे फक्त दान मात्र गरजुंसाठी ते आहे जीवनदान स्वतःबरोबर आपल्या मित्र व नातेवाईकांस या महान रक्तदान कार्यासाठी तयार करून सोयगाव परिसरात नागरिकांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान केल्याचे जगद् गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानचे संप्रदायांनी सांगितलं.



हे शिबिर सोयगाव शहरातील ग्रामीण रुग्णालय येथे दि.१८ शनिवार रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत आयोजित केले होते.या शिबिराचे उद्घाटन श्री स्वामी समर्थ पतसंस्थेचे अध्यक्ष ड.राजेश गिरी यांच्या हस्ते करण्यात आले.रक्तदान शिबिरासाठी सोयगाव शहरातील व परिसरातील व्यापारी वर्ग,विविध पक्षाचे पदाधिकारी, पत्रकार,उपस्थित होते.तर

या शिबिरासाठी जळगाव येथील आरोग्य सेवा मेडिकल फाउंडेशन जळगाव संचालित रेडप्लस ब्लड सेंटर येथील डॉ. रवींद्र पाटील,डॉ.वशिम शेख,चेतन काळे सह दिपक पाटील,दानिश खान,अमोल पाटील,शहारुख शहा,निलेश धनगडे,गोपाल शिंदे,वैभव देशमुख,भावेश रोकडे,रेनकर मॅडम,रजनी मॅडम यांचे मोलाचे योगदान लाभले होते.तसेच सोयगाव शहरातील संप्रदायाचे पंधरा ते वीस दिवसापासून अहोरात्र करून आपण सर्वांनी रक्तदान करूया ही संकल्पना पूर्ण करूया असे ही योजना राबवणारे हेमंत नाना,गणेश गायकवाड,योगेश राऊत,विष्णू पंडित,रामदास गवळी,योगेश चौधरी,जगन्नाथ खडसे,गणेश कापरे,सुभाष उबाळे,अरुण सोहनी, दीपक काळे,हरीश राजपूत,कमलेश सोनवणे,बापू म्हणाले,विमल सोनवणे,नीता इंगळे आदींसह संप्रदायाचे बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण यांचा बिडकीन भाजप कार्यकर्त्यांच्या वतीने सत्कार



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि. १८ जानेवारी : पैठण तालुक्यातील बिडकीन गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण यांनी दि. १५ जानेवारी रोजी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे,कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार अनुराधाताई चव्हाण, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत बिडकीन सर्कल मधील असंख्य कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश केल्याने आज दि. १७ जानेवारी रोजी सायंकाळी बिडकीन भाजप कार्यालय मध्ये माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण यांचा बिडकीन भाजप कार्यकर्ते च्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी ज्येष्ठ कार्यकर्ते गणेश काळे, गणेश दाणे,भागचंद कोथिबिरे, उपसरपंच दत्ता बांडे, सुनील गडदे,भागवत ठाकुर, किशोर धर्मे, दिगंबर सर्जे, रामभाऊ खणसे, भगवानराव नारळकर, बाबासाहेब धर्मे, गणेश चिरेकर, चंद्रकांत हुड, मनोज राठोड, चरणसिंग राठोड, मच्छिंद्र भालेकर, गोकुळ कांबळे, विठ्ठल मोगल, सोमनाथ खराडकर, अभिजित ढाकेफळे, आबासाहेब धर्मे, बाबासाहेब वीर, मच्छिंद्र भोगाडे , राजू दाणे, सचिन राऊत, सुभाष दुबे, आदी कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गोवा राष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी छत्रपती संभाजीनगरचा संघ सज्ज

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १८ जानेवारी : राष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी छत्रपती संभाजीनगरचा संघ सज्ज गोवा पोंडा स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे १८ व १९जानेवारी २०२५ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्यातील ३१ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.मिशन मार्शल आर्ट्स अँड वुशु कुंग-फु स्पोर्ट्स कराटे असोसिएशन (इंडिया) यांच्या वतीने मार्शल आर्टस ट्रेनिंग सेंटर नक्षत्रपार्क,पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर येथे नुकतीच विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. हे सर्व विद्यार्थी कराटे कुमिते /व काता या प्रकारामध्ये स्पर्धा खेळणार आहेत. स्पर्धेचे आयोजन ट्रॅडिशनल कराटे डो ओकिनावा अँड कुबडो कैकोकाय गोवा इंडिया या संघटनेचे राज्यअध्यक्ष दिपक कुराडे, व रेंशी अयान चक्रबत्ती यांच्या वतीने करण्यात आली आहे.



मिशन मार्शल आर्ट्स असोसिएशन छत्रपती संभाजीनगर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मास्टर पवन घुगे, सचिव व मुख्य कराटे प्रशिक्षक प्रविण घुगे, महिला प्रशिक्षिका नंदा घुगे ,राधा घुगे, यांचे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन लाभत आहेत. निवड झालेले विद्यार्थी कु. तनुश्री घुगे, अनुश्री घुगे, ओजस्वी बारगजे, आर.अरुंधती,ऋतुजा भालेराव, तनुश्री राठोड, ओवी पाटील, सॉची लहाने, आश्लेषा रिडलॉन, जोहा सय्यद, नव्या दरगड, समीक्षा जांभळकर, स्वनिका जैन,ओजस्वी करांडे, आयुष ठाणगे, रुत्विक जोशी, जय राठोड, अभिजित देशमुख, अर्णव रिडलॉन, गजराज चावरिया, स्वराज गायकवाड, रुद्र चव्हाण, वीरेंद्र राठोड, मयूर चव्हाण, श्रेयश पेरे.या सर्व विद्यार्थ्यांना कराटे प्रशिक्षिका कोमल राठोड, ऋतुजा रणवाळकर, व कराटे प्रशिक्षक शाम बुधवंत, राम बुधवंत, राम चौरे,गौरव टोकटे, कृष्णा कानडे,व पालक वर्ग यांनी राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## काटेपिंपळगावात कायदेविषयक शिबिर संपन्न; विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच ग्रामस्थांना कायदेविषयक मार्गदर्शन



तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.१८: तालुका विधिसेवा समिती आणि पंचायत समिती गंगापूर यांच्या संयुक्त विद्यमाने काटे पिंपळगाव येथे ( दि.१५ ) कायदेविषयक शिबिर संपन्न झाले.

कायदेविषयक शिबिरास गंगापूर येथील दुसरे सह दिवाणी न्यायाधीश ए.बी. इंगोले, यांनी मार्गदर्शन करताना त्यांनी बेटी बचाव बेटी पढाव या विषयावर उपस्थित विद्यार्थी ग्रामस्थांना कायदेविषयक मार्गदर्शन केले ते म्हणाले पालकांनी आणि समाजाने मुलींना शैक्षणिक व आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवावे त्यांना त्यांचे कर्तुत्व सिद्ध करण्याची संधी द्यावी असे ते म्हणाले. यावेळी गंगापूर वकील संघाचे अध्यक्ष के. आर. कराळे उपाध्यक्ष अमोल पी.ठाकूर, ,सचिव व्ही. एस. काळे, व्ही.बी. वाघचौरे, ए.बी. कुलकर्णी ,ए.पी.रासकर,अमित बर्वे, सोनवणे, एम. पी. दारुंटे ,आर.बी. दारूंटे, उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्ही.बी.काळे यांनी केले. आभार प्रदर्शन अमित बर्वे यांनी केले. या कायदेविषयक शिबिरास विद्यार्थी विद्यार्थिनी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अग्रलेख...

# दिल्ली निवडणूक आणि इंडिया आघाडीचे भवितव्य

७० सदस्यीय दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची १७ जानेवारी ही शेवटची तारीख आहे. ५ फेब्रुवारीला मतदान होणार असून दिल्लीत सत्ता कोणाची याचा निर्णय ८ फेब्रुवारीला होणाऱ्या मतमोजणीतून मिळणार आहे. दिल्ली हे राज्य असले, तरी त्याला पूर्ण राज्याचा दर्जा नाही. दिल्लीची अवस्था धड केंद्रशासित प्रदेश नाही आणि पूर्ण राज्यही नाही, अशी आहे. दिल्लीच्या निवडून येणाऱ्या मुख्यमंत्र्याला फारसे अधिकार नाहीत. अन्य राज्यांतील अगदी ४० सदस्यांची विधानसभा असलेल्या गोव्याच्या मुख्यमंत्र्यालाही दिल्लीच्या मुख्यमंत्र्यापेक्षा जास्त अधिकार आहेत. एखाद्या ग्रामपंचायतीच्या सरपंचालाही दिल्लीच्या मुख्यमंत्र्यापेक्षा जास्त अधिकार आहेत, असे उपरोधाने म्हटले जाते. कारण दिल्लीची सत्ता मुख्यमंत्र्यापेक्षा नायब राज्यपालांच्या हातात एकवटली आहे. तरीसुद्धा राष्ट्रीय राजकारणात दिल्लीचे महत्त्व खूप आहे. कारण दिल्ली ही देशाची राजधानी आाहे. संपूर्ण देशाचा कारभार येथून चालवला जातो. त्यामुळेच दिल्लीत कोण जिंकणार, बहुमत कोणाला मिळणार, मुख्यमंत्री कोण होणार, याकडे दिल्लीच्याच नाही तर देशातील जनतेचेही लक्ष लागले असते. दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी यावेळी तिरंगी लढत होणार आहे. आप, काँग्रेस आणि भाजपा या तीन राष्ट्रीय पक्षांत लढत होत आहे. लोकसभा निवडणुकीत देशात भाजपाच्या नेतृत्वातील राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि काँग्रेसच्या नेतृत्वातील इंडिया आघाडी यांच्यात लढत झाली होती. मात्र, दिल्ली विधानसभा निवडणुकीत या दोन प्रमुख आघाड्यांत निवडणूक होत आहे, असे म्हणता येणार नाही. कारण दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या आधीच इंडिया आघाडीत फूट पडली आहे. लोकसभा निवडणूक दिल्लीत आघाडी करून लढवणारे इंडिया आघाडीतील आप आणि काँग्रेस हे दोन्ही पक्ष एक-दुसऱ्याविरुद्ध दंड थोपटून उतरले आहेत. नुसते उतरलेच नाही तर एक-दुसऱ्याविरुद्ध गंभीर असे आरोप-प्रत्यारोपही करू लागले आहेत. याचे कारण काँग्रेसला सत्तेवरून खाली खेचत आम आदमी पक्षाने दिल्लीची सत्ता बळकावली आहे. त्यालाही आता जवळपास १२ वर्षं होत आहेत. १९९८ मध्ये दिल्लीत भाजपाला सत्तेवरून पायउतार करत काँग्रेसने सत्ता मिळवली होती; सलग १५ वर्षे दिल्लीतील सत्तेत कायम राहण्याचा विक्रम काँग्रेसने तर सलग १५ वर्षे दिल्लीचे मुख्यमंत्रिपद भूषविण्याचा विक्रम शीला दीक्षित यांनी केला. २०१३ मध्ये दिल्लीत सत्तेत आल्यानंतर अरविंद केजरीवाल यांनी सलग तीनदा दिल्लीचे मुख्यमंत्रिपद भूषविले. २०१३ मध्ये फक्त ४९ दिवसच ते मुख्यमंत्रिपद होते, हा भाग वेगळा. त्यानंतर २०१५ आणि २०२० च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी भाजपा आणि काँग्रेस यांना सत्तेवर येण्यापासून रोखले. खरं म्हणजे हे दोन्ही पक्ष त्यावेळी सत्तेपासून एवढे लांब होते की, त्यांना सत्तेवर येण्यापासून रोखले, असे म्हणणेही योग्य नाही. २०१५ मध्ये आपने ७० पैकी ६७ जागा जिंकल्या; भाजपाला फक्त ३ जागा जिंकता आल्या. काँग्रेसला तर खातेही उघडता आले नाही. २०२० च्या विधानसभा निवडणुकीत आपने ७० पैकी ६२ जागा जिंकल्या. यावेळी भाजपाच्या स्थितीत थोडी सुधारणा झाली. तिला ८ जागा मिळाल्या. काँग्रेसचे यावेळीही खाते उघडले नाही.

मुख्यमंत्रिपदाच्या तिसऱ्या कार्यकाळात केजरीवाल यांचे ग्रह फिरले. आधी त्यांच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यावर आणि नंतर त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले. सत्येंद्र जैन, मनीष सिसोदिया या मंत्र्यानंतर केजरीवाल यांनाही उत्पादन शुल्क घोटाळ्यात तुरुंगात जावे लागले. मुख्यमंत्रिपदावर असताना अटक झालेले आणि मुख्यमंत्री म्हणून जवळपास सहा महिने तुरुंगाचा पाहुणचार घेणारे केजरीवाल देशातील एकमेव मुख्यमंत्री म्हटले पाहिजे. जामिनावर तुरुंगातून सुटल्यानंतर जनाचीच काय पण मनाचीही लाज नसणारे केजरीवाल यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. आपल्या जागेवर आतिशी यांना मुख्यमंत्री केले. यावेळची निवडणूक आप आतिशी यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात लढवत असला, तरी आपचे नेतृत्व केजरीवाल यांच्याकडेच आहे. लोकसभा निवडणुकीत दिल्लीतील सात जागांवर आप आणि काँग्रेस यांची आघाडी होती. पण या आघाडीला एकही जागा जिंकता आली नाही. सातही जागांवर सलग तिसऱ्यांदा भाजपाने दणदणीत विजय मिळविला. लोकसभा निवडणुकीत आप आणि काँग्रेस यांची आघाडी असल्यामुळे विधानसभा निवडणुकीत आप आणि काँग्रेस यांची पुन्हा एकदा आघाडी होईल, असे वाटत होते. पण केजरीवाल यांच्या अतिराजकीय महत्त्वाकांक्षेने तसे झाले नाही. तसे झाले असते तरी फारसा फरक पडला नसता, ते लोकसभा निवडणुकीने दिसून आले. मात्र, या दोन पक्षांत आघाडी न झाल्याचा परिणाम इंडिया आघाडीवर झाला. त्या आघाडीत फूट पडण्याचा मार्ग मोकळा झाला. काँग्रेसच्या अतिशहाण्या नेत्यांनी केजरीवाल यांच्यावर राष्ट्रद्रोही असल्याचा आरोप केला. खरं म्हणजे या आरोपात काही चूक नव्हते. केजरीवाल यांनी वेळोवेळी आपल्या कृतीने काँग्रेसचा आरोप खरा असल्याचे सिद्ध केले होते. त्यामुळे जळफळाट झालेल्या आप नेत्यांनी काँग्रेसला इंडिया आघाडीबाहेर काढण्याची मागणी केली. तेथून इंडिया आघाडी आता फार काळ टिकणार नाही, याचे संकेत मिळायला सुरुवात झाली. इंडिया आघाडी ही फक्त लोकसभा निवडणुकीपुरती होती, असे आघाडीतील अनेक घटक पक्षांनी वेळोवेळी म्हटले. आघाडीतील चाणक्य आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांची भूमिकाही यापेक्षा वेगळी नाही. इंडिया आघाडीत काँग्रेसचे नेतृत्व मान्य करायला पवार तयार नाही, म्हणजे कोणीच तयार नाही, असा काढायला हरकत नाही. येथूनच काँग्रेसचे आघाडीतील ग्रह फिरले. घरं फिरले की घराचे वासे फिरतात, असे म्हटले जाते. त्याची प्रचीती काँग्रेसला येऊ लागली. इंडिया आघाडीतील फुटीला जसे आप नेते जबाबदार होते तसेच काँग्रेसचे राष्ट्रीय पातळीवरील नेते विशेषत: लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची वागणूकही जबाबदार होती. मुळात राहुल गांधी यांची वागणूक नेहमीच बेजबाबदारपणाची होती. इंडिया आघाडीतील नेत्यांचा त्यांच्यावरील रोष कधी लपून राहिलेला नाही. त्याचाच परिणाम म्हणून की काय, इंडिया आघाडीतील बहुतांश पक्षांनी दिल्ली विधानसभा निवडणुकीत केजरीवाल यांच्या आपला पाठिंबा देण्याची घोषणा केली. भाजपाचा पराभव करण्याची क्षमता दिल्लीत काँग्रेसमध्ये नाही तर आपमध्ये आहे, याची या नेत्यांना पटलेली खात्री हे यामागचे एक कारण असले, तरी राहुल गांधी पर्यायाने काँग्रेसला त्याची जागा आणि लायकी या नेत्यांना दाखवून द्यायची होती, हे मागणीचे दुसरे कारण राहू शकते. या घटनाक्रमापासून शहाणपण घेत काँग्रेसने इंडिया आघाडीचे नेतृत्व करण्याचा अट्टहास सोडला तर इंडिया आघाडी वाचू शकते, अन्यथा इंडिया आघाडीचे बारा वाजू शकतात. इंडिया आघाडीचे नेतृत्व करण्याची इच्छा पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांनी वेळोवेळी व्यक्त केली. आघाडीतील काही घटक पक्षही त्यांच्याकडे नेतृत्व सोपवायला तयार आहेत. मात्र यात अडथळा हा काँग्रेसचा आहे. कारण 'आयत्या बिळावर नागोबा'सारखा काँग्रेस इंडिया आघाडीवर बसला आहे. काँग्रेसने स्वत:हून इंडिया आघाडीचे नेतृत्व सोडले पाहिजे वा आघाडीतूनच बाहेर पडले पाहिजे. इंडिया आघाडीत काँग्रेसची स्थिती खायला काळ आणि भुईला भार अशी झाली आहे. त्यामुळे दिल्ली विधानसभा निवडणुकीचा निकाल काहीही लागला तरी त्याचा पहिला परिणाम इंडिया आघाडीच्या स्थैर्यावर होणार आहे. काँग्रेसला वगळून इंडिया आघाडी नव्या स्वरूपात स्थापन करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर इंडिया आघाडीतून काँग्रेसचे आऊटगोईंग निश्चित आहे. आघाडीत इनकमिंग कोणाचे हे सांगता येणार नसले, तरी इंडिया आघाडीत आता काँग्रेससाठी जागा नाही, हे निश्चित आहे.

## यंगिस्तान

### जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# महाकुंभ : प्रचंड आरंभ!

'एचएमपीव्ही' व्हायरसची चर्चा होत असल्यामुळे वाळीत पडलेल्या स्वयंघोषित पुरोगाम्यांनी या व्हायरसच्या पृष्ठभूमीवर महाकुंभ होऊ नये, अशी विधाने सोशल मीडियावर केली होती. ही स्वयंघोषित पुरोगामी मंडळी म्हणजे १००१ पापी नरकात खितपत पडल्यानंतर जन्मलेली महापापी जमात आहे. कित्येक वर्षांपासून ही जमात राम मंदिर होऊ नये म्हणून मार्क्स, माओ, चे गेव्हारा मदिरेत बुडवून बसले होते. 'मंदिर वहीं बनाएंगे, पर तारीख नहीं बताएंगे' असले टोमणे मारत आसुरी आनंद लुटत होते आणि राम मंदिराची निर्मिती झाली तेव्हा मोदींनी सोहळा हायजॅक केला म्हणून बोंबलत बसले होते. त्याचप्रमाणे महाकुंभ होऊ नये म्हणूनही त्यांनी मार्क्स, माओ, चे गव्हारा इत्यादींकडे साकडे घातले होते. मात्र, या जंतांची अ-निच्छा पूर्ण झाली नाही आणि महाकुंभ खऱ्या अर्थाने 'महा' ठरला.

महाकुंभामध्ये तरुण-नवतरुण, साधक-उपासक आणि साधू-साध्वींना पाहून सर्वच अवाक् झाले आहेत. ॲपलच्या सीईओंच्या पत्नी लॉरेल पॉवल जॉब्स यांना पाहून तर आश्चर्याचा सुखद धक्काच बसला. त्यांनी सनातन धर्म स्वीकारला असून 'कमला' असे नाव धारण केले आहे. त्यांनी निरंजनी आखाड्याचे महामंडलेश्वर स्वामी कैलाशानंद गिरी यांच्याकडून हिंदू धर्माची दीक्षा घेतली आहे. ६१ वर्षांच्या लॉरेन जॉब्स म्हणजेच 'कमला' यांनी महाकुंभामध्ये व्रत घेतले आहे. त्या जमिनीवर झोपतात, रोज पवित्र नदीत स्नान करतात, मंत्र-नाम स्मरण, ध्यान करतात व शाकाहारी आणि कांदा, लसूण व मसाले नसलेलं सात्त्विक अन्न ग्रहण करतात. त्यांचे गुरू म्हणाले की, तिच्यामध्ये जरासाही अहंकार नाही आणि ती गुरुप्रती समर्पित आहे. वाचकहो, विशेष म्हणजे या कमला १५ बिलियन डॉलरच्या मालकीणबाई आहेत. जगातल्या श्रीमंत महिलांमध्ये त्यांचं नाव घेतलं जातं.

आज जगभरात या महाकुंभाची चर्चा होत आहे. त्याचबरोबर इतकं सुंदर आयोजन केल्याबद्दल उत्तर प्रदेश आणि भारत सरकारचेही कौतुक होत आहे. इथे एक जुनी गोष्ट आठवते. १९४२ मध्ये भारताचे व्हॉईसराय लॉर्ड लिनलिथगो यांनी मदनमोहन मालवीय यांच्यासोबत कुंभमेळा विमानातून पाहिला. लाखो भाविकांचा जनसागर बघून व्हॉईसराय आश्चर्यचकित झाले. त्यांनी मालवीय यांना विचारलं की, ''या महाकुंभाचे आयोजन करताना खूप



कष्ट घ्यावे लागले असतील नं आणि पुष्कळ रुपये खर्च झाले असतील, इतक्या लोकांना निमंत्रण कसे दिले असेल?'' मालवीय म्हणाले, ''फक्त दोन पैसे खर्च झाले.'' हे उत्तर ऐकून व्हॉईसराय यांना वाटले की, मालवीय त्यांची चेष्टा करत आहेत. मात्र, मालवीय यांनी खिशातून पंचांग काढले आणि दाखवत म्हणाले, ''हे आमचं पंचांग आहे आणि याची किंमत फक्त दोन पैसे आहे. या पंचांगावरून भाविकांना कळतं की, महाकुंभामध्ये कधी आणि कसं यायचं आहे. कोणालाही आमंत्रण द्यायची गरज पडत नाही.'' या उत्तराने व्हाईसराय अवाक् झाले. हिंदू धर्माची महती त्यांना त्या दिवशी कळली असावी.

२०२५ च्या या महाकुंभाचे आणखी एक वैशिष्ट्य असे की, स्वतःस भारताचा शत्रू म्हणवून घेणाऱ्या पाकिस्तानमध्येही महाकुंभावरून पुष्कळ चर्चा सुरू आहे. पाकिस्तानी जनता महाकुंभाविषयीची माहिती इंटरनेटवर शोधतेय. पाकिस्तानी मुसलमानी जनतेला तलवारीच्या बळावर आपला पंथ लादण्याचे शिक्षण मिळाले आहे. मात्र पूर्वाश्रमीचे हिंदू असलेल्या या पाकिस्तानी जनतेला आपल्या मूळ स्वरूपाचा विसर पडला आहे. हिंदू धर्म कधीही तलवारीच्या बळावर वाढला नाही. 'इस्कॉन' हे याचं जिवंत उदाहरण आहे. केवळ प्रेम, तत्त्वज्ञान, आत्मानुभूती आणि समर्पण वृत्तीने हिंदू धर्म आज जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचत आहे. नाहीतर जॉब्स 'कमला' झाल्याच नसत्या. त्यांच्याकडे तर सगळी भौतिक व आर्थिक सुखं आहेत; पण मानसिक सुखासाठी, आत्म्याच्या कल्याणासाठी सनातन धर्म आवश्यक आहे, याची प्रचीती त्या पतिव्रतेला झाली असावी. विचार करा वाचकहो, कोणतीही बळजबरी नाही, आमिष नाही, लालूच नाही, लंपटपणा नाही, अत्याचार नाही, शत्रूकडून मिळविलेल्या लुटीचा पाशवी आनंद नाही किंवा कोणतीही राक्षसी झिंग नाही, माणसाला मोहात पाडणारे, आनंद देणारे कोणतेही आकर्षण नाही; तरीदेखील जगभरातील कोट्यवधी भाविक एकत्र येतात आणि पावित्र्य राखत साधना करतात. इतकी सात्त्विकता, इतके पावित्र्य जगातील कोणत्या धर्मात असणार आहे? केवळ हिंदू धर्मच हे करू शकतो. म्हणूनच आपले संत म्हणतात, 'विज्ञानाने जरी केली क्रांती, तरी अध्यात्माशिवाय नाही मन:शांती!' हिंदू धर्म हा खरा वैश्विक धर्म आहे. जगाच्या कल्याणासाठी पसायदान मागण्याचे सामर्थ्य केवळ हिंदू संत करू शकतात.

या महाकुंभाच्या निमित्ताने मला आणखी एक गोष्ट जाणवत आहे. आज जगभरात पुन्हा अशांतता पसरत आहे. युद्ध होत आहेत, अतिरेकी कारवाया वाढत आहेत, डावे लोक आपलं राक्षसी जाळं पसरवत आहेत, डीप स्टेट प्रचंड सक्रिय झाले आहे. भारतावरही यांची वाईट दृष्टी आहे. मात्र, इतकी अराजकता माजली असताना भारत देश स्वधर्म सूर्य पाहत आहे. आज लोकांमध्ये उपासनेचे महत्त्व वाढत आहे. विशेष म्हणजे भैरव आणि शक्ती उपासना अचानक वाढताना दिसत आहे. भैरव आणि शक्ती उपासनेकडे सर्वसामान्य माणूस आकृष्ट होत आहे. भैरव आणि शक्ती हे राक्षसांचा नाश करणारे दैवत आहेत. ही उग्र शक्ती आता चार्ज होत आहे, जागृत होत आहे. हा योगायोग नाही. याचा अर्थ राक्षसांचा नाश करण्यासाठी ही शक्ती आता सज्ज झाली आहे. महाकुंभामुळे या गोष्टीवर शिक्कामोर्तब झाले आहे. भविष्यात भारत देश जगाचं नेतृत्व करेल आणि या राक्षसी शक्तीविरुद्ध जगाला भारत देशच मार्ग दाखवू शकेल. म्हणूनच राक्षसी परंपरेतले स्वयंघोषित पुरोगामी हिंदूंच्या श्रद्धेला व महाकुंभाला विरोध करत आहेत. पण त्यांचा विरोध मोडून आर्य सनातन वैदिक हिंदू धर्माचा भगवा जगभरात फडकणारच आहे. महाकुंभ हा तर प्रचंड आरंभ आहे...!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

### हेमंत सालोडकर

# भारतीय खेळांना आंतरराष्ट्रीय मान्यता

सध्या भारताची राजधानी नवी दिल्लीत पहिला खो-खो विश्वचषक-२०२५ सुरू आहे. या स्पर्धेला सर्व स्तरांतून भरभरून पाठिंबा आणि खेळाडूंना प्रोत्साहन मिळत आहे. या आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे यशस्वी आयोजन पुढील कार्यक्रमांसाठी प्रेरक आणि खेळाडूंच्या आयुष्याला कलाटणी देणारे ठरेल, यात शंका नाही. सध्या जगात आणि भारतातही क्रिकेट, फुटबॉल, टेनिस, बॅडमिंटन, बास्केटबॉल, हॅण्डबॉल, कुस्ती आणि अन्य आंतरराष्ट्रीय खेळांचा दबदबा असताना आपला भारतीय खेळ म्हणवला जाणारा खो-खो हा क्रीडा प्रकार चांगलाच धुमाकूळ घालत आहे. आपल्याकडे खेळ म्हणजे फक्त क्रिकेट, फुटबॉल आणि हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या इतर खेळांनाच प्राधान्य दिले जाते. भारतीय खेळ कबड्डी, खो-खो याकडे दुर्लक्ष होत होते. पण सर्वच तरुण क्रिकेट, फुटबॉल खेळतील तर अन्य क्रीडा प्रकाराकडे जाणार कोण, असा प्रश्न निर्माण होतो. पण आजचा युवा चोखंदळ असल्याने त्याने कबड्डी व खो-खो या खेळातही करीअर करण्याचे धाडस दाखवले आहे. त्यातूनच तालुका स्तरापासून तर थेट आंतरराष्ट्रीय स्तरावर कबड्डी आणि खो-खोने सर्वांना लक्ष वेधून घेण्यास भाग पाडले. याचाच परिणाम म्हणून नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये सुरू असलेल्या पहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेत पुरुषांचे २० आणि महिलांचे १९ संघ खेळत आहेत. २०३० मध्ये होणाऱ्या एशियन अजिंक्यपद आणि २०३२ मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक या प्रमुख स्पर्धांमध्ये खो-खोचा समावेश करण्याचा भारतीय खो-खो महासंघाचा प्रयत्न असल्याचे महासंघाचे अध्यक्ष सुधांशू मित्तल यांनी सांगितले. खो-खो सध्या ५५ देशांमध्ये खेळला जातो. मात्र, ऑलिम्पिकमध्ये समावेशासाठी हा खेळ ७५ देशांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. पण ९० देशांमध्ये हा खेळ पोहोचवून त्याचा अधिकाधिक विस्तार करण्याचा आणि ऑलिम्पिकमध्ये दिमाखदार प्रवेश मिळण्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. सर्वाधिक देश सहभागी असलेला हा पहिलाच विश्वचषक आहे. यापूर्वी कोणत्याही विश्वचषकात १४ पेक्षा अधिक देशांचा सहभाग नव्हता. खो-खो खेळाने एक नवीन विश्वविक्रम करत या पहिल्याच विश्वचषकात २३ देशांचा सहभाग झाला आहे. यावरून खो-खोला भविष्यात भरभराटीचे आणि खेळाडूंच्या उत्कर्षाचे दिवस येतील, असा सर्व चाहत्यांना विश्वास आहे.

आता आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा होणार म्हणजे नियमांची कठोर अंमलबजावणी आली आणि स्पर्धा अधिक रंगतदार, रोमांचक करण्यासाठी ते आवश्यक आहे. जसे टी-२० क्रिकेट स्पर्धेत संथ खेळून चालत नाही तसेच खो-खोकडे चाहत्यांना आणि खेळाडूंना आकर्षित करण्यासाठी काही नियम करावे लागतील. खो-खोमध्ये डाईव्ह हा प्रकार चांगला रुजला आहे. त्यामुळे समोरच्या गड्याला बाद करताना या तंत्रात कसब पणाला लावावे लागणार आहे. यात अनेक खेळाडूंनी कौशल्य प्राप्त केले आहे. यात मुंबई उपनगरचा अनिकेत पोटे याने 'डाईव्ह किंग' म्हणून नावलौकिक मिळविला आहे. अनिकेतने पेरूविरुद्धच्या सामन्यात सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडूचा मान मिळविला. त्याच्यापासून प्रेरणा घेऊन अनेक खेळाडूंनी ते कसब शिकण्याचा प्रयत्न केला. खो-खो स्पर्धा आंतरराष्ट्रीय स्तरावर गेल्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील खेळाडूंना चांगली संधी मिळाली आहे. या खेळात कौशल्य प्राप्त करून ते आपल्या कुटुंबासह शहराचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचवतील. अधिकाधिक मुले, मुली खो-खो स्पर्धा खेळल्याने या क्रीडा प्रकाराची आयपीएल, केपीएलसारखी स्पर्धा घेता येईल. क्रिकेट, कबड्डीसारखे मोठ्या प्रमाणात फ्रेंच्याइझी खेळाडूंवर बोली लावतील आणि खेळाडूंच्या आयुष्याला कलाटणी मिळू शकते. आतापर्यंत केवळ मातीत खेळला जाणारा हा खेळ मॅटवर खेळल्यास खेळाडू जखमी होण्याचे प्रमाण कमी होईल आणि त्याला अधिकाधिक स्पर्धांमध्ये भाग घेता येईल. यामुळे सामने अधिक रोमांचक आणि थरारक होतील. चाहत्यांनाही सामन्याचा आनंद लुटता येईल. सोबतच खेळाडू आपले कौशल्य कायम राखू शकतो. इतर खेळांप्रमाणे यांनाही चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे हे सरकारचे काम आहे. मागील काही वर्षांपासून खेलो इंडिया, खेलो इंडिया युथ गेम्स, विद्यापीठस्तरीय स्पर्धांमुळे युवांचा खेळाकडे कल वाढला आहे. यात ते स्वदेशी खेळाला जास्त महत्त्व देत आहेत. ही ओढ अशीच कायम राहिली आणि कबड्डी, खो-खो, मल्लखांबसारख्या खेळांना प्रोत्साहन मिळाले तर भारतीय खेळांची दखल जागतिक क्रीडा समुदायाला घ्यावी लागेल. यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा झेंडा मानाने फडकेल. पहिल्या खो-खो विश्वचषकावर भारतीय महिला आणि पुरुषांनी आपल्या नावाची अमिट मुद्रा उमटवावी, यासाठी शुभेच्छा.

९८५०७५३२८१

## प्रासंगिक

### विजय पांढरीपांडे

# सत्य अन् वास्तव

'सत्यमेव जयते' असे आपल्या देशाचे बोधवाक्य आहे. मुळात सत्याचा नेहमीच विजय होतो का हा प्रश्न पडावा, अशी सद्य:स्थिती आहे. मुळात सत्य म्हणजे काय, सत्य हेच वास्तव असते का हे समजून घेणे गरजेचे आहे. आपण वृत्तपत्रात किंवा दूरदर्शनवर बातमी वाचतो, बघतो... अमुक शहरात रेल्वे अपघात झाला. त्यात २० जणांचा मृत्यू झाला. यात पाहिले वाक्य म्हणजे रेल्वे अपघात झाला हे सत्य, पण मृत्यूचा २० हा आकडा हे वास्तव. कारण वेगवेगळ्या वृत्तपत्रांत किंवा वाहिन्यांवर हा आकडा वेगवेगळा असतो. म्हणजे वास्तव नेहमी तपासून घ्यावे लागते. सत्यावर आपण विश्वास ठेवतो. शेकडो-हजारो वर्षांपासून अशी अनेक सत्य आपण स्वीकारत गेलो. आपले वेद-पुराण, त्यातील कथा, रामायण-महाभारत यात सत्य काय अन् वास्तव काय, या भानगडीत सामान्य माणूस पडत नाही. ते ज्ञानी पंडितांचे काम. शिकायला लागल्यावर आपल्याला जे जसे शिकवले जाते, ते तसे डोके न वापरता आपण स्वीकारत जातो. दोन अन् दोन चार हे सत्य आपण असेच स्वीकारतो. दोन अन् दोन पाच का नाही, तीन का नाही? चार हा शब्द कुणी ठरवला, का ठरवला या प्रश्नजाळात आपण पडत नाही.

विज्ञानात मात्र हे सत्य सातत्याने बदलत जाते. आजचे वास्तव उद्या बदलत जाते. कारण वास्तव स्वीकारण्याआधी तपासावे लागते. विज्ञानात प्रयोगाने सिद्ध व्हावे लागते. म्हणूनच मॅटर म्हणजे पदार्थ कधी पार्टिकल असतो, कधी वेव्ह (लहर) असतो, वेगवेगळ्या काळात वेगवेगळी प्रमेये अन् वेगळी सत्ये! तेवढ्यापुरते विज्ञानात ते सत्य म्हणून मिरवले जाते. ते शोधून काढणाऱ्या प्रत्येकाला नोबेलसारख्या पुरस्काराने गौरविलेदेखील जाते अन् पुढे दुसरा कुणी ते चुकीचे होते, हे सांगून नव्याने संशोधन करून नव्याने पुरस्कृत होतो.

न्यायालयात न्यायाधीशाच्या पाठीमागेच 'सत्यमेव जयते' असे ठळक लिहिलेले असते, पण तिथेही ते सिद्ध व्हावे लागते. खून झाला हे सत्य असते; पण ज्याच्यावर आरोप झाला त्यानेच तो केला, हे सिद्ध व्हावे लागते. शिवाय त्या मागचा हेतू काय हेही कागदोपत्री सिद्ध करावे लागते. इथे होत्याचे नव्हते सहज करता येते. सत्य तपासण्यात अडचणी येतात. खोट्याला खरे सहज ठरवता येते. खालच्या कोर्टातील सत्य अन् वरच्या कोर्टातील सत्य वेगवेगळे असू शकते. एकाच खंडपीठातील पाच न्यायाधीशांचे सत्य वेगळे असू शकते.



आजकालच्या राजकीय बातम्या, वेगवेगळ्या पुढाऱ्यांची वक्तव्ये, त्यांनी केलेले दावे-आरोप-प्रत्यारोप यातील सत्य काय, वास्तव काय, हे तपासणे कुणालाच शक्य नसते. आजचे सत्य उद्या वेगळे रंग घेऊन पुढे येते. इथे मीच खरा या अट्टहासाने जो तो आपली बाजू तावातावाने मांडत असतो. कागदी पुरावे अन् आजकाल ऑडियो-व्हिडीओ क्लिप्स अन् काय काय... पुरावे कसेही तयार करता येतात. हे वाद आता दोन व्यक्ती, दोन राजकीय पक्ष एवढ्यापुरते मर्यादित राहिले नाहीत. ते अगदी युद्धजन्य परिस्थिती निर्माण होईपर्यंत वाढत जातात. रशियाचे म्हणणे, आमचे खरे तर युक्रेनला वाटते आपली बाजू खरी. तेच भारत-चीनच्या किंवा इराण-इराकच्या बाबतीत वास्तव 'नेमका कोण खरा' हे अशा परिस्थितीत कुणी ठरवायचे, हे आजही कुणालाही माहिती नाही. सत्याचे असेच असते.

मानव प्राणी समूहाने जगणारा. एकमेकांच्या सहकार्याने जगणारा. आपली शेतीची क्रांती, औद्योगिक क्रांती, मग आताची संगणक, माहिती तंत्रज्ञान क्रांती हे सारे एकमेकांवर अवलंबून राहत, सहकार्याने जगल्याचे फळ आहे. पण हे सहकार्य नि:स्वार्थ भावाचे नाही; त्यात द्वेष, तिरस्कार, स्पर्धा, अविश्वास यांचे प्राबल्य आहे. त्यातून कुणाचे सत्य खरे हे वाद कायमचे ठरलेले! गोंधळ वाढला की मूळ सत्य शोधणे अधिकच कठीण होऊन बसते. मग त्यासाठी कितीही कमिट्या, एसआयटी, सीआयडी बसवा. सत्य शोधून हाती लागेलच, याची मुळीच खात्री नसते.

माणूस प्राणी मुळात गोष्टीवर विश्वास, श्रद्धा ठेवणारा आहे. म्हणूनच धर्माने सांगितलेले सत्य आपण प्रश्न-शंका न विचारता आहे तसे स्वीकारतो. आपल्या वेद-पुराणातील अतिरंजक कथा आपण सहज सत्य म्हणून स्वीकारतो. त्यातले अनेक दावे अतिरंजित असले, तरीही तर्काच्या कसोटीवर तपासण्याच्या भानगडीत न पडता पिढ्यान्‌पिढ्या आपण मान्य करत जातो. धर्मातले किती स्वीकारायचे, विज्ञानाला किती स्वीकारायचे याच्या फूटपट्ट्या सगळीकडे सारख्या नसतात. काळानुरूप, सोयीनुसार सगळे बदलत जाते. शाश्वत असे काहीच नसते. धर्मातल्या विधानांना प्रश्न विचारता येत नाहीत. शंका उपस्थित करता येत नाहीत. ते आहे तसे मान्य करावे लागते. विज्ञानाचे सत्य हे तर्कावर आधारित, प्रयोगाने सिद्ध झालेले असले, तरी त्या तर्क करण्यात किंवा प्रयोगात चूक होऊ शकते. ती चूक लक्षात आल्यावर किंवा काही समजुती चुकीच्या होत्या, हे पुढे लक्षात आल्यावर हे वैज्ञानिक सत्य बदलत जाते. समाजात, राजकारणात मात्र सत्य अन् वास्तव याचा विचित्र, अनाकलनीय गोंधळ सुरू असतो. नवरा-बायकोच्या भांडणात घटस्फोटापर्यंत परिस्थिती आली तरी नेमका दोष कुणाचा, हे वास्तव पडद्याआडच राहते. तसेच दोन राजकीय पक्षातले वाद, दोन शेजारी राष्ट्रातले वाद या बाबतीत अगदी युद्धजन्य परिस्थिती निर्माण होत असली, तरी सत्याच्या बाबतीत 'परदे में रहने दो...' अशीच लपाछपी चालते. मग सुशांतसिंग राजपूत किंवा दिशा सालियन यांचा मृत्यू हे सत्य असेल, तरी ती हत्या की आत्महत्या, हत्या असेल तर खुनी कोण, आत्महत्या असेल तर त्याला जबाबदार कोण? हे सगळे प्रश्न वर्षानुवर्षे अनुत्तरित राहतात. समाजाला त्याशी काही देणघेणे नसते. समाजाची स्मृती अंशकालीन असते. अंतिम सत्य म्हणजे नेमके काय, याचा थांगपत्ता अजूनही कुणाला लागला आहे, असे वाटत नाही. आजचे सत्य उद्या निकामी ठरू शकते. निकालात निघू शकते. जे आज आहे ते आहे तसे स्वीकारणे एवढेच आपल्या हातात असते.

७६५९०८४५५५

## लाडके 'भाऊजी' कुठे गेले?

'होम मिनिस्टर' कार्यक्रम अचानकपणे का गायब झाला? हे कळण्यास मार्ग नाही. संध्याकाळी ६ वाजता न चुकता महिला वर्गांच्या नजरा या मालिकेकडे वळत असत. सतत २० वर्षांपेक्षा अधिक काळ महिलांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे आदेश बांदेकर 'भाऊजी' या नावाने महाराष्ट्रभर प्रचलित होते. अचानकपणे कुठे माशी शिंकली माहिती नाही. ही मालिका कायमचीच बंद करण्यात आली. खेळातून मनोरंजन आणि महिलांच्या मनाचा ठाव घेऊन त्यांना सतत हसवत ठेवणारे व्यक्तिमत्त्व कुठे गायब झाले हे कळण्यास मार्ग नाही. मनोरंजन क्षेत्रात कुठलेही राजकारण आडवे येता कामा नये. आदेश बांदेकर हे उबाठाचे सक्रिय कार्यकर्ते असून शिवसेना चित्रपट सेनेचे अध्यक्ष पण आहेत. कुठलीही पूर्वसूचना न देता एखादा चांगला टीआरपी असलेला कार्यक्रम अचानकपणे बंद पडतोय याचा अर्थ काय? महाराष्ट्रातील महिलांसाठी खास करून हा कार्यक्रम हसतखेळत आपल्या कौटुंबिक वेदनांना वाट मोकळी देणारा होता. यामुळे मनातील कोंडमारा दूर सारला जात होता. मैत्रीच्या धाग्यांची गुंफूण घट्ट विणली जात होती. अनेक कुटुंबातील लोकांना हा कार्यक्रम आपलासा वाटत होता. मनातील भावनांना वाट मोकळी करून देत एकमेकांना चिमटे काढत, टोमणे मारत कुणाच्याही भावना, मन दुखवले जाणार नाही याची काळजी घेत हा कार्यक्रम अविरतपणे सुरू होता. हे अत्यंत कठीण काम भाऊजी सहजपणे हाताळत असत. हा कार्यक्रम पूर्ववत सुरू करण्यात यावा अशी मागणी महाराष्ट्रातील तमाम महिला व पुरुषांची आहे.

**मिलिंद गड्डमवार**/९५११२१५२००

## वचनात राहूनच जगावे

आपण अनेकांशी संवाद साधत असतो. त्यातून आपल्याला जीवनाचा आनंद मिळतो. अनेक गोष्टींपासून आपण शिकतो. त्या शिकण्यातून आपण चांगले-वाईट समजतो. वाईटापासून दूर राहतो व जे जे चांगले ते स्वीकारतो व त्यातूनच आपल्यातील समजूतदारपणा वाढतो. आजही मला आठवते, ज्यांनी सतत देशाचा समाजाचा विचार केला आणि आपले जीवनही संघकार्यासाठी वेचले ते स्व. बाळासाहेब देवरस यांनी मला लिहिण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यातुनच मग लिहायला लागलो. त्यांच्याशी संवाद करीत असताना मी त्यांना म्हटले, आपण सांगितल्याप्रमाणे नित्य लिहीत जाईल. आज अजूनही तरुण भारतात माझे काही ना काही लिखाण मी पाठवीत असतो. जे वचन मी तृतीय सरसंघचालकांना दिले होते त्याचे पालन आजही करीत आहे. वचनात राहून जीवन जगण्याचा आनंद असतो तो शब्दात व्यक्त करता येत नाही.

**मधुकर अमृत डबीर**/९८२२६१५३३१

## वाचक पत्रे

## राजकीय नेत्यांनी निवृत्त व्हायला हवे!

बाल्यावस्था, तरुणपण, प्रौढावस्था व वृद्धावस्था या मानवाला निसर्गाने दिलेल्या चार उपयुक्त अवस्था आहेत. बाल्यावस्थेत हुंदडणे, तरुणावस्थेत शिक्षण, नोकरी व विवाह करून जीवन जगण्याचा पाया मजबूत करणे, प्रौढावस्थेत मागील घटनांचा आढावा घेत वृद्धावस्थेत पदार्पण करून ईश्वर चिंतन व विश्रांतीचा व तरुण पिढीला सल्ला व उपदेश करणे.

गरीब वा श्रीमंत असो सर्वांना या चार अवस्थांतून जावेच लागते. पण काहींच्या नशिबात असतेच असे नाही. गरीब, कामगार, किसान यांना वृद्धावस्थेपर्यंत जगण्यासाठी काम करावेच लागते. वृद्ध झाल्यानंतरही ते काम करीत असतात कारण काम न केल्यास त्यांचे जगणे अशक्य ठरते. काही तरुणपणात समाजसेवेच्या माध्यमातून राजकारणात प्रवेश करतात. समाजसेवा हा एक बहाणा असतो. काहीच जण खऱ्या अर्थाने समाजसेवा करून राजकारणात प्रवेश करतात. पण पद, सन्मान व श्रीमंत होणे हे काहींचे उद्दिष्ट असते. एकदा का ते राजकारणी झाले तर अधिकाधिक श्रीमंत कसे होता येईल, कोट्यधीश झाल्यानंतरही त्यांची पैशाची हाव संपत नाही. वृद्धावस्था आली तरी शरीर चालताना, त्रास होत असताना, कोणता ना कोणता आजार सतावत असताना सुद्धा राजकारणातून मुक्त होण्याचा त्यांचा प्रयत्न नसतोच. ते अधिकाधिक राजकारणी बनत जातात. एक पक्ष सुटला तर दुसऱ्या पक्षाची कास धरून राजकारणातले धुरंधर असण्याचा आव आणत असतात. त्यामुळे असे वाटते की एक विशिष्ट वय झाल्यावर राजकारणी नेत्यांनी राजकारणातून निवृत्त होऊन खऱ्या अर्थाने समाजसेवेच्या माध्यमातून तरुण पिढीला पुढे येऊ द्यावे. त्यांना राजकारण कसे करावे याबद्दल मार्गदर्शन फक्त करावे असे वाटते.

**मधुसूदन भावे**/७६२०६२९७२८

## इस्रोने घडविला नवा इतिहास

भारतीय अवकाश संशोधन संस्था अर्थात् इस्रोने दोन अंतराळ याने एकमेकांना जोडण्याची स्पॅडेक्स मोहीम फत्ते करून इतिहास घडवला आहे. अशी कामगिरी करणारा भारत हा जगातील चौथा देश आहे. या आधी रशिया, चीन आणि अमेरिकेलाच अशी कामगिरी करता आली आहे. शास्त्रज्ञांच्या या कामगिरीने १४४ कोटी भारतीयांची मान अभिमानाने उंचावली आहे. देशाच्या भावी अवकाश योजनांच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा प्रयोग आहे. चांद्रयान ४ मोहिमेतून चंद्रावरील दगड, मातीचे नमुने पृथ्वीवर आणण्यात येणार आहे. त्यासाठी वेगवेगळ्या यानांना अवकाशात जोडून पुन्हा विलग करण्याची प्रक्रिया या प्रयोगामुळे सुलभ होणार आहे. केवळ चांद्रयान मोहिमेतच नाही भविष्यातील सर्वच अवकाश मोहिमांच्या तयारीतील महत्त्वाचा टप्पा या निमित्ताने गाठला गेला आहे. या मोहिमेत सहभागी असलेल्या सर्व शास्त्रज्ञांचे मनापासून अभिनंदन!

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### ग्रामगीतेच्या माध्यमातून गावांचे परिवर्तन शक्य- डॉ.दिलीप शृंगारपुतळे

**परभणी,/प्रतिनिधी :** ग्रामगीता ही राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी समाजाला दिलेली मोठी देण आहे. ग्रामगीतेच्या माध्यमातूनच गावांचे परिवर्तन होऊ शकते, असे प्रतिपादन ग्रामगीतेचे अभ्यासक डॉ. दिलीप शृंगारपुतळे यांनी केले.

येथील चतुरंग प्रतिष्ठान परभणीच्या वतीने बुधवार ८ जानेवारी रोजी सारंग स्वामी विद्यालयात आयोजित केलेल्या शालेय व्याख्यानमालेत ते बोलत होते. यावेळी अध्यक्षपदी सारंग स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव धन्यकुमार शिवणकर तर प्रमुख उपस्थिती शाळेचे मुख्याध्यापक एन.व्ही. निलंगे, प्रा. कल्याण देशमुख यांची होती.

पुढे बोलतांना शृंगारपुतळे म्हणाले, समाजातील प्रत्योक समस्येवर ग्रामगीतेतून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी उपाय सुचवला आहे. जर प्रश्न आपण निर्माण केलेले असतील तर त्याची उत्तरेही समाज म्हणून आपल्या जवळच आहेत म्हणूनच ग्रामगीतेत शासन नावाचा एकही शब्द आढळून येत नाही. आपण सर्वांनी एकत्र येऊन या सर्व प्रश्नांवर उत्तरे शोधायची आहेत. ग्रामगीतेतील राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार अंगीकारल्यानेच गावांचे खरे परिवर्तन शक्य आहे, असे ते म्हणाले.

निकोप समाज निर्मितीसाठी शालेय विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार होणे गरजेचे आहे. यासाठी चतुरंग प्रतिष्ठानची ही व्याख्यानमाला अत्यांत उपयुक्त असल्याचे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष धन्यकुमार शिवणकर यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन बी. एस. भिसे यांनी केले. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

### बनावट खरेदीखत प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आदेश

**मानवत,/प्रतिनिधी :** महामार्गालगत जमीन नसताना बनावट खरेदीखत करून फसवणूक केल्याप्रकरणी मानवत पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्याचे आदेश येथील न्यायालयाने दिले आहेत.

नागनाथ कचरू जंगाले यांनी ॲड. सुनिल जाधव यांच्यामार्फत न्यायालयात एक तक्रार दाखल केली. यात बाळासाहेब दत्तात्रय देशमुख यांनी स्वतःची जमीन ही महामार्गालगत नसताना खोट्या चतूर्सिमा दाखवत साजिद अली मोहम्मद ताहेर अन्सारी, साजिद अली अब्दुल सलाम बेलदार यांना खरबा येथील शेत गट नंबर ५० जमीन ११ डिसेंबर २०२३ रोजी खरेदीखत क्रमांक २२४०/२०२३ प्रमाणे खोटे खरेदीखत करून दिली. त्याा साक्षीदार म्हणून गोपाळ नारायण भिसे, मुस्तफा दादामियाँ शेख, ज्ञानोबा लक्ष्मण कच्छवे यांनी स्वाक्षरी केली. यामुळे सदर इसमांना ही जमीन हायवे लगत नसतानाही बनावट खरेदीखत करून दिले. त्यामुळे जंगाले यांची फसवणूक झाल्याने त्यांनी मानवत येथील न्यायालयात तक्रार दाखल केली. तसेच मानवत रेल्वे स्टेशनच्या उड्डाणपुलाचे काम झाल्यानंतर शासनाने अधिग्रहण केलेला पुरावा व बाळासाहेब तसेच त्यांच्या आईची जमीन हायवे लगत नसताना खोटे खरेदीखत करून दिले. अशाप्रकारचा ॲड. सुनील जाधव यांचा युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरत आरोपींविरुध्द येथील ठाण्यात ६ जानेवारी रोजी गुन्हा नोंद करण्याचा आदेश दिला. फिर्यादीच्या वतीने ॲड. सुनील जाधव यांनी काम पाहिले, त्यांना ॲड. संजय हजारे, ॲड. भूषण मोकाशे, ॲड. श्याम कुन्हाडे यांनी सहकार्य केले.

### श्री तुळजाभवानी शुगर प्रा लि आडगाव दराडेचे- १ लाख मेट्रिक टन गाळप

**जिंतूर,/प्रतिनिधी-** श्री तुळजाभवानी शुगर प्रा.लि. साखर



कारखान्याने चालू गळीत हंगामात १ लाख मेट्रिक टन ऊसाचे गाळप पुर्ण केले आहे. कारखान्याकडून १० जानेवारी पर्यंत १ लाख मेट्रिक टन गाळप झाले आहे. गळीत हंगाम २०२४- २०२५ साठी गाळप क्षमतेचा विस्तार करून शेतक-यांचा ऊस वेळेत गाळपासाठी कारखान्याकडे यावा यासाठी आवश्यक सर्व यंत्रणा कार्यरत आहे. साखर व अन्य उपपदार्थ निर्मितीमधून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दर देण्यासाठी प्रयत सुरू असून श्री तुळजाभवानी शुगर प्रा.लि कारखान्याकडे आपला ऊस गाळपासाठी पाठवावा, असे आवाहन चेअरमन सौ भावनाताई बोर्डीकर यांनी केले आहे.

### मानवत येथील संशोधन प्रकल्पाची कुलगूरु यांच्याकडून झाली पाहणी

**मानवत,/प्रतिनिधी-** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत जर्मन एजन्सी जीआयझेड, सन सीड प्रायव्हेट लिमिटेड आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामंजस्य करारानुसार या संस्थाच्या संयुक्त विद्यमाने ग्री-फोटोव्होल्टेईक तंत्रज्ञान विकास व संशोधना करिता परभणी जिल्ह्यामध्ये मानवत जवळ ग्री-फोटोव्होल्टेईक संशोधन प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाला ९ जानेवारी रोजी कुलगुरु डॉ. इन्द्र मणि यांनी भेट देवून पाहणी केली. यावेळी त्यांच्या समवेत संशोधन संचालक डॉ. खिजर बेग, वनस्पती जनुकीय विभागाचे प्रमुख डॉ. हिराकांत काळपांडे होते. या भेटी दरम्यानग्रीपीव्ही संशोधन प्रकल्पा मार्फत राबविण्यात आलेले पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या व इतर संशोधनातील केळी, तुर, जवस, हरभरा, घेवडा, साळ, झुकेनी,कांदा, कोबी, या विविध पिकांवर नव्याने प्रयोग राबविण्यात आलेले आहेत त्याची पाहणी केली. त्यांनी प्रकल्पाच्या शास्त्रजज्ञासोबत चर्चा करून संशोधनाबाबत मार्गदर्शन केले. ग्री पीव्ही संशोधन प्रकल्पामध्ये चालु असलेल्या संशोधना बद्दल समाधान व्यक्त केले. शेतीचा मोलाचा वाटा राहणार असे बोलून प्रकल्पातील सर्व शास्त्रज्ञ, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी यांना प्रोत्साहन दिले व भविष्यामध्ये ग्रीपिव्ही प्रकल्प असेच कार्य करत रहावे यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या. या भेटीदरम्यान डॉ. गोदावरी पवार, डॉ विक्रम गुळवे, डॉ. सुनिता पवार, डॉ. बी एम कलालबंडी,जीआय झेडचे श्री अभिषेक शास्त्री तसेच अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया

छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी

खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

# कृषी-पशुपालन यांची सांगड महत्वाची- डॉ.मणि

**परभणी,/प्रतिनिधी-:** शेती व्यवसायातील जोखीम आणि खर्च व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. यासाठी आंतरपीक पद्धती, एकात्मिक शेती पद्धती तसेच कृषी-फलोत्पादन-पशुपालन याची सांगड घालावी लागेल, असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. इंद्रमणि यांनी केले.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प आणि हैद्राबाद येथील केंद्रीय कोरडवाहू शेती संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ६ ते ०८ जानेवारी दरम्यान तीन दिवसीय अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पाची १९व्या आणि हवामान बदलानुरुप राष्ट्रीय कृषि उपक्रमाची १२व्या राष्ट्रीय वार्षीक आढावा बैठकीचा यशस्वी समारोप ०८ जानेवारी रोजी झाला. यावेळी अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. इन्द्र मणि, मुख्य अतिथी म्हणून विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. के पी गोरे आणि सन्माननीय अतिथी म्हणून माजी शिक्षण संचालक डॉ. उदय खोडके हे होते. व्यासपीठावर भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या नागपूर येथील केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे माजी प्रमुख डॉ. वेणूगोपालन, भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या हैदराबाद येथील भारतीय संशोधन संस्थेचे मुख्य शास्त्रज्ञ डॉ. के रमेश, हैद्राबाद येथील केंद्रीय कोरडवाहू शेती संशोधन संस्थेच्या अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पाचे समन्वयक डॉ. जे.व्ही.एन.एस. प्रसाद,संशोधन संचालक डॉ. खिजर बेग आणि कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पाचे मुख्यशास्त्रज्ञ डॉ. वासुदेव नारखेडे आदींची उपस्थिती होती. बैठकीत अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पाच्या १९ शिफारशी तर हवामान बदलानुरुप राष्ट्रीय कृषि उपक्रमाच्या ६ शिफारशी देण्यात आल्या. याचे सदरीकरण क्रीडाचे मुख्य शास्त्रज्ञ डॉ. के. गोपीनाथ यांनी केले. या शिफारशी भारतीय कृषी अनुसंधान परिषदेस मंजुरीसाठी सादर केल्या जाणार असून या शिफारशींची चाचणी देशातील विविध ठिकाणच्या संशोधन केंद्राव्द्वारे केली जाणार आहे, अशी माहिती यावेळी दिली.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. इन्द्र मणि म्हणाले की, शेती उत्पादनासाठी पाण्याचा न्यायिक पद्धतीने उपयोग महत्वाचा असून कोरडवाहू शेतीमध्ये रबी आणि उन्हाळी हंगामात शेततळ्याचे अनन्य साधारण महत्व आहे. याबरोबरच कोरडवाहू शेतीतून तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक वेळा जमिनीत पेरलेल्या बियाण्याची रक्कमेचा परतावा देखील मिळत नाही. शेती व्यवसायातील जोखीम आणि खर्च व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. यासाठी आंतरपीक पद्धती, एकात्मिक शेती पद्धती तसेच कृषी-फलोत्पादन-पशुपालन याची सांगड घालावी लागेल. शेतकऱ्यांना शेतीमधून किती नफा मिळतो याचा देखील संशोधन करताना विचार करणे आवश्यक आहे. संशोधन केंद्राने दिलेल्या संशोधनाचा प्रभावी परिणाम आणि समांतर प्रसारण महत्वाचे आहे. शेतकऱ्यांनी शास्वत शेतीसाठी स्वतः शेतीमध्ये उभे राहून शेती करणे महत्वाचे आहे. यातून त्यांना शेती व्यवसायाचे मूल्यांकन देखील करता येते. विद्यापीठ 'शेतकरी देवो भव:' या भावनेतून कार्य करत असून विविध विस्तार कार्याच्या माध्यमातून नियमित शेतकऱ्यांशी संवाद साधत आहे असे नमूद करून त्यांनी शेतीच्या उज्वल भविष्यासाठी कृषी आणि संलग्न



विभागातील सर्व शास्त्राज्ञांनी शेतकऱ्यांच्या नियमित संपर्कात राहावे व एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन केले.

डॉ. वेणूगोपालन म्हणाले की, हवामान बदलानुरूप शेती आणि पुनरुत्पादक शेती या दोन बाबी शेतीसंबंधी महत्वाच्या आहेत. याचा सर्व स्तरावरून उल्लेख केला जातो. या दोन बाबीवरच प्रामुख्याने कोरडवाहूसह सिंचित शेतीमध्येही संशोधन करून योग्य शिफारशी देणे महत्वाचे आहे. यासाठी तसेच पुढील पाच वर्षातील कार्य करण्यासाठी या बैठकीमधून प्राप्त शिफारशी लाभदायक ठरणार असल्याचे नमूद केले. डॉ. के रमेश यांना कोरडवाहू क्षेत्रात कार्य करणारे शास्त्राज्ञांची कार्य कौतुकास्पद असल्याचे बैठकीत जाणवले. शास्त्रज्ञ कोरडवाहू शेतीमध्ये एकादया डॉक्टर प्रमाणे योग्य वेळेस सल्ला देतात. याचा कोरडवाहू शेती विकास साधण्यास मदत मिळत असून कोरडवाहू शेती क्षेत्रात काम करण्यासाठी मोठा वाव आहे असे नमूद केले.

प्रास्ताविक संशोधन संचालक डॉ. खिजर बेग यांनी केले तर परभणी येथील कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पाची माहिती मुख्य शास्त्रज्ञ डॉ. वासुदेव नारखेडे यांनी दिली. सूत्रसंचालन डॉ. पपिता गौरखेडे, यांनी तर आभार हैदराबाद येथील क्रीडाचे मुख्य शास्त्रज्ञ डॉ. बी नर्सीम्लू यांनी मानले. बैठक यशस्वीतेकरीता मुख्यशास्त्रज्ञ डॉ. वासुदेव नारखेडे तसेच प्रकल्पातील शास्त्रज्ञ, डॉ आनंद गोरे, डॉ. मदन पेंडके, डॉ. पपिता गौरखेडे, डॉ गणेश गायकवाड, डॉ. रावसाहेब राऊत यांच्यासह सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी परिश्रम घेतले तर विविध समित्यांचे अध्यक्ष व सदस्य यांनी आयोजनात मोठा सहभाग घेतला.

शास्त्राज्ञांनी बहुविद्याशाखीय दृष्टीकोन ठेवून कार्य करावे....

दिवसेंदिवस जमिनीची प्रत खालावत चाललेली असून यामध्ये सुधार करणे आवश्यक आहे. जमिनीतील अन्नद्रव्य आणि मातीचे नुकसान दिवसेंदिवस होत आहे. भविष्यात एकूण जमिनीच्या तिसरा भाग शेती करण्यास योग्य राहणार नसल्याची शक्यता आहे. यासाठी मृद व जल संधारण केंद्रस्थानी ठेऊन संशोधन कार्यक्रम आखावा लागेल. यासोबतच हवामान बदलामुळे जमीन आणि पिकांच्या उत्पादन क्षमतेवर परिणाम होत आहे. यामुळे सध्या उपयोगात असलेल्या तंत्रज्ञानामध्ये सुधार करण्यासाठी शास्त्राज्ञांनी बहुविद्याशाखीय दृष्टीकोन समोर ठेवून भविष्यात कार्य करावे लागेल, असे मत विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. के. पी. गोरे यांनी व्यक्त केले.



## त्या अपहार प्रकरणी आरोपीस सोमवारपर्यंत पोलिस कोठडीचे आदेश

**पूर्णा,/प्रतिनिधी :** येथील पंचायत समितीच्या अपहार प्रकरणात शुक्रवारी पुर्णा पोलिसांनी पंचायत समितीतील दुसऱ्या आरोपीस अटक केली असून त्यांना शुक्रवारी दुपारी पूर्णा न्यायालयासमोर हजर केले असता सोमवार पर्यंत पोलीस कोठडी ठेवण्याचे आदेश न्यायालयाने पारित केले आहेत.

पूर्ण पंचायत समितीमध्ये झालेल्या लाखो रूपायांच्या अपहार प्रकरणी पुर्णा पोलिसांनी पंचायत समितीतील वरिष्ठ सहाय्यक मंचक बापूराव भिसे यांना अटक करून शुक्रवारी दुपारच्या सुमारास पुर्णा न्यायालयात हजर केले असता सदरील आरोपीस न्यायालयाने सोमवार पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश पारित केले आहेत याप्रकरणी अद्याप सात आरोपी फरार असून यामध्ये दोन गट विकास अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

## मानधानी जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांची ऐतिहासिक स्थळांना भेटीगाठी

**जिंतूर,/प्रतिनिधी-** तालुक्यातील मानधानी येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना ऐतिहासिक स्थळांना भेट देऊन भौगोलिक ठिकाणाला भेटी देऊन पाहणी करून इतिहास जाणून घेतला आहे.

शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ऐतिहासिक ठिकाणे दाखवणे तेथिल इतिहास प्रत्याक्ष माहीत करून घेणे यावेळी इतिहास अनुभवणे या हेतूने मानधानी येथील जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षकांनी पुढाकार घेऊन शैक्षणिक सहलीचे आयोजन केले होते या सहलीत रायगड किल्ला,महाडचे चवदार तळे,मुरुड जंजिरा किल्ला,भंडारा डोंगर,जेजुरी गड यांच्यासह दिवेआगर येथील समुद्र किनारा आदी ठिकाणी भेटी



देण्यात आल्या रायगड किल्ला पुस्तकातून किंवा चित्रातून पाहणे वाचणे यापेक्षा स्वतः किल्ला पायी चालत जाऊन प्रतक्ष्य किल्ला व त्यांचा इतिहास कायमस्वरूपी स्मरणात राहत असतो हा इतिहास विद्यार्थी कधीच विसरू शकत नाही म्हणून शैक्षणी सहल सार्थकी ठरते या सहलीसाठी मुख्याध्यापक टी जी साबळे,धनंजय ईक्कर,माधव खुडे,जयानंद मेत्रे, शिवाजी दराडे, शारदा वडकुते,त्रिवेणी पंडित, संजय बोंबले आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले या सहलीमध्ये शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला होता.

## शिवसेनेत खान यांच्यासह राष्ट्रीय काँग्रेसचे अनेक पदाअधिकारी दाखल

**मानवत,/प्रतिनिधी:** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून राजकीय पूनर्वसन करण्याचा शब्द मिळाल्याने सईद खॉन यांच्यासह राष्ट्रीय कॉंग्रेसचे पदाधिकारी शिवसेनेत दाखल विधानसभा निवडणुकीमध्ये शिवसेनेकडून पाथरी मतदारसंघात तिकीट न मिळाल्याने शिवसेना अल्पसंख्याक विभागाचे प्रदेश अध्यक्ष सईद खान यांनी पदाचा राजीनामा देऊन रासपकडून विधानसभा निवडणूक लढविली होती.


सईद खॉन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ते निकटवर्तीय समजले जात असल्याने निवडणुकी झाल्यानंतर दोन महिन्यात सईद खान यांना राजकीय पूर्नवसन करण्याचा शब्द मिळाल्यानंतर मुंबईत सईद खान यांनी शिवसेनेत कार्यकर्त्यांसह प्रवेश करत घरवापसी केली आहे.

मानवत : नगरपालिका निवडणुकी च्या तोंडावर बाजार समिती माजी संचालक दिनेश कोक्कर, माजी नगर सेवक बालाजी कुऱ्हाडे, ॲड. सतिष चव्हाण यांच्यासह माजी नगरसेवक अ. रहीम अ. करीम, गोपाळ गौड, माजी स्वीकृत नगरसेवक बालाजी गोलाईत, शहराध्यक्ष शाम चव्हाण, सीमा सारडा, शैलेश वडमारे, व्यंकटेश चौधरी, किशोर चव्हाण, युनूस मिलनवाले, शैलेश कब्रूवार, जनार्दन कीर्तने, असेफ खान, अफरोज लाला, प्रदीप अग्रवाल यांनी सईद खान यांच्या नेतृत्वाखाली मुंबई येथे एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. पाथरी मतदारसंघात दोन वर्षात सईद खान यांनी शिवसेना पक्षसंघटना बांधणीचे काम केले होते. निवडणुकीत त्यांना महायुतीकडून शिवसेनेचे तिकीट मिळेल, अशी अपेक्षा होती. एकनाथ शिंदे यांच्याकडून त्यांना उमेदवारीचा शब्द देण्यात आला होता. मात्र, महायुतीमध्ये जागा राष्ट्रवादीच्या वाट्याला आल्याने त्यांनी रासपकडून निवडणूक लढविली. यात त्यांचा पराभव झाला. ५५ हजार मते मिळवत त्यांनी राजकीय लक्ष वेधून घेतले. सईद खान यांची शिवसेनेत घरवापसी होणार, अशी चर्चा होती. मागील १५ दिवसांपूर्वी त्यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती.

## राज्यस्थानी महिला मंडळाच्या अध्यक्षपदी लता गिल्डा

**सेलू,/प्रतिनिधी-** येथील राजस्थानी महिला मंडळाच्या अध्यक्षपदी लता गिल्डा यांची तर सचिव पदी उज्वला भाला यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. येथील बालाजी मंदिर महिला मंडळाची नूतन





कार्यकारणीची निवड करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मावळत्या अध्यक्षा कांचन बाहेती सचिव पुष्पा तोष्णीवाल, उर्मिला बोराडे यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत सहचिटणीस पदी ज्योती काबरा उपाध्यक्ष शर्मिला मालाणी,कोषाध्यक्ष किरण राठी यांची तर सदस्य म्हणून मीरा गिल्डा, मीना मालाणी, दीपा परताणी कीर्ती मंत्री, प्रिती राठी, अंकिता तोष्णीवाल, स्मिता गिल्डा, गीता करवा, पद्मा मंत्री, अश्विनी बिहाणी, दया दायमा, शितल दोडिया, विद्या व्यास, नेहा लोया ,रामेश्वरी लोया, रूपाली जाजू, पूजा तोष्णीवाल यांची निवड करण्यात आली.

## नगरपालिका निवडणूकीतही विकासासोबत राहा- माजी आ.बोर्डीकर

**सेलू,/प्रतिनिधी-** गत सहा वर्षांत शहरातील डि.पी.रस्त्यांना प्राधान्यक्रम देत त्यासोबत स्ट्रीट लाईट ,नाल्या, फुटपाथ इत्यादी विकासाचे कामे करण्यात आली असल्यामूळेच शहरातील नागरीक भाजपासोबत आहेत तसेच आगामी नगरपालिका निवडणूकीतही भाजपाच्या विकासासोबत जनतेने राहून आपल्या विचाराची पालिका निवडूण आणण्याची विनंती माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांनी बूधवार ८ रोजी शंकरलींगमंदीर देवस्थान सभागृह बांधकाम व फूले नगर येथे सिमेंट रस्ता भूमिपूजन प्रसंगी केली.



यावेळी देवस्थानचे अध्यक्ष अशोकआप्पा वाडकर,परभणी जिल्हा उपाध्यक्ष डॉ.ऋतुराज साडेगावकर, तालुका अध्यक्ष ॲड दत्ता कदम, शहाराध्यक्ष अशोक अंभोरे, शिवाजी खेडकर, भाऊसाहेब सोनवणे ,गणेश काटकर मुख्याधिकारी युवराज पौळ, न.प. अभियंता नागेश पैठणकर,धुळगंडे, बालासाहेब सरकाळे, दिनकर वाघ आदींची उपस्थिती होती.पूढे बोलतांना बोर्डीकर म्हणाले की,विकासाचे व्हिजन डोळ्यासमोर ठेवून आमदार मेघना बोर्डीकर यांनी गत पाचवर्षात कामे केली असल्याने समाजातील व्यक्तींनी भरभरून मतदान केले म्हणून आज आमदार मेघना बोर्डीकर राज्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी प्राप्त झाली. आम्ही देखील तेवढ्याच ताकदीने उभं राहून शहारातील गरजा पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहोत. समाजातील गरजा ओळखून त्यांना प्राधान्यक्रम दिला पाहिजे या मताचा मी आहे. कोणत्याही समाजाचं कामं करताना दुजा भाव न ठेवता सर्वांगीण विकास व्हावा यासाठी प्रयत करणारं आहेत.

शहरातील रस्ते, नाल्या, फुटपाथ, स्ट्रीट लाईट, स्वच्छता यावर लक्ष केंद्रित करून शहरात विकास केला जाणार आहे. यासाठी आपण सर्वांनी हिंदुत्व हा विचार मनात ठेवून आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहा. देशात नरेंद्र मोदीतर महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस असल्यामूळे शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आमच्या विचारांची नगर परिषद आमच्या ताब्यात द्या.व मग विकास कामे कशी होतात ती बघा असे अवाहन यावेळी माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक देवस्थानचे अध्यक्ष अशोकआप्पा वाडकर,सुत्रसंचलन सचिव प्रा . मिलिंद झमकडे, आभार निलेश मिटकरी यांनी मानले.याकार्यक्रमासाठी गणेश गोरे, अर्जुन बोरुळ, बाळू काजळे, सुनील चव्हाण, प्रकाश शेरे, ,कपिल फुलारी, दत्ताआप्पा मिटकर , बबन आप्पा झमकडे, राजेंद्रआप्पा नावाडे, राजेंद्रआप्पा महाजन, अरुणआप्पा सोळंके, वाल्मीक खुळे गणेश डेंगळे मोहन माने पप्पू शिंदे विठ्ठल कोकर, अशोक कोपुलवार, सुनील काळे, सुनील चव्हाण, गणेश ढेंगळे, आण्णा केवारे, शिवकुमारआप्पा नावाडे, कानडे आप्पा, निजलिंग तरवडगे आदींनी पूढाकार घेतला.





(छाया-श्रीकांत कुलकर्णी)

बीड शहरात विविध भागांमध्ये कचराकुंड्या ओव्हर फ्लो यामुळे रस्त्यावर कचरा आल्याने नागरिकांना दुर्गंधीशी सामना करावा लागत आहे.

# पंतप्रधान मोदींच्या हस्ते स्वामित्व योजनेंतर्गत प्रॉपर्टी कार्डचे वितरण; बीडमध्ये ना.पंकजा मुंडे राज्य सरकारच्या वतीने प्रमुख अतिथी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ जानेवारी**

केंद्र व राज्य सरकारचा संयुक्त उपक्रम असलेल्या स्वामित्व योजनेंतर्गत पात्र घरमालकांना मालमत्ता कार्डचे वितरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज ऑनलाईन पध्दतीने झाले. बीडमध्ये राज्य सरकारच्या वतीने राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे प्रमुख अतिथी म्हणून ऑनलाईन उपस्थित होत्या. दरम्यान ना. पंकजाताई मुंडे ग्रामविकास मंत्री असताना या योजनेची वीट रचली गेली होती, आता तिचा कळस झाला आहे,ही संपूर्ण जिल्हयासाठी निश्चितच अभिमानाची बाब आहे अशा शब्दांत जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी त्यांची प्रशंसा केली.

गावातील मिळकतींचे जीआयएस सर्वेक्षण व ड्रोनद्वारे गावठाण भूमापन करून घरमालकांना मालमत्ता कार्ड व ई- सनदचे वितरण या योजनेंतर्गत केले जाते. ही योजना सन २०१९ मध्ये ना. पंकजाताई मुंडे ग्रामविकास मंत्री असताना महाराष्ट्रात आखली गेली होती, त्यानंतर संपूर्ण देशभरात योजना लागू झाली,त्याचे रितसर उदघाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २४ एप्रिल २०२० रोजी केले होते. आज या योजनेंतर्गत मालमत्ता कार्डचे वितरण पंतप्रधानांनी ऑनलाईन पध्दतीने केले.

बीडमध्ये ना. पंकजाताई मुंडेंच्या उपस्थितीत ऑनलाईन कार्यक्रम

बीडच्या कार्यक्रमासाठी ना. पंकजाताई मुंडे हया राज्य सरकारच्या वतीने प्रमुख अतिथी म्हणून ऑनलाईन उपस्थित होत्या. पंतप्रधानांचा कार्यक्रम होण्यापूर्वी सकाळी ११.३० वा. त्यांच्या उपस्थितीत योजनेचा प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मनोगत करताना त्या म्हणाल्या, प्रॉपर्टी कार्डची संकल्पना योजना मी मंत्री असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली कॅबिनेट मध्ये मांडली होती. तेव्हा पंतप्रधान मोदींना आम्ही सादरीकरणही केले होते, आपल्या गावात जमीन व प्रॉपर्टीचे खूप तंटे असतात, ते कायमस्वरूपी सोडविण्यासाठी ही योजना खूप महत्वाची आहे. पंतप्रधान मोदींनी या योजनेला स्वामित्व हे खूप चांगले नाव दिले आणि यात जिवंतपणा आणला आहे. ही योजना त्यांनी आता देशभरात लागू केली आहे. या योजनेची सुरवात आपल्या जिल्ह्याने सुरू केली ही आपल्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. सर्व सामान्य लोकांसाठी मोदी खूप चांगल्या संकल्पना आणतात, त्याचाच हा भाग आहे. ही योजना उत्तर प्रदेशने खूप चांगल्या प्रकारे राबवली आहे, त्यापेक्षा काकणभर काम महाराष्ट्राला करायचे आहे असं ना. पंकजाताई म्हणाल्या.

जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रशंसा

ना. पंकजाताई सन २०१९ मध्ये ग्रामविकास मंत्री असताना ह्या योजनेची संकल्पना पुढे आली होती, आज या योजनेने मूर्त स्वरूप धारण केले आहे. ही आपल्या जिल्ह्यासाठी भूषणावह बाब आहे. ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासी कळस..असं म्हटलं तर वावग ठरणार नाही अशा शब्दांत जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी ना. पंकजाताईंनी केलेल्या कामाची प्रशंसा केली.

या कार्यक्रमास जिल्हाधिकारी पाठक यांचेसह निवासी उप जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कृष्णा शिंदे आदी अधिकारी व पात्र लाभार्थी उपस्थित होते. प्रशिक्षण कार्यक्रमानंतर ना. पंकजाताई पंतप्रधान मोदी यांच्या कार्यक्रमात ऑनलाईन सहभाग घेऊन त्यांचे मार्गदर्शन ऐकले.

# एक है तो सेफ है मंत्र लक्षात घेऊन एकजुटीने कामाला लागा-शंकर देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१८ जानेवारी**

माजलगाव भाजपाच्या वतीने व्यंकटेश हॉल येथे सदस्य नोंदणी महा अभियान बैठक संपन्न झाली. लोकनेत्या तथा पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे व माजी खा.प्रीतम मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक घेण्यात आली.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष भाजपाचे जिल्हा अध्यक्ष शंकर देशमुख म्हणाले, पक्षाची मजबूत संघटनात्मक बांधणी करण्यासाठी व पुढील येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका बहुमताने निवडून आणण्यासाठी भाजपाच्या सर्व पदाधिकारी मा. जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य नगरसेवक सरपंच मा सरपंच शक्ती प्रमुख बूथ प्रमुख सर्व कार्यकर्ते यांनी घरोघरी जाऊन जास्तीत जास्त प्रमाणात भाजप सदस्य नोंदणी करून मोदीजींनी दिलेला मंत्र एक है तो सेफ है लक्षात घेऊन सर्वांनी एकजुटीने एक दिलाने कामाला लागावे. या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभलेले या अभियानाचे प्रभारी मनोज पांगरकर म्हणाले विधानसभा निवडणुकीच्या ऐतिहासिक विजयानंतर पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी हे सदस्य नोदणी अभियान पर्व राबवले जात आहे , तसेच दर सहा वर्षातून एकदा भाजपाचे संघटन पर्व होत असते केंद्र पासून ते प्रदेशापर्यंत सर्व ठिकाणी प्राथमिक सदस्यता नोंदणीस सुरुवात होते त्याचाच एक भाग म्हणून राष्ट्राला समर्पित भावनेतून काम करणाऱ्या आणि जगभरात सर्वात जास्तीत जास्त सदस्य असलेला एकमेव भाजप पक्ष आहे, जो की संघटनेच्या बळावर देशभरात आज अतिशय नोंदणी केलेले भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ प्रशांत पाटील व मा नगराध्यक्ष अशोक तिडके यांचा सत्कार व्यासपीठावरील सर्व मान्यवरांनी केला. या कार्यक्रम प्रसंगी रूपाली कचरे ज्ञानेश्वर सरवदे बाबासाहेब आगे दिपक



यशस्वी वाटचाल करताना दिसत आहे . या कार्यक्रमाच्या प्रसंगी व्यासपीठावर उपस्थित असणारे भाजपाचे जेष्ठ नेते डॉ प्रकाश आनंदगावकर , जिल्हा संघटन सरचिटणीस देविदास नागरगोजे , तालुकाध्यक्ष अरुण राऊत ज्ञानेश्वर मेंडके यांनीही उपस्थित सर्व भाजपा पदाधिकारी कार्यकर्त्यांना सविस्तर असे मार्गदर्शन केले तर या कार्यक्रमाचे प्रास्ताविक या अभियानाचे संयोजक डॉ अशोक तिडके सहसंयोजक विनायक रत्नपारखी यांनी केले व सूत्रसंचालन अनंत जगताप यांनी केले . या कार्यक्रमास व्यासपीठावर उपस्थित असलेले व ३०० पेक्षा जास्त भाजपा सदस्य मुंडे किसनराव वगरे रमेश शेंडगे दत्ता महाजन चंद्रकांत झोडगे पांडुरंग झोडगे प्रकाश शिंदे सर्जेराव पोटभरे, सत्यनारायण ऊनवणे बाळासाहेब क्षीरसागर, शरद पवार संजय पवार संजय चव्हाण बालासाहेब तेलगड शेख चांद भाजपाअल्पसंख्याक आघाडीचे ता अध्यक्ष खय्युम पठाण ईश्वर आप्पा खुरपे कैलास खुरपे राजभाऊ लोखंडे भाजपा आयटी प्रमुख शेख शहाबाज नितीन घायतिडक तात्या पांचाळ अर्जुन पंडित बाळू साळवे संतोष जाधव सुभाष कांबळे वसंत वाघमारे यांच्यासह सर्व पदाधिकारी शक्ती प्रमुख बुथ प्रमुख व कार्यकर्ते उपस्थित होते.

# किट्टी आडगावच्या सरपंच, उपसरपंचांचा अविश्वास ठराव बारगळला

## तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली झाली बैठक

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१८ जानेवारी**

तालुक्यातील किट्टी आडगाव ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त सरपंच रूक्मानंद खेत्रे व उपसरपंच गोविंद आगे यांचेवर काही सदस्यांनी तहसिलदारांकडे आणलेला अविश्वास ठराव दि. १६ जानेवारी रोजी झालेल्या बैठकीत सदस्यांअभावी बारगळला आहे.

तालुक्यातील किट्टी आडगाव येथील ग्रामपंचायत १३ सदस्य व १ सरपंच मिळून १४ ची बॉडी आहे. यापैकी १२ सदस्यांनी स्वाक्षरीसह दि. १० जानेवारी २०२५ रोजी लोकनियुक्त सरपंच रूक्मानंद खेत्रे व उपसरपंच गोविंद आगे यांच्यावर अविश्वास ठराव तहसिलदार माजलगाव यांचेकडे दाखल केला होता. या अविश्वास ठरावासंदर्भात दि. १६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसिलदार संतोष रूईकर यांचे अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत कार्यालयात विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेस सरपंच, उपसरपंच यांचेवरील अविश्वास ठरावासाठी आवश्यक असलेले ११ सदस्यांचे बहुमत आवश्यक होते परंतु ग्रामपंचायत कार्यालयात ऐनवेळी एकही सदस्य उपस्थित न राहिल्याने लोकनियुक्त सरपंच रूक्मानंद खेत्रे व उपसरपंच गोविंद आगे यांचेविरूध्द तहसिल कार्यालयात दाखल केलेला अविश्वास ठराव नामंजुर करण्यात आल्याचा निर्वाळा तहसिलदार संतोष रूईकर यांनी दिला. या बैठकीस ग्रामपंचायत कार्यालयाचे सचिव महेश गेंदने, निवडणुक कर्मचारी मुरलीधर चव्हाण, शिक्षक श्री. आवारे, मंडळाधिकारी रोहिदास बांगर, तलाठी संघर्षकुमार ओवे, ग्रामपंचायत कर्मचारी उध्दव कदम यांची उपस्थिती होती तर याठिकाणी कुठलाही अनुचित प्रकार घडु नये यासाठी एपीआय बालक कोळी, पिएसआय सारंग व पोलिस कर्मचारी ऐटवार यांनी चोख पोलिस बंदोबस्त ठेवला होता. दरम्यान गावात सरपंच रूक्मानंद खेत्रे यांची विकासकामे चांगली असुन काही खोडसाळ व्यक्तींच्या नियोजनाखाली दाखल केलेला अविश्वासाचा प्रस्ताव बारगळला आहे.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालय ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१८ जानेवारी**

महाराष्ट्र शासनाच्यावतीने वाचन संस्कृती विकसित करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अभियाना अंतर्गत १ जानेवारी ते १५ पर्यंत वाचनाशी निगडित विविध उपक्रम संपूर्ण राज्यात आयोजित करण्यात आले आहेत.या अभियानाचा एक भाग म्हणून सुंदरराव सोळंके महाविद्यालयात ग्रंथालय विभागामार्फत एक दिवसीय ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

या ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन पत्रकार कमलेश जाब्रस यांच्या हस्ते करण्यात आले .या ग्रंथ प्रदर्शनात नामवंत लेखक, कवी, तसेच महापुरुष, शास्त्रज्ञ, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील व्यक्तीमत्व , धार्मिक व ऐतिहासिक स्वरुपातील पुस्तकांची मांडणी करण्यात आली होती.

ग्रंथ प्रदर्शनात महाविद्यालयातील विद्यार्थी आणि शिक्षकांनी भेट देऊन विविध पुस्तकांचे वाचन केले. ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन ग्रंथपाल दत्ता सोळंके व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.उमेश राठोड यांनी केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी. के .सानप सर होते. यावेळी उपप्राचार्य डॉ.एन.के.मुळे, उपप्राचार्य डॉ.एम.ए.कव्हळे, उपप्राचार्य पी.एस.शिंदे , उपप्राचार्य पी.व्ही.गवते , अधिक्षक एस.व्ही.एरंडे, सावंत सर व प्राध्यापक वृंद इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बनसोडे बी. एस. यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विलास कोल्हे ,सखाराम धोत्रे, फारुख शेख, त्रिशरण टाकणखार, रमेश शिंदे व सुनील राऊत इत्यादींनी परिश्रम घेतले .

# ॲड.दत्तात्रय आंधळे यांची नोटरी पदी नियुक्ती झाल्याबद्दल मेरूगिरी मॉर्निंग ग्रुपच्या वतीने सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१८ जानेवारी**

परळी वैजनाथ येथील प्रसिद्ध विधीज्ञ तथा सांप्रदायिक व साहित्यिक क्षेत्रात नवलौकिक असणारे ॲड.दत्तात्रय रावसाहेब आंधळे (महाराज) यांची भारत सरकारच्या नोटरी पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा मेरूगिरी विहारी मॉर्निंग ग्रुपच्या सर्व सदस्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, शहरातील प्रख्यात विधिज्ञ तथा सांप्रदायिक व साहित्यिक क्षेत्रामध्ये नवाजलेले ॲड.दत्तात्रय आंधळे यांना भारत सरकारच्या वतीने नोटरी पदी नियुक्ती देण्यात आली आहे. तसे पत्र ड. आंधळे यांना नुकतेच प्राप्त झाले असून आता त्यांना परळी तालुक्याच्या न्यायालयीन कक्षेत नोटरी म्हणून कार्य करता



येणार आहे. या नियुक्ती बद्दल त्यांचा परळी वैजनाथ येथील मेरूगिरी मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांच्या वतीने पुष्पहार देऊन यथोचित सत्कार करत त्यांच्या पुढील कार्यासाठी सदिच्छा देण्यात आल्या. यावेळी सत्कार करताना प्रभाकरराव देशमुख, पत्रकार संजय खाकरे, पत्रकार श्रीराम लांडगे, कोमावर सर, शिवसेना शहरप्रमुख वैजनाथ माने, विलासराव वेदपाठक, भागवत कसबे, शांतीनाथ शिंदे, अनंत देशमुख, सचिन स्वामी, प्रकाश ईटके, अर्जुन सुरवसे, दिनेशसेठ शिरापुरे, विनायक सेठ दहिवाळ, काशीनाथराव देशमुख, महावीरसेठ, शैलेश फुलारी, वैभव अंबेकर यांच्यासह मेरूगिरी विहारी मॉर्निंग ग्रुपचे सर्व मान्यवर सदस्य उपस्थित होते.

# परळीच्या शेख हुमायून यांनी आफ्रिकेत वक्तृत्वात पटकावला प्रथम क्रमांक




**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१८ जानेवारी**

आफ्रिका खंडातील मलावी या देशात असलेल्या परळीचे भूमिपुत्र शेख हुमायून यांनी विश्व हिंदी दिवसाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या भाषण स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला. याबद्दल शेख हुमायून यांचे आफ्रिकेसह भारतात अभिनंदन केले जात आहे.

मूळ परळीचे असलेले शेख हुमायून मागील २० वर्षांपासून आफ्रिकेत नौकरी करतात. मलावी येथील नामवंत कंपनीत ऑपरेशन मॅनेजर या पदावर कार्यरत असलेले हुमायून तेथील अनेक भारतीय कार्यक्रमात सहभाग घेत असतात. जन्मभूमी पासून हजारो किलोमीटर वर राहून सुद्धा आपल्या देशाविषयी असलेल्या आस्थेतून शेख हुमायून परदेशस्थ भारतीय नागरिकांना एकत्र करून अनेक कार्यक्रम राबवित असतात.विश्व हिंदी दिवसाच्या निमित्ताने मलावी येथील लिलोंग्वे येथे भारतीय उच्चायुक्तालयाने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात अनेक भारतीयांनी सहभाग घेतला होता. हिंदी दिवसाच्या निमित्ताने हिंदीत भाषण स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत शेख हुमायून यांनी २०४७ मध्ये माझ्या स्वप्नातील भारत कसा असेल या विषयावर भाषण करीत प्रथम क्रमांक पटकावला. मलावी येथील भारताचे उच्चायुक्त एस. गोपालकृष्णन यांच्या हस्ते शेख हुमायून यांना प्रमाणपत्र देण्यात आले. या यशाबद्दल त्यांचे भारतातील मित्र परिवाराने अभिनंदन केले आहे.

# पाझर तलावात विनापरवाना पाण्याच्या मोटारी टाकल्यास कारवाई करण्यात येईल

## धावज्याची वाडी , तांदळ्याची वाडी येथील पाझर तलावास भेट देऊन तहसीलदार शेळके यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ जानेवारी**

बुधवार १५ जानेवारी रोजी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी धावज्याची वाडी येथील तलावास भेट दिली . यावेळी त्यांनी वरील प्रमाणे आवाहन केले . बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी व बीडच्या उपविगीय अधिकारी कविता जाधव यांच्या समन्वयाने सदरची भेट दिली, असे तहसीलदार यांनी सांगितले . धावज्याची वाडीच्या सरपंच सोनाली काटकर यांनी तहसीलदार यांना पत्र लिहून या पाझर तलावात धावज्याची वाडी , खर्डेवाडी, तांदळ्याची वाडी या गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरी असून तलावाच्या आजूबाजूचे शेतकरी विनापरवाना तलावात मोटारी टाकुन उपसा करत आहेत , अशा प्रकारची तक्रार दिली होती . विनापरवाना पाण्याचा उपसा होऊ नये , उन्हाळ्यात पाणीटंचाई निर्माण होऊ नये यासाठी स्वतः भेट देण्याची विनंती त्यांनी केली होती . त्या



अनुषंगाने तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी मंडळ अधिकारी दिपाली आघाव , तलाठी अमोल आधापुरे यांच्यासह धावज्याची वाडी येथील नागरिक , माजी सरपंच महेंद्र काटकर , उपसरपंच विष्णू सांगळे , ग्रामपंचायत सदस्य संजीवन काटे , ग्रामसेवक एन डी सुरवसे , विलास काटे , बंडू तांदळे , उमेश तांदळे , श्रीराम तांदळे , प्रदीप काटे, चक्रधर भोसले , लाईनमन पांडुरंग घरत , चंद्रसेन तांदळे , प्रभू सानप यांच्यासह भेट दिली .भेटी दरम्यान शेळके यांच्या निदर्शनास आले की आजूबाजूचे काही शेतकरी तलावाच्या क्षेत्रात पाण्याच्या मोटरी टाकण्याच्या तयारीत आहेत . तहसीलदारांनी आजूबाजूच्या सर्व शेतकऱ्यांना बोलवून समज दिली की विनापरवाना जर कोणी पाण्याची मोटर टाकली आणि त्यामुळे पाणीटंचाई निर्माण झाली तर त्यांच्यावर संबंधित विभागामार्फत कार्यवाही करण्यात येईल. उपस्थित शेतकऱ्यांनी सुद्धा आम्ही विनापरवाना अशा प्रकारे पाण्याची मोटर टाकणार नाही, अशी ग्वाही दिली . उपस्थित लाईनमन यांना तहसीलदार यांनी स्पष्ट सूचना दिल्या की कोणालाही विनापरवाना वीज जोडणी देऊ नये. जर कोणी विनापरवाना वीजजोडणी घेतली तर त्यांच्यावर तात्काळ कार्यवाही करावी कारवाई करावी. यावेळी बोलताना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी असेही सांगितले की शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत जिल्हाधिकारी अविनाश पाठक हे अत्यंत सजग आहेत . दुष्काळ अनुदान यादी असो अथवा रस्त्याचे प्रश्न असो सर्वांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्याचा प्रशासनाचा मानस आहे , असे जिल्हाधिकारी नेहमी नमूद करत असतात . सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीच्या अनुषंगाने जिल्हाभरात बाधित शेतकऱ्यांच्या याद्या अपलोड कार्य करण्याची कार्यवाही सुरू असून लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान जमा होईल याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी आजच आढावा घेतल्याचे तहसीलदार म्हटले. सार्वजनिक पाण्याच्या स्त्रोतावरून गावोगावी पाण्याची व्यवस्था करण्यात येते त्यासाठी अशा ठिकाणी विहिरी खोदल्या जातात . आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी विनापरवाना पाणी उपसा केला नाही तर उन्हाळ्यात पाणीटंचाई जाणवणार नाही आणि टँकर लावावे लागणार नाहीत . यासाठी सर्वांनीच प्रशासनाला मदत करणे आवश्यक असल्याचे तलाठी अमोल अधापुरे यांनी यावेळी नमूद केले. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी बीड तालुक्याचा पदभार घेतल्यापासून शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत त्यांनी संवेदनशीलता दाखविली आहे . त्यामुळे ते सर्वांना आपलेसे तहसीलदार वाटू लागले आहेत.

# जून महिन्यापर्यंत जलेश्वर तलावाचे सुशोभिकरण होणार- आ. मुटकुळे

## शेतकऱ्यांकडून जलेश्वर तलावातून शेकडो ब्रास गाळाचा उपसा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जानेवारी**

प्राचीन जलेश्वर तलावाच्या संरक्षण भिंत, विहीरीचे, चौपरी रस्त्याचे काम युध्दपातळीवर सुरू आहे. यानंतर ४६ कोटी निधीचा प्रस्ताव तलावाच्या सुशोभिकरणासाठी पाठविण्यात आला असून काही दिवसांतच त्याला मंजुरी मिळणार आहे. जूनपर्यंत शहरातील जलेश्वर तलावाचे सुशोभिकरण करणार अशी माहीती भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी दिली.

शहरातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या प्राचीन जलेश्वर तलावाच्या सुशोभिकरणाचे तसेच तलावातील वाया जाणारे पाणी कयाधू नदीत सोडण्यासाठी युध्द-पातळीवर काम नगर पालिकेच्यावतीने सुरू आहे. या कामांची पाहणी शनिवारी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी केली. यावेळी तलावातील विहीर तसेच रस्त्यांचे, तलावाभोवती बांधण्यात येत असलेल्या संरक्षण भिंतीचे कामाची पाहणी आ. मुटकुळे यांनी केली. यावेळी नगर पालिकेचे अभियंता, चौधरी यांची उपस्थिती होती. या कामांची पाहणी केल्यानंतर आ. मुटकुळे म्हणाले की, संबंधित यंत्रणेला उर्वरित कामे गतीने आणि उत्कृष्ट दर्जाची करण्याच्या सुचना दिल्या आहेत.

जलेश्वर तलावातून परिसरातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर टिप्पर आणि ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेकडो ब्रास गाळ उपसा करून शेतात नेत आहे. शासनाच्या धोरणानुसार शेतकरी तलावातील गाळ मोठ्या प्रमाणावर नेऊन शेतात टाकीत आहे. हे राष्ट्रीय काम असून शहरातील नागरिकांनी, पोलिस प्रशासनाने तसेच इतर यंत्रणेने या कामात सहकार्य करावे असे आ-वाहन आ. मुटकुळे यांनी केले.

यावेळी बोलतांना ते म्हणाले की, जलेश्वर तलावाच्या सुशोभिकरणासाठी आम्ही ४६ कोटी निधीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला असून त्याला लवकरच मंजूरी मिळणार आहे. या निधीतून शहरातील जलेशवर तलावाचे सौंदर्यीकरण करण्यात येणार असून हे एक उत्तम पर्यटन स्थळ होण-ार आहे. तलावाच्या मध्यभागी भव्य महादेवाची मुर्ती उभारण्याचा आमचा मानस आहे. या तलावातील गाळ काढल्यामुळे बाराही महिने तलावात पाणी राहील्यास बोटींगचाही आनंद पर्यटकांना घेता येणार आहे. यावेळी गुत्तेदार मयुर कयाल, मनीश कयाल, विक्रात राठोड यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पूर आणि दुष्काळमुक्त करण्यासाठी वाहून जाणारे पाणी अडवा

## पाणी परिषदेत राजेंद्रसिंह यांचे आवाहन




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जानेवारी**

चला जाणूया नदीला उपक्रमाच्या माध्यमातून हिंगोली जिल्ह्याला पूर आणि दुष्काळमुक्त करण्यासाठी येथील नद्यांचे वाहून जाणारे पाणी लोकसहभागातून अडवावे लागेल, असे प्रतिपादन जागतिक दुष्काळ व पूर नियंत्रण आयोगाचे अध्यक्ष तथा रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते, जलपुरुष राजेंद्रसिंह राणा यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित एकदिवसीय पाणी परिषदेला संबोधित करताना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले, सरपंच भास्करराव पेरे पाटील, चला जाणूया नदीला उपक्रमाचे सदस्य तथा उगम संस्थेचे अध्यक्ष जयाजी पाईकराव, उपजिल्हाधिकारी अनिल माचेवाड, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी डॉ. राजेंद्र कदम, विभागीय वन अधिकारी राजेंद्र नाळे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना श्री. राणा म्हणाले, नदीला समजून घेऊन प्रदूषणावर मात करण्यासाठी त्यावर उपाययोजना करण्याची गरज आहे. नदीवरील अतिक्रमणामुळे व नदीमध्ये टाकण्यात येणा-या मानवनिर्मित भरमसाठ कचऱ्यामुळे त्यांचा मूळ प्रवाह बाधित होत आहे. त्यामुळे पावसाळ्यात प्रचंड पूर तर पावसाळा संपताच अल्पावधीतच दुष्काळाचा सामना करावा लागत आहे. जगामध्ये सगळीकडे शहरीकरण वाढलेले आहे. आपल्या जिल्ह्यातील नद्यांची सीमा तपासून घेऊन त्या अतिक्रमणमुक्त करण्यासाठी त्यांचे आरेखन करणे आवश्यक आहे. याकामी जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी उपविभागीय अधिकारी यांना या कामी लक्ष घालण्याच्या सूचना देण्याबाबत विनंती केली. तसेच शहरानजीक असलेल्या नदीमध्ये उद्योगधंद्याचे सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता थेट सोडले जात असल्यामुळे त्या प्रदूषित होत आहेत. यातून नागरिकांचे व नदीचे आरोग्य धोक्यात येत असेही श्री. राणा यावेळी म्हणाले. पाण्याची धूप थांबविण्यासाठी वृक्षारोपण करणे आवश्यक असून, ओढे-नाले, तलाव, नदी आदी जलपरिसंस्थावर झालेले मानवी अतिक्रमणही याला कारणीभूत असल्याचे त्यांनी सांगितले. अशा परिसंस्था अतिक्रमणमुक्त केल्यास त्या भागाला अगदी सहजरित्या पूर व दुष्कळमुक्ती करता येऊ शकते, असे जलपुरुष डॉ. राजेंद्र सिंह राणा यांनी सांगितले.

आदर्श गावचे सरपंच भास्करराव पेरे पाटील यांनी बोलताना म्हणाले, जयाजी पाईकराव यांनी कयाधू नदीला पुनरुज्जीवित करण्याचा वसा घेतला आहे. थेंबे थेंबे तळे साचेनुसारच 'थेंबे थेंबे तळे आटे' म्हणताना त्यांनी पाणी अडवून जमिनीत जिरवण्याचा, मुरवण्याचा उपस्थितांना सल्ला दिला. राज्य शासनाच्या विविध योजना असताना अद्यापही अनेक गावात शोषखड्डेच नाहीत. दैनंदिन वापरातील पाणी हे शोषखड्ड्यातच जिरविले गेले पाहीजे. ३० फुटावरील पाणीपातळी आता ३०० फुटापर्यंत पोहचली आहे, यावर विचार न करता आता प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची वेळ आली आहे. पाणी आणि झाडांचे अतूट संबंध आहेत. त्यामुळे नागरिकांसोबतच शासकीय यंत्रणांनी झाडे लावण्याबाबत विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. आधी केले मग सांगितले या उक्तीप्रमाणे सर्वांनी पुढाकार घेण्याची आवश्यकता असल्याचे श्री. पेरे-पाटील यांनी सांगीतले. यावेळी त्यांनी त्यांच्या गावात राबविलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी पावसाळा संपताच आटणाऱ्या नद्या बारमाही वाहत्या ठेवण्यासाठी लोकसहभाग वाढवावा लागेल, असे सांगून जलसमस्येवर मात करण्यासाठी उपाययोजना कराव्या लागतील. या उपाययोजना करताना मूळ मुद्दावर लक्ष देणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. कयाधू नदीवरील ३६५ गावांमध्ये गावनिहाय आश्वासित पाणी कृती आराखडा राबविताना पाण्याबाबत जनजागृती होणे आवश्यक असल्याचे सांगून, नागरिकांची मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे. तसेच याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी लोकसहभागही तितकाच महत्वाचा असल्याचे सांगितले. यावेळी नरेंद्र चुग, सुशांत पाईकराव यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकास कांबळे यांनी केते तर आभार जयाजी पाईकराव यांनी मानले. या कार्यशाळेला प्रशासकीय अधिकारी, चला जाणूया नदीला अभियान समितीचे सदस्य सचिव, जलयुक्त शिवार अभियान समितीचे सदस्य, गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार समिती सदस्य, प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना, जल-साक्षरता केंद्र समिती, रोजगार हमी योजना केंद्र समिती, जैवविविधता समिती आणि पंचायत विकास इंडेक्स समितीचे सदस्य यावेळी उपस्थित होते.

# हिंगोलीत विद्यार्थीनीचा गळफास घेत आत्महत्येचा प्रयत्न, अद्याप कारण अस्पष्ट, शासकीय रूग्णालयात उपचार सुरू

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जानेवारी**

हिंगोली येथील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील मुलींच्या वसतीगृहातील १२ वीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनीने शनिवारी ता १८ रोजी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास खोलीमध्ये गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली आहे. सदरील विद्यार्थीनीला उपचारासाठी शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनास्थळी पोलिस दाखल आहेत. कारण अद्याप अस्पष्ट आहे.

हिंगोली येथील शासकीय रूग्णालयाच्या बाजूलाच सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विभागांतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील मुलींचे वसतीगृह आहे. याठिकाणी तालुक्यातील ढोलउमरी येथील विद्यार्थीनी इतर तीन विद्यार्थीनीसह राहते. शहरातील एका महाविद्यालयात ती बारावीला शिक्षण घेत आहे.

दरम्यान, आज सकाळी तिच्या खोलीतील इतर तीन विद्यार्थीनी कामानिमित्त बाहेर गेल्या होत्या. यावेळी ती एकटीच खोलीमध्ये होती. यावेळी तिने खोलीचा दरवाजा लावून गळफास घेतला. अवघ्या काही वेळातच इतर विद्यार्थीनींना खिडकीच्या काचेतून हा प्रकार दिसला. विद्यार्थीनी परिसरातील दुसऱ्या वसतीगृहातील कर्मचाऱ्यांनी खिडकीच्या काचा फोडून खोलीत प्रवेश केला. त्यानंतर तिला खाली उतरवून तातडीने शासकीय रूग्णालयात दाखल केले आहे.

या घटनेची माहीती मिळताच जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी तातडीने पोलिसांना माहीती देऊन घटनास्थळी रवाना केले. अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील, शहर पोलिस ठाण्याचे पोनि नरेंद्र पाडळकर यांचय पथकाने घटनास्थळी व रूग्णालयात भेट दऊन पाहणी केली. तसेच तिचे कुटुंबीय देखील शासकीय रूग्णालयात दाखल झाले.

दरम्यान,विद्यार्थीनीवर शासकीय रूग्णालयात उपचार सुरू आहेत. सध्या तिची परिस्थिती नाजूक असल्याने पोलिसांना तिचा जवाब नोंदविता आला आला नाही. त्यामुळे तिने हे पाऊल का उचलले हे कळू शकले नाही. मात्र या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे.

## संक्षिप्त वृत्त

### सरपंचाला पदमुक्त करण्याची मागणी

औंढा नागनाथ- शिरड शहापूर येथील विद्यमान सरपंच जितू उर्फ यशवंत गणेश रावले यांनी पदाचा गैरफायदा धेत शासकीय निधीतून त्यांच्या गावातील दुकानासमोर पेवर ब्लॉक टाकला आहे. विकास कामातील साहीत्या स्वत: च्या फायद्याकरिता केल्यामुळे ग्रामपंचायत अधिनियम १९५८(३९) चे उल्लंघन केल्याप्रकरणी त्यांना पदमुक्त करून शासकीय निधी वसून करून फौजदारी कार्यवाही करण्याची मागणी मुख्यकार्यकारी अधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे आसेफ रजा, सय्यद मोसीन, हनीफ पठाण यांनी केली आहे.

### अवैध गौण खनिज प्रकरणी निर्दोष मुक्तता

हिंगोली- शासकीय कामात अडथळा व गौण खनिज चोरी ( वाळू) अवैध वाहतूक करताना पकडल्यासंबंधी फिर्यादी श्रीकांत मदीलवार मंडळ अधिकारी भांडेगाव यांनी पोलीस स्टेशन हिंगोली ग्रामीण येथे दिनांक ३/०२/२०२२ रोजी फिर्याद दिली सदर फिर्यादीवरून कलम ३५३, १८६, ३७९ भा द वी प्रमाणे आरोपी नारायण बाबुराव डोल्हारे याच्या विरोधात गुर न २८/२०२२ दाखल झाला त्यानंतर तपासी अमलदार यांनी तपास करून विद्यमान न्यायालयात दोषारोप दाखल केला त्यावरून सरकार विरुद्ध नारायण या प्रकरणात सहकारी पक्षाने एकूण सात साक्षीदार तपासले. अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश देशमुख यांनी पुराव्या अभावी दिनांक १६/०१/२०२५ रोजी प्रस्तुत प्रकरणातील आरोपी नारायण बाबुराव डोलारे निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीने अँड जी के गायकवाड पाटील यांनी काम पाहिले व ॲड योगेश खिलारी, ॲड रिठे, ॲड रवी जाधव, ॲड टेकाळे, ॲड राज आडे यांनी सहकार्य केले.

### सकल मराठा समाजाची आढावा बैठक



हिंगोली- येथील शासकीय विश्रामगृहात शनिवारी सकल मराठा समाजाची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी मराठा आरक्षणासंदर्भात दि २० जानेवारीला जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करून दि २६ जानेवारीपासून धरणे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी जिल्ह्यातील सकल मराठा समाजातील पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच समन्वयक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# शहरातील विविध कॉलनीत आ. तान्हाजी मुटकुळे यांचा नागरी सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जानेवारी**



येथील दत्तात्रय नगर, लाला लजपत राय नगर व छत्रपती नगर यांच्या संयुक्त विद्यमाने हिंगोली विधानसभेचे नवनिर्वाचित आमदार यांचा नागरी सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंगोली नगरपालिकेचे नगराध्यक्ष बाबाराव बांगर, सत्कारमूर्ती आमदार तान्हाजीराव मुटकुळे, प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, उत्तमराव जगताप ज्ञानदेव जगताप, प्रशांत सोनी, आशिष जयस्वाल यांची उपस्थिती होती.

दत्तात्रय नगर, लाला लजपतराय नगर व छत्रपती नगर यामधील महिला भगिनींनी सत्कारमूर्ती व प्रमुख पाहुण्यांचे औक्षण करून कार्यक्रमाचा शुभारंभ केला. स्वागतासाठी रेखीव अशी रांगोळी सुप्रसिद्ध शरद नखाते यांनी रेखाटले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते राष्ट्रमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मेजर पंढरीनाथ घुगे यांनी तर प्रास्ताविक कैलाश तावरे व आभार प्रदर्शन कैलास शैव यांनी केले. फोटोग्राफी व्यवस्था संदीप बोरकर, बैठक व्यवस्था शिवाजीराव मेटकर ,श्री जयस्वाल, गणेश बोरकर, जगताप, गणेश कावरखे तर निमंत्रण व स्वागत व्यवस्था त्र्यंबकराव लोंढे, संजय मुसळे, गिरी, मनोज शर्मा यांनी केली. प्रमुख पाहुणे दिलीप चव्हाण यांनी नगराच्या विकासाबाबत सतत जागरूक राहून समस्या सोडविण्याचे काम मागील पाच वर्ष केले आहे असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व नगराध्यक्ष बाबारावजी बांगर यांनी २०१४ ते २०२४ या कालावधीत हिंगोलीच्या विकासाच्या आलेख सतत उंचावत राहिला. केंद्र. सरकार , राज्य सरकार यांच्या माध्यमातून निधी आणण्यासाठी हिंगोलीचे आमदार व आजचे सत्कारमूर्ती यांची मदत व मार्गदर्शन लाभले त्यामुळे नगराचा विकास करण्याचं माझं स्वप्न सत्यात उतरलं . समविचारी केंद्र राज्य व स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधी असल्यास विकासची गती वाढते हे उत्तम उदाहरण हिंगोली शहराने मागील दहा वर्षाच्या काळात पाहिले आहे. आपण काम करणाऱ्या व्यक्तींना आपली सेवा करण्याची संधी द्याल असा आशावाद करत कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप केला.

सत्काराला उत्तर देताना या तीनही नगराने माझा सत्कार केला त्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करतो. तीनही नगर, हिंगोली विधानसभा कार्यक्षेत्र आणि हिंगोली नगर परिषदेच्या माध्यमातून शहराचा विकास करण्यासाठी कटिबद्ध असून भविष्यात केंद्र व राज्य यांच्या मदतीने मी निधी आणण्याचा व दर्जेदार विकास कामातून खर्च करण्याचे आपणास अभिवचन देतो. मागील काळात हिंगोली शहरातील धार्मिक आस्था असलेलं जलेश्वर एक सुंदर पर्यटन स्थळ व हिंगोली शहराच्या विकासात कोट्यावधी रुपयाचा निधी आणण्यात यश आले. यापुढेही हिंगोली विधानसभेच्या विकासासाठी शासनाकडून निधी अधिकाधिक मिळवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करून या विधानसभेतील शहर आणि ग्रामीण भाग विकसित करण्याचं स्वप्न प्रामाणिकपणे पूर्ण करेल असे सत्काराला उत्तर दिले. नागरी सन्मान सोहळा सुंदर व नियोजनबद्ध करण्यासाठी दत्तात्रय नगर व छत्रपती नगर या नगरातील समस्त महिला भगिनी व बांधवांनी परिश्रम केले.

# पीएम गती शक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन पोर्टलबाबत कर्मचाऱ्यांना एकदिवशीय प्रशिक्षण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जानेवारी**

जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालयांनी प्रधानमंत्री गतीशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन पोर्टलचा सुलभ आणि सहजरित्या वापर व त्यावर अपलोड करावयाच्या माहितीबाबत जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांच्यामार्फत आज गुरुवार (दि.१६) रोजी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय येथे आयोजन करण्यात आले होते. या एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमास जिल्ह्यातील संबंधित यंत्रणांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी जी. जी. चितळे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी प्रदीप नळगीरकर यांच्यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या एकदिवशीय प्रशिक्षण कार्यशाळेत नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन यांची स्वायत्त संस्था 'महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर' येथील सहयोगी शास्त्रज्ञ एस. व्ही. बलमवार यांनी मार्गदर्शन केले आहे. प्रधानमंत्री गती शक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन पोर्टलच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या जीवनात अमूलाग्र बदल होणार असून, प्रशासकीय यंत्रणेतील सर्व सेवा प्राप्त होण्याला गती मिळावी, यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी १३ ऑक्टोबर २०२१ रोजी पीएम गतिशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन या पोर्टलचे उद्घाटन केले होते.

हे पोर्टल केंद्र शासनाचे जीआयएस-आधारीत प्लॅटफार्म आहे. या उपक्रमाद्वारे केंद्रीय मंत्रालय, राज्य व केंद्रशासित प्रदेशांमधील डेटा एकत्रित करून पायाभूत सुविधांच्या नियोजनामध्ये समन्वय साधला जाणार आहे. रेल्वे, महामार्ग, बंदरे व विमानतळ यांसारख्या पायाभूत सुविधा सोबतच या योजनेत आरोग्य केंद्र, शाळा व बँक यासारख्या सामाजिक व आर्थिक सुविधा विकसित करण्यावरही भर देण्यात येणार आहे. हे पोर्टलवर जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालयांच्या अधिनस्त सुरू असलेल्या पायाभूत सुविधा विकास प्रकल्पांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्यात येणार असल्याचे सहयोगी शास्त्रज्ञ एस. व्ही. बलमवार यांनी सांगितले.

# कामगार सुविधा केंद्राची साईट पूर्ववत सुरू करा

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, १८ जानेवारी**

शासनाने कामगारांना विविध साहीत्य देण्यासाठी तसेच कामगारांच्या पाल्यांना शिष्यवृत्तीसाठी कामगार सुविधा केंद्र सुरू केले होते. परंतु ही साईट सध्या बंद असल्यामुळे शिरडशहापूरसह तालुक्यातील कामगारांना औंढा नागनाथ येथील कामगार सुविधा केंद्रावर यावे लागत आहे. याठिकाणी कामगारांना बराच वेळ लागत असल्याने त्यांच्या मजुरीचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे कामगार सुविधा केंद्राची साईट पूर्ववत सुरू करावी अशी मागणी कामगारांमधून होत आहे. शासनाने कामगारांना कामगार सुविधा केंद्रामार्फत ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध केली. परंतु सध्या साईट चालत नसल्यामुळे रिन्यू अपडेट करणे, नवीन फॉर्म भरण्यासाठी सहासहा महीने वेळ लागत असल्याचे दिसत आहे. अजूनही अनेक कामगारांचे फॉर्म प्रलंबीत आहेत. त्यामुळे कामगार औंढा नागनाथ येथील सुविधा केंद्रावर मोठी गर्दी करीत असतांना दिसत आहेत. या ठिकाणी गर्दी होत असल्याने कामगारांना चकरा माराव्या लागत आहेत. तसेच सुविधा केंद्रावर दिवसभर ताटकळत बसावे लागत असल्याने कामगारांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

# पो.नि. अशोक घोरबांड यांच्याकडे कोट्यावधीची बेहिशोबी संपत्ती

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १८ जानेवारी**

भिमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा तसेच त्यांच्या बेहिशोबी मालमत्तेची चौकशी करावी, अशी मागणी माजी नगरसेवक रमेश माळी यांनी पत्रकार परिषदेत केली.

पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड हे जाणिवपूर्वक दलित मागासवर्गीय व्यक्तींवरच खोटे गुन्हे दाखल करणे, मारहाण करणे असे प्रकार करत राहतात. ज्या पोलीस ठाण्यात ते रुजू होतात, त्या हद्दीत बनावट एन्काऊंटर करणे असे प्रकार देखील घडले आहेत. सोमनाथ सूर्यवंशी याचा मृत्यू मारहाणीतच झाल्याचा अहवाल आहे. त्यामुळे पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी यावेळी रमेश माळी यांनी केली.



याचबरोबर पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड यांच्याकडे लोहा तालुक्यातील कलंबर, पुणे जिल्ह्यातील बाणेर, कंधार तालुक्यातील राहाटी, चिखली तसेच वसमत व नांदेड शहरात कोट्यावधीची बेहिशोबी मालमत्ता आहे. या मालमत्तेची चौकशी करावी, अशी मागणी यापूर्वी देखील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या महासंचालकाकडे केलेली आहे. त्याचबरोबर उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठात देखील याचिका दाखल करण्यात आली असून, या महिन्याच्या अखेरीस त्या याचिकेवर देखील सुनावणी होणार आहे. पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड यांच्याकडे जवळपास ५० ते ६० कोटी रुपयांची बेहिशोबी मालमत्ता असून, त्यांचे नातलग व मित्र परिवाराच्या नावाने देखील ४५ ते ५० एकर जमीन आहे. या सर्व संपत्तीची चौकशी व्हावी तसेच त्यांची एसआयटी, सीआयडी मार्फत चौकशी करावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात येणार असल्याचेही रमेश माळी यावेळी म्हणाले. हिंगोली जिल्ह्यातील हट्टा पोलीस ठाण्यातंर्गत दि.२६ जून २०१२ रोजी दोन जणांचा बनावट एन्काऊंटर करण्यात आला होता. या प्रकाराची देखील चौकशी करावी, अशी मागणी माजी नगरसेवक रमेश माळी यांनी पत्रकार परिषदेत केली.

# धर्माबाद तालुक्यातील बेलुर येथील निराधार महिलेच्या घराला आग

**तभा वृत्तसेवा**
**धर्माबाद,दि. १८ जानेवारी**

तालुक्यातील बेलुर बु येथील रहिवाशी निराधार महीला लिंगाबाई शंकर रामडगे व १ मुलगा,१ मुलगी हे त्या घरात राहत होते .काल दुपारी १२:१५ वाजताच्या सुमारास अचानक शॉर्टसर्कीटने आग लागून घरातीलजीवनावश्यक सर्व साहित्य जळून खाक झाले. यामध्ये घरातील सामान कपडे राशन भांडे बर्तन सर्वच जळून खाक झाले आहे.

शॉर्टसरकीने आग ही दुपारच्या वेळी लागल्याचे माजी सरपंच तथा पत्रकार बाबुराव आलूरकर यांनी प्रस्तुत प्रतिनिधींना सांगितले. उपरोक्त पार्श्वभूमीवर शॉर्टसर्किटने आग लागण्याच्या घटना वाढत असून यामध्ये उंदरांचा वावर मोठ्या



प्रमाणात वाढल्यामुळे घरातील इलेक्ट्रिक कार असेल वायर असेल हे मोठ्या प्रमाणात उंदीर कट करत आहेत. असे असले तरी संबंधित महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी घरातील मीटर घेतल्यानंतर केलेली वायरिंग ही नादुरुस्त असल्याचे बऱ्याच ठिकाणी आढळून येत आहेत. त्या निराधार महिलेच्या घरातील वायरिंग ही निकृष्ट दर्जाची होती का विद्युत महामंडळाकडून अशा घटना घडवू नयेत म्हणून याची दक्षता घेतली जात होती का? या निराधार महिलेच्या घराला लागलेल्या आगीवरून एक ना अनेक प्रश्न निर्माण होत असले तरी सध्या सदर निराधार महिलेस सर्वच स्तरातून मदत करणे अत्यंत गरजेचे असल्याचे आव्हान सोशल मीडियाद्वारे करण्यात येत आहे

## संक्षिप्त वृत्त



### शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी रमेश कोल्हे तर उपाध्यक्षपदी श्रीराम खोसडे

**नवीन नांदेड** -जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भायेगाव ता.जि.नांदेड येथे दिनांक १५ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता घेण्यात आलेल्या शालेय व्यवस्थापन समितीच्या निवडणुकीत अध्यक्ष रमेश मारुती कोल्हे तर उपाध्यक्षपदी श्रीराम रावसाहेब खोसडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भायेगाव येथील शाळा व्यवस्थापन समितीची निवड करण्यात आली सदरील निवडणूक खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली या निवडणुकीसाठी प्रथम मतदान पद्धतीने सर्व उमेदवार निवडण्यात आले व नंतर दहा उमेदवारातून बिनविरोध अध्यक्ष रमेश कोल्हे व उपाध्यक्ष श्रीराम खोसडे यांची निवड करण्यात आली सदरील निवडीची विशेषबाब म्हणजे गावातील यज्ञकांत कोल्हे हे सतत सरपंच पदापासून ते आमदारकीच्या निवडणुकीत निवडणूक लढवीत असतात पण त्यांना आतापर्यंत निवडणुकीत यश प्राप्त झाले नाही तरीसुद्धा त्यांनी या शालेय समितीच्या निवडणुकीत भाग घेतला पण त्यांना चार मत पडली आणि ते पराभूत झाले. अशा प्रकारे ही निवडणूक खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली या निवडणुकीत शालेय समितीच्या बिनविरोध अध्यक्षपदी रमेश मारोती कोल्हे तर उपाध्यक्षपदी श्रीराम रावसाहेब खोसडे यांची निवड करण्यात आली. या निवड प्रक्रियेतून सदस्य कल्पना बालाजी कोल्ह,रेणुका गंगाधर कोल्हे ,दिगांबर नागोराव भालेराव, ज्ञानेश्वर रामचंद्र कोल्हे, शिवकांत संभाजी कोल्हे, व्यंकटी कामाजी कोचार, ज्योती गंगाधर कोल्हे, राहुल गणपती खोसडे या सर्व सदस्यांची निवड करण्यात आली ही निवडणूक मुख्याध्यापक कल्याणकर डी.जी्. व सरपंच प्रतिनिधी बालाजी पाटील भायेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली यावेळी उपसरपंच बालाजी कोल्हे, पोलीस पाटील सुमनबाई शिवानंद खोसडे, तंटामुक्त अध्यक्ष विश्वनाथ कोल्हे, माजी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष देवराव कोल्हे, उपाध्यक्ष निर्मला कोल्हे, शाळेतील शिक्षक शिंदे डी.डी., कोंडलवाडे एम. एम., श्रीमती उत्तरवार डि.के्., घोरबांड पी.टी., कपाटे एस. व्ही., अर्थ फाउंडेशनचे ज्ञानोबा सूर्यवंशी, सुभाष जोगदंड, शिवशंकर मुळे, शिवानंद खोसडे यांच्यासह शाळेतील मुलांचे पालक शिक्षण प्रेमी नागरिक व ज्येष्ठ नागरिकांची उपस्थिती होती. सदरील निवडी प्रक्रियेनंतर निवडून आलेल्या उमेदवारास व सदस्यांना पुढील कार्याच्या शुभेच्छा दिल्या व कोंडलवाडे एम एम यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

### पौष पौर्णिमेनिमित्त खुरगावला आज पौर्णिमोत्सव कार्यक्रम

**नांदेड**-पौष पौर्णिमेनिमित्त आज १९ तारखेला पौर्णिमोत्सव या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पौष पौर्णिमेला बुद्धकाळात काही महत्वपूर्ण घटना घडल्या आहेत. राजा बिंबीसार याने राजगृह येथे बौद्ध धम्माची दिक्षा घेतली. वेळुवन भिक्षुसंघास दान म्हणुन अर्पण केले. यावेळी तथागतांनी वेळुवनात ४५ वा वर्षावास केला. या निमित्ताने मोठया उत्सवाचे आयोजन करण्यात आले. याच पौर्णिमेला राजा बिंबिसार यांची महाराणी खेमा यांनीही गौतम बुद्धाकडून धम्मदीक्षा घेतली. श्रीलंकेत ज्याप्रमाणे स्तुपाची पुजा केली जाते तद्वतच पौष पौर्णिमेला स्तुपाची पुजा करण्याचा प्रघात आहे. यासंबंधीने खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात भव्य स्वरूपातील या स्तुपाचे बांधकाम करण्यात येत आहे. या निमित्ताने सकाळपासूनच परित्राणपाठ त्रिरत्न वंदना, बुद्ध पुजा, गाथापठण, ध्यानसाधना, बोधीपुजा, भोजनदान, दान पारमिता, धम्मदेसना तसेच बुद्ध भीम गितांचा प्रबोधनपर कार्यक्रम आदी कार्यक्रम होणार आहेत.

# धर्माबादमध्ये मुरूम-रेती माफियांचा धुमाकूळ: प्रशासन निष्क्रिय

**तभा वृत्तसेवा**
**धर्माबाद,दि. १८ जानेवारी**

शहरात मुरूम आणि रेती माफियांनी नियमांची तमा न बाळगता अवैध वाहतूक सुरू ठेवली आहे. शहरात प्लॉटिंग आणि बांधकामासाठी मुरूम-रेतीची मागणी वाढली आहे, आणि त्याचा फायदा घेणारे माफिया रात्रभर अवैध वाहतूक करत आहेत. यामुळे शहरातील रस्त्यांवर वाहतूक



सुसाट धावत आहे, आणि प्रशासन मात्र याकडे चांगलाच दुर्लक्ष करत आहे. गेल्या आठवड्यात मुरूमाने भरलेल्या एका वाहनाने मध्यरात्री इनोव्हा गाडीला जोरदार धडक दिली, ज्यामुळे गाडी चालक गंभीर जखमी झाला. अपघातानंतर, दुसऱ्या दिवशी आयजींच्या पथकाने एक वाहन जप्त केले. मात्र, अशा कारवाईनंतरही शहरात मुरूम-रेतीची अवैध वाहतूक अद्याप सुरूच आहे.

शहरातील नागरिकांमध्ये प्रशासनाच्या निष्क्रियतेवर तीव्र नाराजी आहे. माफियांनी वेगवेगळ्या मार्गांनी अवैध वाहतूक सुरू ठेवली आहे, आणि प्रशासनाने यावर ठोस पावले उचललेली नाहीत. नागरिकांच्या तक्रारींवर प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे माफियांचे धाडस वाढले आहे. अवैध वाहतुकीमुळे रस्त्यांची दुरवस्था होत असून, नवीन बांधकामासाठी तयार केलेले रस्ते पुन्हा खराब होत आहेत. मध्यरात्री दवाखान्यास व खाजगी काम जाणारे वाहन या अवैधरित्या वाहतुकी समोरून जाण्यास नागरिकांमध्ये भीती निर्माण होत आहे.

नागरिकांनी शहरातील प्रशासनाला अवैधरित्या वाहणारे मुरूम व रीतीचे वाहने पकडण्यास यश येईल का व या वाहतुकीला थांबण्यास यश येईल का अशी उलट सुलट चर्चा शहरातून समोर येत आहे.

# बाऱ्हाळी येथील रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**बाऱ्हाळी,दि. १८ जानेवारी**

जगद्‌गुरु नरेंद्राचार्य महाराज नानीजधाम संस्थानच्या वतीने राज्यात रक्तदान महायज्ञ शिबिर आयोजित करण्यात येत असून याला भाविकातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. त्या अनुषंगाने शुक्रवारी बा-हाळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आयोजित रक्तदान शिबिरात १८६ महिला पूरुष रक्तदात्यानी आपला सहभाग नोंदवत रक्तदान केले.

जगद्गुरु रामानंदाचार्य स्वामी नरेंद्राचार्य महाराज नानीजधाम यांच्या प्रेरणेने राज्यात दि. ४ ते १९ जानेवारी या पंधर वाड्यात जवळपास १ हजार कँम्प च्या माध्यमातून महारक्तदान महायज्ञाचा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमात १ लाख रक्त बाटल्या संकलनाचे उद्दीष्ट्ये



ठेवण्यात आले आहे. त्या अनुषंगाने बा-हाळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शुक्रवारी घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिराच्या अध्यक्षस्थानी श्रीमती विजयाताई देशपांडे तर प्रमुख पाहुणे म्हणून राजन देशपांडे,शेखर देशमुख ,हनमंत मामा वाडीकर ,बालाजी सोमवार ,सतीश महाजन,प्रा.बळवंतराव देशपांडे, मू.अ.अशोक पंचगट्टे डॉ. सौ दर्शना राठोड ,शामभाऊ नागलगावे उपस्थित होते.सकाळ पासून भाविकातून चांगला प्रतिसाद मिळाला .सांयकाळी ६ वा.पर्यंत १८६ स्त्री व पूरूष रक्तदात्यांनी रक्तदान केले. गूरूमाउलींच्या आरतीने शिबिराची सांगता करण्यात आली. या प्रसंगी गूरु गोविंद सिंह शासकीय रक्त पेढी नांदेड व अर्पण रक्त पेढी नांदेड यांनी रक्त संकलनाचे कार्य केले . रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी शिवकूमार पांचाळ ,ईबितदार ,शिवाजी गवते ,उत्तम वाडीकर ,बालाजी जाधव ,दिलीप महाजन ,साईनाथ कोटगीरे, मारोती जळकोठे,गणेश पांचाळ ,साईनाथ दाचावार ,उतम सूगावकर, राजू पाटील थोटवाडीकर ,व्यंकट देशेटवार,अंकूश चिंचलवाड ,दत्तात्रय कारळे ,सन्मूख मठदेवरू,राम चव्हाण, भाऊसाहेब लामतूरे , माधव पांढरे ,सौ.पूजा उमाटे,चांगूणाताई पवार , स्वाती चिंचलवाड ,कल्पना कूलकर्णी,ज्योती कोटापल्ले,जयश्री वाडीकर बिराजदार नर्स अनिता दावलपूरे यांच्या सह अनेकांनी परीश्रम घेतले.

# रेणुकामातेच्या दर्शनासाठी ना.पंकजाताई मुंडे उद्या माहूरगडावर

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. १८ जानेवारी**

पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन पंकजा गोपीनाथ मुंडे दि.२० जानेवारी होणार रोजी दुपारी ३ वाजता त्यांचे माहूर येथे आगमन होणार असून, श्री रेणुकादेवीचे दर्शनासाठी त्या गडावर जाणार आहेत. सायंकाळी ५ वाजता माहूरगड येथून नागपूरकडे वाहनाने रवाना होणार आहेत.



दरम्यान, किनवट-माहूरचे भाजपाचे आमदार भीमराव केराम यांच्या मार्गदर्शनाखाली माहूर येथील भाजपाचे ज्येष्ठ नेते अनिल वाघमारे, नगरसेवक सागर महामुने, तालुका अध्यक्ष कांतराव घोडेकर, भाजयुमो ता.अ.विनायक मुसळे व महिला पदाधिकारी तालुक्यातील कार्यकर्त्यांसह ना.पंकजाताई मुंडे यांच्या माहूर दौऱ्यानिमित्ताने जय्यत तयारीला लागले आहेत.

## ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी राजेंद्र गहाळ

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १८ जानेवारी**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई तसेच राजर्षी शाहू महाराज ग्रामीण विकास प्रतिष्ठान जवळा (दे) ता. लोहा जि. नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या तिसऱ्या राज्यस्तरीय जनहित ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध साहित्यिक राजेंद्र गहाळ यांची अध्यक्षपदी निवड करण्यात येवून त्यांना निवडीचे पत्र देण्यात आले.

लोहा तालुक्यातील राजर्षी शाहू महाराज ग्रामीण विकास प्रतिष्ठान जवळा (दे.) या संस्थेच्या वतीने साहित्य संमेलन अध्यक्ष निवड समितीची बैठक ज्येष्ठ साहित्यिक देविदास फुलारी यांचे अध्यक्षतेखाली १५ जानेवारी रोजी संपन्न झाली.

# सेपक टाकरॉ स्पर्धेस जिल्ह्याचा मुला, मुलींचा संघ वर्धा येथे रवाना

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १८ जानेवारी**

दि.१७ ते १९ जानेवारी २०२५ या कालावधीत वर्धा येथे २५ वी महाराष्ट्र राज्य ज्युनियर सेपकटाक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धे साठी १३ जानेवारी २०२५ या कालावधीत लिटिल स्कॉलर्स पब्लिक स्कूल नांदेड या शाळेच्या मैदानावर निवड चाचणीतून नांदेडच्या मुला,मुलींचा संघ निवड करण्यात आला होता.

निवड झालेला संघ दि.१७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ६ वाजता वर्धा येथे रवाना झाला.निवड झालेल्या संघ खालील प्रमाणे-मुले: क्षितीज सूर्यवंशी, रोहित सूर्यवंशी , सुदेश कांबळे, असंग जोंधळे, आर्यन केशेट्टीवार,सक्षम कुपटीकर, वेदांत दासे, वेदांत सूर्यवंशी, रोहन फड, पार्थ तांदळे,मयूर वाकडे,सोमनाथ धुमाळे,श्रीनिवास शिंदे, विशाल फुलारी, तर मुली मध्ये आरती ठाकूर,श्रद्धा अवस्थी,सृष्टी नरवाडे,प्रशंसा वाडीकर, काशिनी कुपटीकर, अंकिता जाधव,सृष्टी जंगीलवाड, पलक्षा येरेकर, श्रेया गच्चे,रक्षीता बकवाड ,तेजस्विनी काळे तर प्रशिक्षक म्हणून रविकुमार बकवाड आदीजन वर्धा येथे रवाना

झाले आहेत. वरील खेळाडूंना जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे, जिल्हा संघटनेचे सचिव प्रवीणकुमार कुपटीकर , लिटिल स्कॉलर्स पब्लिक स्कूल चे अध्यक्ष रवींद्र रेड्डी,मुख्याध्यापिका सौ.उज्वला राणे, क्रीडा अधिकारी संजय बेतीवार,बालाजी शिरसीकर यांनी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# माध्यमिक आश्रम शाळेतील तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**नायगांव,दि. १८ जानेवारी**

नायगांव तालुक्यातील मरवाळी तांडा येथील आश्रम शाळेतील भव्य पटांगणात इतर मागास बहूजन समाज कल्याण नांदेड विभागाच्या नांदेड वतीने तालुका स्तरीय सांघिक क्रिडा स्पर्धा यशस्वीपणे घेण्यात आल्या इतर मागास बहूजन समाज कल्याण प्रादेशिक विभाग लातूर व इतर मागास बहूजन समाज कल्याण विभाग नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने देगलूर, लोहा, कंधार, मुखेडसह या चार तालुक्यातील वि.जा.भ.ज.च्या सर्व आश्रम शाळेतील प्राथमिक वयोगटातील १४ तर माध्यमिक १७ या वयोगटातील विद्यार्थी, विद्यार्थीनी चे शैक्षणिक क्षेत्रासह व्हॉलीबॉल, कबड्डी,खो खो, या सांघिक क्रिडा क्षेत्रातून प्रगती व्हावी त्यांच्यात सांघिक भावना वृध्दिंगत व्हावी ते शारीरिक दृष्ट्या तंदुरुस्त रहावेत या अनुषंगाने दि. १६ जानेवारी रोजी नायगांव तालुक्यातील पोष्टबेसिक माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेच्या प्रांगणात तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या वेळी क्रिडा स्पर्धेच्या कार्यक्रमाच्या स्थळी रामतिर्थ चे साह्यक पोलीस निरीक्षक श्रीधर भागवत जगताप, नायगांव पो. स्टे.जमादार गणपत पेदे, पो.हे.कॉ. शेख हाबीब पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी संग्राम कांबळे, माजी प्राचार्य किशन राठोड संस्थेचे कार्य वाहक तथा सरपंच डॉ.मधुकर राठोड, सुर्यकांत जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. माधव वाघमारे यांच्या संचाच्या सुगम संगीताने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रतन लक्ष्मण राठोड व उद्धघाटक नायगांवच्या तहसीलदार सौ.डॉ धम्मप्रिया गायकवाड ह्या सामुहिकपणे



विद्येची देवता सरस्वतीच्या प्रतिमेच पुजन करीत दिप प्रज्वलन करून अभिवादन केले. तद्नंतर उपस्थित सर्व उपस्थितांचे संस्थेच्या वतीने शाल श्रीफळ व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. त्यानंतर रामतिर्थ चे स.पो.नी.जगताप यांनी राज्यातील आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांने शैक्षणिक प्रवाहसह क्रिडा क्षेत्राकडे मनोरंजनाच्या दृष्टीने न पाहता क्रिडाक्षेत्रातून विद्यार्थाना शारीरिक दृष्ट्या तंदुरुस्त राहत स्वतःचे करिअर घडविता येते. व विद्यार्थांची सांघिक भावना वाढीस मदत होते असे या वेळी मनोगत व्यक्त केले.सत्कार समारंभा नंतर स.पो.नि. जगताप साहेबाच्या हस्ते राष्ट्रीय खेळ कबड्डी व खो खो या मैदानाचे पुजन करुन श्रीफळ फोडून खेळाडूंना शुभेच्छा देत खेळाची सुरुवात करण्यात आली. यावेळी तालूका स्तरीय सांघिक खेळात चार तालुक्या तून जवळपास एकोणीस शाळेनी सहभाग नोंदविला होता.या पैकी व्हॉलीबॉल संघातून १७ व१४ वयोगटातून मुले माध्यमिक आश्रम शाळा शिराढोणने प्रथम क्रमांक मिळविला तर मरवाळी तांडा येथील माध्यमिक आश्रम शाळेने १७ वयो गटातून मुलींनी प्रथम क्रमांक मिळवित जिल्हास्तरी य खेळासाठी अव्वल स्थान मिळाविले आहे तर माध्यमिक आश्रम शाळा काकांडीने १४ वयोगटातील मुलीनी प्रथम क्रमांक मिळविला तर राष्ट्रीय खेळ कबड्डी ह्या संघातून माध्यमिक आश्रम शाळा गांधीनगरने १७ वयोगटातील मुलांनी प्रथम आले व मा आ शा.काकांडीने१४ वयोगटातून मुले प्रथम आले. तर माध्यमिक आश्रम शाळा शिराढोण १७ वयोगटातील मुली प्रथम तर माध्यमिक आश्रम शाळा कांकाडीने १४ वयोगटातून मूलीचा संघ प्रथम आला आहे. तर खो खो या सांघिक खेळातून माध्यमिक आश्रम शाळा कुंटूरने १७ ,१४ वयोगटातून दोन्ही संघ मुले व १४ वयो गटातून प्रथम क्रमांक मिळविण्याचा बहुमान मिळविला आहे तर माध्यमिक आश्रम शाळा शिराढोण १७ वयोगटातील मुली प्रथम क्रमांक मिळवित जिल्हास्तरी सांघिक खेळासाठी पात्र ठरला आहे अशा रीतीने सायंकाळी सहा वाजता तालुका स्तरीय सांघिक खेळाची सांगता झाली तद्नंतर उपस्थित सर्व संघ शिक्षक खेळाडूसाठी सुरुची भोजनाची व्यवस्था केली होती तद्नंतर विजय संघातील मार्गदर्शक शिक्षकाचे व या क्रीडा स्पर्धेतील सर्व पंचाचे माध्यमिक आश्रम शाळेच्या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रतन राठोड, प्राचार्य विजयकुमार देशमुख,कार्य वाहक तथा सरपंच डॉ.मधुकर राठोड व माजी प्राचार्य किशन राठोड यांनी आभार व्यक्त केले तर विजयी खेळाडूचे कौतुक करीत पुढील जिल्हास्तरीय खेळासाठी शुभेच्छा दिल्या.

या तालूका स्तरीय सांघिक क्रिडा स्पर्धेत कुठलाही वाद न होता स्पर्धा यशस्वी करण्यासाठी गेले तिन चार दिवसांपासून पोष्ट बेसिक ,माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेतील स्थापन केलेल्या सर्व कमिटीतील शिक्षक वृंद प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचे संस्थेच्या वतीने पुष्प गुच्छ देऊन अभिनंदन केले.

# ‘बारा आण्याची बोंब’ म्हणजे बोलीभाषेचे अस्सल कसदार कणीस

## कथाकार राम तरटे यांच्या हस्ते बहिर्जी विद्यालयाचा स्नेहसंमेलन उद्घाटन समारंभ उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १८ जानेवारी**

गिरगाव येथील बहिर्जी स्मारक विद्यालयात वार्षिक स्नेह संमेलनाचा उद्घाटन समारंभ प्रसिध्द कथाकार राम तरटे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाला . त्यांनी यावेळी मार्गदर्शन करतांना अस्सल ग्रामीण बोलीभाषेचा बाज असलेली त्यांची ' बारा अण्याची बोंब ' कथा सादर केली ज्यातून हर्षविनोदाचे फवारे उमटत विदयार्थांनमध्ये उत्साह संचारला .

या उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष गिरगाव शाळासमितीचे अध्यक्ष शंकरराव कऱ्हाळे यांनी भुषविले . विशेष अतिथी म्हणून प्रसिध्द कवी प्रा. कल्याण कदम, गिरगावच्या सरपंच पुनमताई प्रमोद नादरे , नृत्य दिग्दर्शक कृष्णा देवणे, गितांजली भोंग, शाळासमितीचे सदस्य तुषार नादरे, मुक्तार नदाफ, राजकुमार कऱ्हाळे , गुलाबराव कऱ्हाळे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविकात मुख्याध्यापक प्रकाश इंगळे यांनी या विद्यालयाचा गेल्या २५ वर्षात पासूनचा स्नेहसंमेलनाचा वैविधपुर्ण उपक्रमांच्या इतिहासाला उजाळा दिला. पारंपारिक स्वागत गीताला फाटा देत विद्यार्थांत उर्जा पेरणारे लोककवी वामनदादा कर्डकांचे तुफानातील दिवे या गीतांने स्वागत केले.

विशेष अतिथी कवी प्रा. कल्याण कदम यांनी 'सेनिमाला घेऊन चला', तलाठी गेल्या कुण्या गावा ' या कवितेने माहौल बनविला . त्याला कळस राम तरटे यांच्या कथेने घातला. आज पासून सुरू झालेल्या स्नेहसंमेलनात



गीत गायन, कथाकथन, वक्तृत्व, अंताक्षरी, प्रश्नमंजुषा आणि नृत्य, नाट्याचा सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल राहणार आहे. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख कवी श्रीनिवास मस्के यांनी तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षक चंद्रकांत राऊत यांनी मानले. यावेळी विद्यार्थी संसदेचा अध्यक्ष क्षितीज नादरे , कर्ण नादरे , वैष्णवी कऱ्हाळे , संस्कृती कऱ्हाळे , वेदिका कदम यांचा सहभाग होता . कार्यक्रम यशस्वीतेसाठी क्रिडा प्रमुख विलास नादरे ,सांस्कृतिक विभागातील सुनिल घुगे , श्रीमती अर्चना चवणे , संजय नाकोड , वाठोरे , श्रीमती भोसले , श्याम कांबळे , पवळे सर आदींनी सहकार्य केले . या वेळी मोठ्या संख्येने शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी यांची उपस्थिती होती . दरम्यान स्नेह संमेलनाच्या उद्घाटनात बोलताना कथाकार राम तरटे म्हणाले की , ग्रामीण मातीतील विद्यार्थ्यांनी स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून आपल्या कलागुणांचा विकास करणे आवश्यक असते. स्नेहसंमेलना सारख्या सांस्कृतिक कार्यक्रमातून अनेक अभिनेते आणि अभिनेत्री घडल्या आहेत . येथून उत्तम वक्ते, उत्तम कथाकार आणि सर्वोत्तम कवी ही घडवले जातात. त्यामुळे स्नेहसंमेलनाचा आनंद घेत असताना स्नेहसंमेलनाचे महत्त्व समजून घेऊन त्या अनुषंगाने स्वतःला घडवणे आवश्यक असल्याचेही ते म्हणाले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मनातील न्यूनगंड बाजूला काढून आपल्या आई-वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी आणि उज्वल भविष्यासाठी कठोर परिश्रम घेऊन यश मिळवावे. त्यासाठी आतापासून मनाची तयारी करून अभ्यासाला लागावे असे सांगून अस्सल बोलीभाषेतील' बारा आण्याची बोंब ' कथा सादर करून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.



Mail : tbnanded@gmail.com, Mob. No.: 9850952439